विषय भू-प्रवास
सं. क्र. ७८६

# एक झलक पूर्वेची

ले. माधव गडकरी

REFBK-0028433
REFBK-0028433



# एक झलक पूर्वेची

माधव गडकरी

REFBK-0028433

कोहिनूर प्रकाशन, मुंबई.

किंमत १० रुपये

प्रकाशक :
कोहिनूर प्रकाशन,
जे–१५, नवप्रभात सोसायटी,
हनुमान रोड, विलेपार्ले, मुंबई ५७.

मुखपृष्ठ : श्री. जयंत ताडफळे

सजावट : श्री. श्रीनिवास प्रभुदेसाई

© कुंदा गडकरी

प्रथमावृत्ति : जून १९७९


मुद्रक :
प्रमोद वि. बापट
प्रमोद प्रिंटर्स,
१०१९, सदाशिव पेठ, पुणे ३०.

दोन हसरे चेहरे
डॉ. शिरीष यंदे
आणि
सौ. शुभांगी यंदे
यांच्यासाठी
हे गुलाबी पुस्तक


## लेखानुक्रम


१. जपानी माणसे
२. गिंझाची जत्रा
३. आनंदनगरी टोकियो
४. नयनमनोहर नारा
५. कोजी आणि काझुए
६. जपानी वृत्तपत्रांचे अफाट जग
७. जपानचे राजकारण
८. लॉकहीड : जपानचे वॉटरगेट
९. जपानचे पोलादी अर्थकारण
१०. फुकुयामाचा पोलाद प्रकल्प
११. सुझी वाँगचे हाँगकाँग
१२. अशांत तरुणांचे बँकॉक
परिशिष्टे






जपानची ही संसद. पार्शी अग्यारीसारखी ती दिसते.



बँकॉकच्या जुन्या राजवाड्यातील एक इमारत.



जपानची वेगवान गाडी फुजी नदीवरून जाताना. खाली फुजी पर्वत.





वाचणाऱ्यांच्या देशातील पाच जपानी भाषेतील व चार इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रें.







टोकियोतील एक बाजार पेठ.



रविवारची ही गिंझा. टोकियोतील या हमरस्त्यावरची मोटारींची वाहतूक थांबते व



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवास
वा. क्र. ...
२८८३३
शाखा (स्थळ प्रत)

" These are the best people so far discovered, and it seems to me that among the unbelievers, no people can be found to excel them. "

–St. Francis Xavier (Report on Japan)

# ९. जपानी माणसे

पश्चिमेचे दर्शन मी घेतले, अमेरिका पाहिली; परंतु जपान मी पाहिले नव्हते. पूर्वेचे दर्शन घेण्याची संधी मिळाली नव्हती. जपानबद्दल सारेच कौतुकाने बोलतात. जपानी माणसाची तांत्रिक हुशारी, त्याचे कौशल्य, एका लहानशा राष्ट्राची बलाढ्य राष्ट्रांशी स्पर्धा करण्याची तयारी– साऱ्याचेच औत्सुक्य मला होते. अमेरिका जपानच्या एकोणतीसपट मोठी आहे, तर भारत नऊपट. परंतु आर्थिक प्रगतीत अमेरिका व रशियानंतर जपानचा तिसरा क्रमांक लागतो, तर परदेशी व्यापारात जपानने अमेरिकेखालोखाल दुसरा क्रमांक पटकाविला आहे. रशिया, प. जर्मनी यांचे क्रमांक नंतर लागतात, इतका जपानी बनावटीचा माल परदेशांच्या व्यापारपेठांत खपतो.

टोकियोच्या दिशेने एअर इंडियाचे 'गौरीशंकर' जात होते. मला वाटले, विमान चीनच्या भूमीवर असावे. म्हणून

भारतीय विमानातील जपानी हवाईसुंदरीस मी विचारले,

'Are we flying over China?'

'No, no. We are over Japan itself.' ती उत्तरली.

जपानच्या भूमीचे ते पहिले दर्शन डोंगररांगांचेच होते. दलदल, बेटे आणि त्यांवर रेंगाळणारे ढग म्हणजेच का हा इतका विकसित जपान, असा प्रश्न क्षणभर मनात आला. छोटी गावे व शेती दिसू लागली. अमेरिकेचा टोलेजंगपणा जपानने टोकियोखेरीज इतरत्र फार थोडा घेतला आहे. जपानच्या मोठमोठ्या शहरांत प्रचंड इमारती आहेत, अनेक मजल्यांची दुकाने आहेत; परंतु ते सारे पुढच्या रांगांत. मागच्या रांगांत जुने जपान तसेच आहे. अमेरिकी बाँबहल्ल्यांनी टोकियो उद्ध्वस्तच केले होते. त्यामुळे तेथे एक प्रचंड शहर अमेरिकेनेच उभे करून दिले. परंतु टोकियोच्या उपनगरात जुनी घरे आहेत– उतरत्या लाकडी छपरांची, आणि या घराघरांतील माणसे टोकियो टोलेजंग झाले म्हणून बदलली नाहीत.

जपानमध्ये फक्त एक आठवडा मी राहिलो– परंतु आजही माझ्या डोळ्यां-समोर येतात ती जपानी माणसे. पुरुष, स्त्रिया– मिनिटा-मिनिटाला नमस्कारासाठी विनम्रतेने वाकणाऱ्या. त्यांचे सततचे नुसते वाकणे पाहून मी वाकून गेलो. पश्चिम व पूर्व यांमधील पहिला फरक येथे जाणवला. जपान दुसरे महायुद्ध हरला. दोन ॲटमबाँब त्याने झेलले. त्या जखमा अजून जपानी माणसाच्या हृदयातून वाहण्याच्या थांबलेल्या नाहीत. त्याचे डोके विश्रांतीसाठी स्थिरावते ते हिरोशिमा–नागासकीच्या उश्यांवरच. पुनर्जन्मासाठी, पुनरुत्थानासाठी जपानने अमेरिकेची मदत घेतली; परंतु त्यांनी आपले स्वत्व सोडले आहे असे मला एका ठिकाणीही दिसले नाही. जपानी माणूस जपानीच राहिला आहे, हे त्याचे मला जाणवलेले पहिले वैशिष्ट्य.

टोकियो विमानतळावर उतरलो तर ओकुरा कंपनीचे श्री. आर. काकू माझ्या स्वागतासाठी उपस्थित होते. गोव्यातून जपानला लोहखनिजाची पहिली निर्यात करणारे श्री. विश्वासराव चौगुले यांची ओळख जपानला २५ वर्षांपूर्वी ज्यांनी करून दिली ते सत्तरीतील श्री. काकू स्वागतासाठी वाकले. जपानची सारी विनम्रता का-कू न करता जणू माझ्यासमोर नतमस्तक झाली होती. वाकायची सवय नसलेला मीही बेतावेताने वाकलो. एक जबर कर्तृत्वाचा जपानी माणूस माझ्यासमोर साधेपणाने उभा होता. आमचे 'गौरीशंकर' विमान टोकियोला दिनांक २२ जून रोजी रात्री ११ वाजता पोहोचायचे होते, ते दुसऱ्या दिवशी दिनांक २३ रोजी सकाळी ११ ला पोहोचले. मुंबई–टोकियो घड्याळांत साडेतीन तासांचा फरक असल्याने मुंबईचे सकाळचे ७–३० तर टोकियोचे सकाळचे ११ वाजले होते. टोकियो शहराकडे गाडी जात होती. माझे लक्ष सहज वाटेवरच्या

घरांकडे गेले. मुंबईसारख्या ब्लॉक्सच्या लांबलचक इमारती दिसत होत्या, व सर्वत्र कपडे बाहेर वाळत घातलेले. पश्चिमेत कधीही न दिसणारे व भारतात सर्वत्र दिसणारे दृश्य. टोकियोच्या हमरस्त्यालगतच्या इमारतींतून पहिल्या दिवशी ज दिसले ते मग सर्वत्र दिसले. ब्रिटन, अमेरिकेत बाहेर कपडे वाळत घालणाऱ्या भारतीय माणसांना लोक हसतात. एका भारतीय व्यक्तीचे आपल्याला घर शोधा-वयाचे होते, व ते बाहेर कपडे वाळत घातलेले पाहून आपण सहजपणे शोधून काढले, अशी आठवण एका स्त्रीने आपल्या प्रवासवर्णनात लिहिलेली आहे. जपानी लोकांच्यात हा पाश्चिमात्य पोषाखीपणा अजिबात नाही, याचे निदर्शक म्हणजे हे वाऱ्यावर चाळी-चाळींतून फडफडणारे कपडे.

सोमवारपासून माझ्या भेटीगाठी सुरू झाल्या. कुठेही गेले की आधी वाकणे आले. स्वागतकक्षेतील त्या सुंदर मुली उठून आधी वाकत. स्त्रीसौंदर्याने एवढे वाकावे हे काही मनाला पटत नव्हते. परंतु माझ्यापुढे सौंदर्य वाकत नव्हते तर जपानी सौजन्य वाकत होते, याची आठवण माझी मीच मला करून दिली. अर्थात मी एका मोठ्या आनंदाला त्यामुळे मुकलो. परंतु तेवढ्याने माझी परीक्षा संपणारी नव्हती. बैठकीच्या खोलीत चर्चेस जाऊन बसावे तर पुन्हा एक जपानी सुंदरी आत शिरे व पाण्याचे ग्लासेस ठेवून जाई. मुंबईच्या हॉटेलात पोऱ्या दाणकन पाण्याचे ग्लासेस आणून आदळतो त्याची आठवण झाली. जपानमध्ये हॉटेलपासून सर्वत्र आलेल्यास प्रथम पाणी पाजण्याची पद्धत अगदी सर्रास दिसली.

जलपान सेविका परतली. पुन्हा दार वाजले. दारावर थाप मारल्याशिवाय थाप मारण्यासही कुठे शिरण्याचा प्रघात जगभर (भारताखेरीज) नसल्याने ज्यांच्या भेटीसाठी मी आलो आहे ते आता आले असावेत अशा बेताने मी सावरून बसतो, तर तीच सुंदरी पुन्हा आली. या वेळी तिच्या हातातील ट्रेमध्ये जे काही होते त्यामधून जोरदार वाफा निघत होत्या. भारतीय पाहुण्यासाठी गरमागरम काहीतरी आले, असे मनात येण्यापूर्वीच तो वाफाळ ट्रे माझ्यासमोर तिने धरला. गरम पाण्याची वाफ अंगात मुरविलेले छोटे टॉवेल्स एका काठीभोवती गुंडाळलेले होते. आलेल्या पाहुण्याला उत्साही वाटावे म्हणून असलेली सोय खरोखरच अपूर्व वाटली. हॉटेलमध्ये सकाळचा चहा घेण्यास गेले तरी गरम टॉवेलची घडी सेवेला हजर होई. तोंडाची अकारण वाफ दवडण्याऐवजी त्या वाफेत तोंड पुसून घेण्याने फार बरे वाटे. हात पुसण्यासाठी त्याचा उपयोग होई. ज्यांच्या ज्यांच्या मी घरी गेलो तेथे प्रत्येक ठिकाणी पिण्याचे पाणी व वाफेने मोहरलेला टॉवेल वेटोळ्यात येऊन भेटलाच– परंतु आगगाडीतही हा वाफेभरला टॉवेल भेटीस येईल असे वाटले नव्हते. टोकियोहून मी फुकुयामाला, जपानच्या दक्षिणेस, जगातील सर्वांत मोठा पोलाद कारखाना पाहण्यासाठी गाडीत बसलो. गाडी सुटली आणि काही

मिनिटांतच ते वाफेभरले 'इंजिन' डब्यात हजर. भरपूर टॉवेल्स तिच्याजवळ असल्याने तिचा चेहराही धुक्यात हरविलेल्या एखाद्या मुखचंद्रम्यासारखा दिसेनासा झाला होता. पुन्हा सारे काम कमालीच्या शांततेने चाललेले.

जपानने ही आपली वाफ पाश्चिमात्य संस्कृतीच्या दडपणानेही गमाविली नाही व खुद्द टोकियोसारख्या शहरातही ती कायम राखली याचे मला विशेष वाटले. खुद्द टोकियोपेक्षा उपनगरांत असंख्य लोक राहतात, व वेगवान गाड्या, भुयारी गाड्या हे सर्व असूनही टोकियोत कामास येणाऱ्या असंख्यांना दोन-दोन तास गाडीतून प्रवास करावा लागतो. सकाळी ९–३० ला बहुतेक कार्यालये सुरू होतात व त्यासाठी ७–३० ला बहुतेकांना घरे सोडावी लागतात. टोकियोत घरभाडे भरमसाठ; व पुन्हा शहरात सर्वांचीच गर्दी होऊ नये म्हणून शक्य तितके लोक शहराबाहेर राहावेत असा प्रयत्नही शासनाचा आहे. म्हणून या सर्वांना ऑफिसात येण्याचा गाडीखर्च ऑफिसतर्फे दिला जातो. खोटेपणाने असे भाडे घेण्याची उदाहरणे जपानमध्ये नाहीत. मग ही सारी माणसे सकाळी डुलक्या घेत गाड्यांत बसतात. बहुतेकजण सुटांत. पाश्चात्य पोषाख त्यांनी घेतला आहे. मी राहत होतो त्या बड्या हॉटेलच्या बाहेर पाणी तुंबत होते. ती गटारे साफ करणारा-ही टाय लावलेला, कोणत्याही कॉलेजचा भारदस्त प्राध्यापक वाटावा असा होता. पायांत बूट होते. शांतपणे खाली वाकून तो पाणी अडविणारा कचरा हाताने बाजूला काढीत होता.

ही सारी जपानी माणसांची गर्दी दोन ठिकाणी एकवटते. एक 'पाचिको'त तर दुसरी कॉफी हाऊसमध्ये. समारंभाने चहा पिणाऱ्या या जपानी लोकांना कॉफीच अधिक आवडते. टोकियोतच नव्हे तर जपानमध्ये बहुतेक शहरांत कॉफी हाऊसेस आहेत. तेथेही प्रथम 'मोझू' म्हणजे पाणी, नंतर ती तोंडाची नाही तरी अंगाची वाफ दवडणारा टॉवेल व नंतर 'है है' म्हणून जोराने म्हणणारी स्त्री म्हणजे युवती यांची गाठ निश्चितपणे पडेल. भारतीय पद्धतीने ऑफिसातील शिपायाला एखादी गोष्ट सांगितली तर तो क्वचितच 'आपल्याला सांगितलेले समजले' अशा अर्थी 'हो' म्हणतो. मोठ्याने 'हो' हे आपल्या संस्कृतीत अपेक्षितच नाही. बहुतेक वेळा 'समजले हो! पुन्हा पुन्हा काय सांगता?' असा चेहरा करून जाण्याची येथील पद्धत व तेथे प्रत्येक वेळी मानेला सुबकसा हिसका व वर जोरात 'है'! या मुली कसल्या तरी घोषणा देत आहेत असे मला सुरुवातीस वाटले.

एका कार्यालयात मी गेलो, व तेथे चुकून कॉफी आधी आली. मी चटकन मिळालेल्या वाफेदार टॉवेलने हात चोळत 'मोझू' असे म्हटले.

तेथे दोन सेविका उभ्या होत्या. त्यामुळे दोन माना एकदम कलंडल्या व 'है' असे त्या एका सुरात ओरडल्या. आठवडाभर हे 'है' मी ऐकत होतो.

दुकानात काही मागावे व ते समजल्यावर 'है', 'है 'चा डौल पाहत राहावा. अर्थात हे 'है' बरेच मोहक असल्याने कुठेही टोचल्यासारखे वाटले नाही. पुरुषही सारखे 'है', 'है' करीतच असतात. इंग्रजी भाषेची गरज या जपानी लोकांनी कधी मानली नाही. पाश्चिमात्य संस्कृतीचा मानदंड घेऊन मॅकआर्थर जपानच्या शासनासाठी महायुद्धानंतर बसला तरी जपानी माणूस बदलला नाही. त्याच्या पायांतील सपात गेली नाही. स्त्रीने किमोनो टाकला नाही.

जपानमध्ये कुणाच्याही घरी आज गेले तरी तुम्हाला आपली पादत्राणे दारातच काढावी लागतात. पुन्हा पायांतील बूट काढून, ते तेथेच टाकून मी समोर ठेवलेल्या सपाता घातल्या, तर घरची मालकीण माझे बूट उचलून तेथेच बाजूला ठेवलेल्या एका कपाटात ठेवू लागली. तेव्हा माझ्या लक्षात आले, की घरात शिरल्यावर बूट काढून जिथल्या तिथं टाकून द्यावयाची आपली सवय येथे चालणार नाही. बूट काढले पाहिजेत, काढलेले उचलून ठेवले पाहिजेत. नंतर समोर ठेवलेल्या सपाता घातल्या पाहिजेत व मग घरात शिरायचे. सर्व घरांना 'प्लिंथ' नाही. त्यामुळे रस्त्याच्या पातळीवरच घरे व लाकडी स्टेज टाकून उंचवटा करावा असाच घराचा सुरुवातीचा भाग. तेथे कोपऱ्यात एखाद्या सुंदर जुन्या पद्धतीचा दिवा असेल व त्यामागे दोन्ही हात ढोपरावर ठेवून वाकलेली घरधनीण असेल. जपानच्या घराघरांत हे दृश्य आहे.

जपानचा चहा म्हणजे तर एक गंमतच आहे. जपानच्या चहा-समारंभाबद्दल सर्वांनीच वाचलेले आहे. हा चहा-समारंभ जपानमध्ये क्षणोक्षणी चालू असतो. परंतु तो चहा आपल्याला पिण्याजोगा मुळीच नाही. अतिशय फिकट असा हा हिरवट चहा आगगाडीपासून सर्वत्र जपानी माणसांच्या मागे फिरत असतो. पाणी पिणे व हा चहा पिणे यांत फारसा फरक नाही. आगगाडीत आधी खाण्याचे पदार्थ आले, जेवणाचे बंद डबे आले आणि मागोमाग आला चहा. काही स्टेशनवर उतारू चढले. त्यांच्या प्रत्येकाच्या हातात एक कंदिलासारखे प्लास्टिकचे भांडे होते, व त्यालाही कडी असल्याने हिंदकळत ते धरलेले होते. हा चहाच ! सपाता आणि चहाचे हे हिरवे कंदील म्हणजे जपानी संस्कृतीच्या दोन फुलवातीच. त्यांचे वास्तव्य सर्वत्र आहे.

या सर्वांतून मुक्त झालेला जपानी माणूस दिसतो तो 'पाचिको'त. टोकियोत नाक्यानाक्यावर झगमगत्या दिव्यांतील हे 'पाचिको' आहेत. 'पाचिको' म्हणजे सभ्य जुगाराचे अड्डे. सुरुवातीला हे काय प्रकरण आहे हे मला कळेना. अमेरिकेत अनेक प्रकारचे जुगार आहेत– परंतु जपानचे 'पाचिको' त्यापेक्षा वेगळे आहेत. एका प्रचंड हॉलमध्ये शेकडो लोक यंत्रासमोर बसून बटने दाबून गोट्या उडविता-हेत ! त्या शिशाच्या गोट्यांचे आवाज, त्या बटनांचा खडखडाट, व हे सारे जणू

ऐकूही न आल्यासारखे चेहरे करून अगदी दंग झालेले जपानी... तरुण, म्हातारे, पुरुष– स्त्रियाही. ऑफिसातून सरळ घरी जाण्याची सवय जपानी माणसाला नाही. तो लौकर घरी परत आला तर ऑफिसातील त्याचे स्थान महत्त्वाचे नाही,असे पत्नीला व विशेषतः शेजारच्यांना वाटते. म्हणून ते उशिरा घरी जातात. तो सर्व वेळ ते काढतात या 'पाचिको'त किंवा कॉफी हाऊसमध्ये. पॅरिससारखे येथे सर्वांना कॉफी हाऊसचे वेड दिसले. गप्पा मारण्यासाठी कॉफी हाऊस अगदी झकास. बोलणाऱ्यांपैकी एखादा मध्येच मोठ्याने बोलतो आणि हसूही लागतो. रस्त्याने मोठमोठ्याने बोलण्याची सवय जपानी लोकांना भरपूर आहे. मध्येच ते थांबतील, आपला विनोद पूर्ण करतील, मोठ्याने हसतील व मग पुन्हा पुढे चालू लागतील. लंडनच्या साहेबाची जराही मुरडली न जाणारी मिशी येथे नाही की अमेरिकन माणसाचा तो उंटाच्या उंचीचा ताठरपणा नाही.

जपानी जीवनातील मृदुता प्रकट करणारी एक फार चांगली पद्धती पाहावयास मिळाली. जपानमध्ये कोणतीही गोष्ट उघडी देत नाहीत– ती सुंदर रुमालात बांधून देतात. श्री. विश्वासराव चौगुले यांनी ज्यांच्याबरोबर पहिलावहिला करार केला त्या ८५ वर्षांच्या श्री. एच. वातानबे यांच्या घरून आम्ही काही फोटो आल्बम्स घेतले. त्यांच्या पत्नीने अतिशय चांगल्या अशा रेशमी रुमालात ते बांधून दिले. भारतीय संस्कृतीचा दुवा येथे या रुमालाच्या गाठीत कुठेतरी गुंतलेला दिसला. आपल्याकडे जुने धर्मग्रंथ अगर ज्ञानेश्वरी आजही ज्या पद्धतीने रुमालात बांधून ठेवली जाते अगर बांधून दिली जाते, त्याचेच हे अनुकरण वाटले. अत्याधुनिक अशी यंत्रे तयार करणाऱ्या त्या जपानी माणसाला रुमालात काही बांधून घेणे हे जुनेपणाचे वाटत नाही, हेच त्यात महत्त्वाचे आहे. त्याच्या सपाता महायुद्धाने गिळल्या नाहीत की रेशमी रुमालातील मृदुता कोमेजली नाही. पूर्व पश्चिमेपेक्षा 'उजवी' वाटली ती यामुळेच. जपानी भाषा न समजणारी, परंतु नाक्यानाक्यावर, हॉटेलात– सर्वत्र असलेल्या टेलिफोनमध्ये १० येनचे नाणे टाकून 'यो–यो' करून बोलणारा जपानी माणूस व पाठीमागे बांधलेल्या मुलाला खेळविण्यासाठी गाडीच्या प्लॅटफॉर्मवर नाचणारी जपानी स्त्री मी जपान सोडले तरी समोर दिसते आहे. या सर्वांची जत्रा भरते ती रविवारी– टोकियोच्या गिंझात.

☐

माणसाला अमेरिकन पद्धतीचे घर, चिनी पद्धतीचे जेवण आणि जपानी पत्नी या तीन गोष्टी मिळाल्या तर त्याच्यासारखा भाग्यवान माणूस जगात दुसरा नाही.

---

# २. गिंझाची जत्रा

न्यूयॉर्कचे ब्रॉडवे, लंडनची पिकॅडली, पॅरिसची प्लास पिगाल, तशी टोकियोची गिंझा. परंतु गिंझात तिच्या नावाप्रमाणे काही वेगळेपण आहे. गिंझात झिंग अभिप्रेत आहे. खरे पाहता ते झिंगाच असावे, परंतु गौतम बुद्धाने बुद्धिपुरस्सर ते गिंझा केले असावे. गिंझ म्हणजे चांदी. येथे चांदीची नाणी पाडण्याची टांकसाळ होती, म्हणून या भागाचे नाव गिंझा झाले. पुढे पुढे गिंझा म्हणजे बाजारपेठ, असे जपानी भाषेतील कायम समीकरण बनले आणि कोणत्याही शहरातील मोठ्या बाजारपेठेस गिंझा म्हणू लागले. परंतु नाव घेतले म्हणजे नावलौकिक लाभतोच असे नव्हे. टोकियोची लाख झगझगत्या दिव्यांची, चमचमत्या चेहऱ्यांची, निमुळत्या डोळ्यांची, हसऱ्या गालांची गिंझा दरबारी कानडा आळवत राहिली ती कायमची. ती ऐट, ती मिजास, तो खुशालचेंडूपणा, ती बहार, तो नटवेपणा, तो दिलखुलास-

पणा दुसऱ्या कोणत्याही गिंझाला येणे शक्य नाही. न्यूयॉर्कचे ब्रॉडवे गिंझापुढे बकाल वाटते, पिकॅडली छोटी वाटते, तर प्लास पिगाल म्हणजे झोपलेल्या वारांगनेसारखी सदैव दिसते. गिंझा म्हणजे रसरसते यौवन. आणि त्यामुळेच या गिंझाला एक वेगळा 'मूड' आहे. भटकणाऱ्यांचा मूड गिंझा घेते आणि आपला मूड भटकणाऱ्यांना देते. 'जीवनाच्या अरुंद रस्त्यावरून मोकळ्या मैदानात मारलेली, आनंदाचे वारे प्यालेली उडी,' असे गिंझाकडच्या धावेचे वर्णन श्री. प्रभाकर पाध्ये यांनी आपल्या 'तोकोनामा' या गाजलेल्या पुस्तकात केले आहे.

अनेक गोष्टी अशा असतात की त्या एकदा पाहिल्या की डोळ्यांत घर करून राहतात. टोकियोची गिंझा अशी माझ्या डोळ्यांत आहे. डोळे मिटले तरी दिसते, व उघडचा डोळ्यांच्या समोर तर ती साऱ्या गोष्टींना बाजूला सारून लखाखते. या निऑन दिव्यांनी जगालाच आज उजळून टाकले आहे. अमेरिकेतील अनेक शहरे म्हणजे केवळ निऑन दिवे, एवढीच स्मृती माझ्या डोळ्यांनी साठविलेली आहे. गिंझापेक्षा अधिक निऑन दिवे अमेरिकेतील काही शहरांत असतील. त्यामुळे केवळ दिवे हे गिंझाचे वैशिष्टच नाही की तिचे वेगळेपण नाही. गिंझा म्हटले की समोर जपानी स्त्री उभी राहते; जिच्या डोळ्यांतून मादकता ही चोरून डोकावते अशी निमुळत्या डोळ्यांची जपानी स्त्री. किमोनो घातलेली, तर काही आधुनिक वेषातील. परदेशात गेले की स्त्रियांचे वर्णन करावयाचे हा संकेत मोडावा असे मनात येऊन न देणारी. जपानी स्त्री-पुरुष हे खरोखरच खूप वेगळे आहेत. या क्षणाला त्या गिंझात मी फिरत आहे व असंख्य जपानी स्त्री-पुरुषांचे घोळकेच्या घोळके बाजूने येत आहेत, जात आहेत असे सारखे वाटते. जपानमध्ये 'मिनी'ची फॅशन आता कालबाह्य ठरून 'मॅक्झी'ची 'आधुनिक' फॅशन आलेली असल्याने पायघोळ पोषाखांचे नमुने अनंत फिरत होते. साऱ्यांचे बोलणे मोठ्याने. गिंझा म्हणजे अनेक मजली डिपार्टमेंटल स्टोअर्स, असंख्य कॉफी हाऊसेस, विविध तऱ्हेच्या वस्तूंची स्वतंत्र दुकाने, अनेक नृत्यगृहे, बियरचे बार्स आणि साकेची लहान लहान आस्वादगृहे. या सर्वांभोवती घोंघावणारी माणसेच गिंझाला झिंग आणतात.

ती पुरी यावी म्हणून दर रविवारी या गिंझाचा मुख्य रस्ता सर्व वाहनांना पूर्णपणे बंद केला जातो; व मग तेथे जी जत्रा फुलते तिला जगात तोड मिळणे कठीण. रोज शेकडो मोटारींची ये-जा ज्या हमरस्त्यावरून चालते तो टोकियोचा अगदी मुख्य रस्ताच रविवारी दुपारी वाहनांना बंद केला जातो तो केवळ हिंडणाऱ्यांना मुक्तद्वार देण्यासाठी. जपानच्या रसिकतेचे केवढे कौतुक ती जत्रा पाहताना मला वाटले ! आठवड्यातून अर्धा दिवस का होईना, यंत्रयुगाचे हे जोखड खांद्यावरून फेकून देणारी ही माणसे खरे जीवन जगताहेत. हमरस्त्यावर मध्यभागी आसपासचे कॉफी हाऊसवाले समुद्रकिनाऱ्यावर असतात त्या छत्र्या आणून टाकतात.

मग तेथेच कॉफी तें बियर आणि पोराटोरांचे आइस्क्रीम यांचा जल्लोष सुरू होतो. व तें पाहिल्यावर वाटले, की मुंबईच्या फोर्टमध्ये मध्यभागी रस्त्यात छत्रीखाली बसून बियर पिण्याचे भाग्य कधी लाभेल काय ?

रात्रीची गिंझा वेगळी आणि रविवारी दुपारची वेगळी. रात्रीच्या गिंझातील मस्ती, वासना रविवारी दुपारच्या या नयनोत्सवात नव्हती. रात्रीची गिंझा ही बरीचशी मुखवटयाची, नृत्यगारात भटकणाऱ्यांनी यावे म्हणून डोळे उडविणारी. पण त्या वेळी त्या डोळयांचे मुख्य लक्ष आपल्या खिशातील पाकिटाकडे आहे हे जाणवते. ' नखे लाखिया, दात मोतिया, वैदूर्यी नेत्र,' या कवी बोरकरांच्या ' जपानी रमलाची रात्र ' या कवितेतील ती रमला अनंत रूपांनी येथे वावरते. ती रात्री वेगळी दिसते व या दुपारच्या जत्रेत वेगळी वाटते.

रविवार दुपारची जत्रा साऱ्या कुटुंबियांची. त्यात खरेदीच्या स्वारीवर निघालेल्या स्त्रियांची अधिक. रविवार असूनही या जत्रेसाठी ' मित्सुकोशी ' आणि ' मत्सूया ' ही दोन्ही प्रचंड मोठी डिपार्टमेंटल स्टोअर्स उघडी असतात. पुन्हा रस्त्यावर असंख्य वस्तूंची कमी किमतीत विक्री चालूच असते. त्यात मध्येच जवळच्या बारमधून बियरचे प्याले भर रस्त्यात घातलेल्या खुर्च्यांवर पाय पसरून बसलेल्या तरुण-तरुणींच्या घोळक्यात पोहोचविण्याचे काम चालू असते. आणि हे प्याले म्हणजे साधे ग्लासेस नव्हेत. टेबलावर पाणी भरून ठेवण्यासाठी जे जार्स आपण वापरतो त्या जार्समधून गिंझा बियर घेते. तो जार उचलण्याची ताकद असणाऱ्यानेच ती गिंझातील बियर घ्यावी.

जपानमध्ये कॉफी हाऊसेस अगर छोटया उपाहारगृहांत जे खाद्यपदार्थ मिळतात त्यांचे नमुनेच बाहेर काचेत लावून ठेवतात. लोकही स्वस्थपणे ते पदार्थ पाहून, त्यांवरच्या किमती वाचून नंतर आत जातात. पदार्थांची चिकित्साही मित्र-मैत्रिणींत, पति-पत्नीत मोकळेपणे चालू असते. इटालियन स्पगेटीचे बरेच अवतार मी या गिंझातील काचांआड पाहिले. जपानी लोक भात सदैव खातात. सकाळी ब्रेकफास्टलाही ते भात खातात. ' सुशी ' हे आपल्याकडे मुलीचे नाव. तेथे कच्च्या माशाच्या पदार्थाचे ते नाव. ' सुशी ' खाणार काय, असा प्रश्न करीत अनेक ' सुशी ' या काचांआड उभ्या असतात. भाताचे आवरण या कच्च्या माशाच्या तुकडयावर असते, व हा मासा पांढऱ्याउकडया भाताबरोबर गिळणे म्हणजे ' सुशी 'चा आनंद घेणे. ' तेम्पुरा ' हा गिंझातील सर्वांत आवडता पदार्थ. ' तेम्पुरा ' म्हणजे माशांची भजी. आपली तेम्पुराशी सहज मैत्री होऊ शकते. प्रचंड मोटार-वाहतूक असलेल्या टोकियोच्या भर रस्त्यावर खुर्च्या टाकून तेम्पुरासह बियरचा जार तुम्ही रिता करीत बसला आहात असे क्षणभर मनात आणा म्हणजे गिंझात बसल्या-सारखे तुम्हालाही वाटू लागेल.

हा सारा आनंद चुकवून समोर दिसणाऱ्या मित्सुकोशी या प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये शिरणे माझ्या जिवावर आले होते; परंतु तिथेही भरलेली माणसांची व वस्तूंची जत्रा पाहण्यासारखी होती. गिंझा या शब्दाचा अर्थच जत्रा असावा असे ते दृश्य पाहून वाटले. ही दुकाने म्हणजे जपानच्या उद्योगशीलतेची समृद्ध प्रदर्शने. लंडन, न्यूयॉर्कचीही अशी दुकाने मी पालथी घातलेली असल्याने मला तसे त्यात नावीन्य नव्हते; परंतु दुकानांतील वस्तू घेणारे नवे होते, वेगळे होते, वेगळ्या संस्कृतीचे होते, वेगळ्या आवडी-निवडी असणारे होते. मित्सुकोशीच्या दरवाज्यात दोन जपानी तरुणी उभ्या होत्या. आत शिरणाऱ्या प्रत्येकाला त्या सेंट लावीत होत्या आणि नंतर खुदकन हसत होत्या. त्यामुळे पुरुष लाजत होते. सेंटेड सुपारी-सारखी नाके असलेल्या त्या सेंटेड तरुणींना पाहूनच लोक दुकानात लोटत होते. नवऱ्याला सेंट लावले की पत्नीची होणारी प्रतिक्रिया पाहण्यासारखी होती. एकूण काय, जपानी स्त्री ही भारतीय स्त्रीसारखी असूयेने भरलेली !

त्या डिपार्टमेंटल स्टोअर्सचे मजले फिरत्या जिन्यांनी चढत गेलो. एका मजल्यावर किमोनोचा विभाग होता. हा विभाग न्यूयॉर्क–लंडनमध्ये दिसणारा नव्हता. अनेक स्त्रिया किमोनो घालून ‘ ध्यानस्थ ’ उभ्या होत्या. लहान मुलींचे किमोनो असतील अशी माझी कल्पना नव्हती; परंतु त्या मजल्यावर अर्धा डझन लहान मुली रंगीबेरंगी किमोनो पांघरून नृत्य करण्याच्या अभिनयात उभ्या होत्या. हे सर्व ‘ पुतळे ’ निर्जीव असावेत असे माझ्या मनात आलेच नाही. एका मजल्यावर चित्रकारांचेच दालन होते व त्यावर होता ‘ बियर गार्डन ’.

‘ बियर गार्डन ’ची कल्पना तशी जर्मनीची. परंतु मित्सुकोशी डिपार्टमेंटल स्टोअर्सने आपल्या सर्वांत वरच्या मजल्यावर हा ‘ बियर गार्डन ’ थाटला आहे. त्यात ३०० येनची आसाही बियर घेतली तर अर्ध्या तासाचा एक चित्रपट मोफत दाखविला जातो, आणि तोही विनोदी. चार्ली चॅपलिन हा बियर गार्डनच्या पडद्यावर अर्धा तास हसवून जातो व जाता जाता बियरचे घुटके देऊन जातो.

त्या गवसणीतून पुन्हा खाली उतरलो व गिंझाच्या त्या खुल्या रस्त्यावर आलो. एका कोपऱ्यात गर्दी दिसली म्हणून थांबलो. एक स्वारी तिथल्या तिथे चित्रे काढून देत होती. अर्थात हे दृश्य जगभर दिसते. एक सद्गृहस्थ आजूबाजूला कुणीच नाही अशा थाटात आपला टाय वगैरे सावरून बसला होता. चित्रकार व ग्राहक, दोघेही एकटेच आहोत अशा ‘ मूड ’मध्ये असल्याने थांबणाऱ्यांना चिंता नव्हती. या गिंझाच्या गर्दीत एका दुकानाच्या आडोशाला एक मळका पडदा लावून एक दुसरे सद्गृहस्थ एका युवतीला समोर घेऊन बसलेले दिसले. त्यांच्या डोळ्यांवर चष्मा होता. तो जपानी ज्योतिषी त्या मुलीचा ‘ हात ’ पाहत होता. टोकियोत अनेक ठिकाणी हे कुडमुडे ज्योतिषी नंतर दिसले. सहजपणे त्यांचे अस्तित्व लक्षातच येत

नाही इतके ते कोपऱ्यात आणि पडद्याआड बसतात; आणि तरुण पोरी स्टुलावर बसून आपले भविष्य अगदी तन्मयतेने ऐकतात. स्टुलावरच्या त्या नवरीचा हात व भवितव्य तूर्त तरी त्याच्या हाती होते. आणि त्याचाच थोडा खेद झाला.

या सर्वांचा परिहार करणारी गिझातील सर्वांत आकर्षक, अति धुंद अशी जागा म्हणजे बियर हॉल. जर्मनीत म्युनिकमध्ये बियर गार्डन आहे. जर्मनीत बियरोत्सव होतो, परंतु असा बियर हॉल मी कुठे पाहिला नव्हता. जवळजवळ हजार लोक एका हॉलमध्ये बियर पीत होते. गर्दीमध्ये असूनही अलिप्तपणे बसण्याची त्यांची ऐट अनुकरणीय होती. इतका प्रचंड, तितकाच सजविलेला; पुन्हा इतिहासाची साक्ष अनंत चित्रांच्या रूपाने आपल्या अंगा-खांद्यावर खेळविणारा. बियर हॉलची कल्पनाच मोठी रम्य आहे. या बियर हॉलमध्ये जाताना श्री. नरेश मंत्री बरोबर होते. श्री. नरेश मंत्री हे सर्वोदयवादी. गेली १२ वर्षे ते जपानमध्ये आहेत. परंतु जपानमध्ये पेय घेतल्याशिवाय राहणेच शक्य नाही हे लक्षात आल्याने त्यांनी सर्वोदयाला उदार रूप दिले. जपानमध्ये एका ग्लासातच, म्हणजे एका जारमधूनच दोघा-तिघांनी बियर पिण्याची पद्धत आहे. ती या हॉलमध्येही चालू होती. हा बियर हॉल बहुसंख्य तरुण-तरुणींनी भरलेला होता व साऱ्यांच्या हातांत ते प्रचंड जार्स बियरने भरलेले होते. एका वेळी सहा-सहा असे जार्स तेथील बेअरर दोन हातांत उचलून नेत असे. ते दृश्य पाहूनच मी बियर न घेता थंड झालो. रिकामे तर डझनभर उचलून आणत होता. कुठेतरी धरण फुटले असावे, बियरच्याच नदीला पूर आला असावा असे ते दृश्य होते. हॉलची सारी भिंत ऐतिहासिक चित्रांनी रंगविलेली होती. त्यात शोगून राजवटीची जुनी चित्रे होती. बियरऐवजी जपानी 'साके' हे तांदळापासून बनविलेले खास पेय घ्यावे असे आम्ही ठरविले होते. या साकेला काहीजण 'साकी' म्हणताना ऐकले. बियरचा जल्लोष चालू असताना आम्ही साकीची मागणी एका तत्पर युवतीकडे केली. दोन सुरेखशा छोट्या बाटल्या तिने आणून ठेवल्या व दोन लहानसे ग्लासेस. साकी ही गरम असते हे तोपर्यंत मला माहीत नव्हते. साकी ग्लासात ओतली व एक घोट घेतला. अतिशय सुरेख, पुन्हा थोडीशीच गरम, असे ते पेय मोठे छान आहे. 'साकी दिंडीने आमच्या संतांनी आपले काव्य फुलविले ते बहुतेक हीच साकी घेऊन,' असे मी गमतीने श्री. नरेश मंत्रींना म्हटले. परंतु आमच्या पलीकडे जपानचे तुकाराम–रामदास बसले होते व ते असे आम्हाला साकीवर समाधान मानून देण्यास तयार नव्हते.

एक भले मोठे कुटुंब पलीकडच्या टेबलावर होते. कुणीतरी जपानला आलेले हे परदेशी पाहुणे आहेत हे जाणून ते आमच्याभोवती येऊन उभे राहिले आणि आमच्या आरोग्यासाठी त्यांनी आपले बियर ग्लासेस वर उचलले. तो सबंध बियर हॉलच आता आमच्या आरोग्याच्या चिंतेने व्याकुळ झालेला दिसला.

'To your health' असा घोष झाला व त्यांनी आपले बियर जार्स पुन्हा तोंडाला लावले. आम्ही साकी घेऊन दिंडी म्हटली. त्यांपैकी एक स्त्री पुढे झाली. 'आता मी तुम्हाला पेय देणार,' असे म्हणून आमची उरलेली साकी तिने दोघांच्या ग्लासेसमध्ये ओतली. जपानची यजमानीण आता आमची सेवा करीत होती. तिच्या चेहऱ्यावर सारे आतिथ्य फुलले होते. पुन्हा जार्स व ग्लासेस वर झाले. आता जपानच्या आरोग्यासाठी आम्ही प्रार्थना केली. तूर्त सर्वांचे आरोग्य त्या बियरच्या जारमध्ये पूर्ण बुडालेले मला दिसत होते. गिंझाच त्या जारमध्ये बुडाली होती. बियर हॉल तर काचेवर चमकणाऱ्या निऑन लाइटसारखाच दिसत होता. 'दोझो' म्हणजे प्लीज, 'आरिगातो' म्हणजे आभारी आहे, या शब्दांव्यतिरिक्त तेथे काहीच ऐकू येत नव्हते. 'आरिगातो गोदाई मस्ता' असे आम्ही दोघांनी म्हणताच ते उसळलेच. आरिगातोला गोदाई मस्ता (म्हणजे खूप खूप आभारी आहे.) येथे सारखे लावले जाते. सारेच 'मस्ता' झालेले, तेथे आम्ही जपानी शब्द वापरल्याने ते बियरच्या फेसासारखे उसळले तर नवल नव्हते. एकच जल्लोष, तुफान धुंदी. क्षणभर वाटले, त्या ग्लासेसनाही, त्या जार्सनाही केवढी धुंदी चढली आहे ! सारी गिंझा झिंगली होती. दुपारची कुटुंबवत्सल गिंझा ओसरली होती. पुन्हा ते झगझगते दिवे लागले होते. मुखवट्यातील गिंझा डोकावू लागली होती. संगीताचे उडते सूर दुकानांच्या खिडक्यांवर आदळत होते. गिंझातील झिंग त्या लखलखत्या दिव्यांबरोबर झिम्मा खेळत होती. 'तुझे विजेचे चांदपाखरू दीपराग गात' असे कवी वाकीबाब कानात गुणगुणून गेले. 'झपूर्झा गडे, झपूर्झा' ही केशवसुतांची कविता आठवली. वाटले, असेच चालत राहावे. रात्रीची गिंझा कुठे नुकतीच उजाडली आहे.

□

"A man away from home need feel no shame."

—एक जपानी वाक्प्रचार.

# ३. आनंदनगरी टोकियो

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

टोकियोत दिवसभर लोहखनिजाची चर्चा चाले. ते काम संपल्यावर आनंदनगरी टोकियोत डुलत डुलत मी फिरत असे. नव्या नव्या शहरांत सिगारेटचे झुरके मारीत व आपण या शहरात अनेक वर्षे राहत आहोत अशा आत्मविश्वासाने हिंडणे मला फार आवडते. तोंड वासून पाटया वाचणारे, ट्रॅफिकला घाबरून नवखेपणा जाणवून देणारे हा गाववाल्यांचा नेहमीच थट्टेचा विषय असतो याची आठवण मनात बाळगूनच मी चालतो.

अशी नवख्यांची खूप थट्टा करणारा एक मिस्किल मार्गदर्शक टोकियो सफरीत मला भेटला व त्याने तो दिवस फुलवून टाकला. त्याने गळयाला लावलेला 'बो' त्याच्या निमुळत्या डोळयांइतकाच मिस्किल होता. जपानी लोकांवर तो विनोद करी व स्वतःच मोठयाने हसे. जपानच्या पर्यटक बसने आमचा प्रवास चालू होता. रस्त्यात अनेक छोटी बुद्धमंदिरे दिसत होती. बुद्ध-

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

धर्माबद्दल त्याने बोलणे सुरू केले. त्याचे इंग्रजी उच्चार लाडात बोलणाऱ्या पोरा-सारखे होते. तो म्हणाला, 'आम्ही जपानी लोक धर्माबद्दल एवढे 'पर्तिकुलर' नाही. आम्ही धर्माचं छान कॉकटेल केलं आहे. थोडा बुध (म्हणजे गौतम बुद्ध), थोडा जीसस, थोडे आमचे 'त्रादिशनल्'– यांचे कॉकटेल म्हणजे आमचा धर्म.' आणि तोच खूप हसला.

प्रथम तो आम्हाला टोकियो टॉवरला घेऊन गेला; परंतु सुरुवातीलाच म्हणाला, 'मी तुम्हाला तिथं घेऊन जातो, कारण कार्यक्रमातील तो पहिला विषय आहे. परंतु हा टॉवर कशासाठी बांधला हेच मला कधी कळले नाही.'

पण पुढे मिस्किलपणे हसत तो म्हणाला, 'धिसीज बिल्त तु अत्राक्त यू–तुरिस्ता,' आणि एकदम मान फेकून हसला. आम्ही त्याच्या 'ट'ऐवजी 'त'च्या उच्चाराला हसत होतो, तर तो आम्ही कसले मूर्ख; एक उंच टॉवर पाहायला चाललो, अशा अर्थी आम्हाला हसला होता.

उंचीचा पण माणसाला केवढा अभिमान असतो ! दिल्लीकर कुतुबमिनारची उंची सांगतो. मुंबईकर राजाबाई टॉवरची उंची पूर्वी सांगे. टोकियोत उतरलो आणि शहराकडे जाताना मिस्टर काकूंनी तो टॉवर मला प्रथम दाखविला आणि ते म्हणाले, 'पॅरिसच्या एफेल टॉवरपेक्षा हा उंच आहे.' आमच्या बसचा मार्गदर्शक नंतर तागडीसारखा अभिनय करून म्हणाला, 'आमचा तोकियो तॉवर हा एफेल तॉवरपेक्षा हलका आहे !' विनोद करण्याची एकही संधी तो गमावीत नसल्याने चटकन म्हणाला, 'मी काही हे दोन्ही टॉवर्स उचलून बघितले नाहीत ! परंतु तुम्ही ते जर तागडीत टाकलेत तर एफेल टॉवरची तागडी खाली जाईल !' आणि तो आमचा मार्गदर्शक चुकून पाय घसरून खाली गेला. सारी बस हसली. लहान मुले होती, त्यांनी टाळ्या पिटल्या.

आभाळाशी वेध घेणाऱ्या टॉवरकडे आम्ही चाललो होतो. तो मार्गदर्शक बडबडतच होता. टॉवरची १,०९९ फूट उंची त्याने सांगितली आणि जगात आमचा दुसरा क्रमांक असल्याचे सांगितले. मॉस्को मनोरा, टोकियो टॉवर व मग एफेल टॉवर, हे तिन्ही टॉवर्स आपल्याच मालकीचे असल्याच्या थाटात तो सांगत होता. जूनअखेरीस टोकियोची हवा पावसाळी. त्यामुळे मेघांची दुलई पांघरून आकाश सकाळी उठू न इच्छिणाऱ्या माणसाप्रमाणे पहुडले होते. टोकियो टॉवरकडे मी निघालो होतो तो माऊंट फुजीचे दर्शन व्हावे या हेतूने. पाच-सहा दिवस टोकियोत असूनही त्या महामुनीने दर्शन काही दिले नव्हते. अजून मी बसमध्येच होतो, व टोकियोतील ट्रॅफिक जॅममुळे ती सारखी थांबत होती. एक कोटीपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या या टोकियोत २० लाख मोटारी आहेत. विमानतळाकडून शहरात येणारा अगर शहरातून बाहेर जाणारा, असे काही रस्ते त्यांनी अमेरिके-

प्रमाणे भूमिगत बांधले आहेत, परंतु प्रत्यक्ष शहरात तसे रस्ते नाहीत. कारण जमिनीखालची जागा भुयारी रेल्वेने व्यापलेली आहे. लंडन, न्यूयॉर्क, टोकियो– सर्वच शहरांत ट्रॅफिकचे प्रश्न समान आहेत. या २० लाख मोटारींत आमची एक बस. ती हळूहळू चालली होती. मार्गदर्शक मध्येच म्हणाला, ' टोकियोचा काही भाग तुम्हाला पाहावयास मिळावा म्हणून आपण जरा सावकाश चाललो आहोत. पहा– या पर्यटन दौऱ्यात हे दाखविण्याचा समावेश नव्हता !' आणि तो पुन्हा हसला. त्याच्या बोलण्यापेक्षा हसण्याचे अधिक हसू यायचे. पर्यटकांना सतत आनंदात ठेवण्याचा त्याचा प्रयत्न होता.

जाता जाता त्याने जपानने शरणागती स्वीकारल्यावर जनरल मॅकआर्थर जेथे बसत असे ते कार्यालय दाखविले. तो क्षणभर खिन्न झाला. दुसऱ्या महायुद्धात ९० टक्के टोकियो अमेरिकन बॉंबहल्ल्यांनी कसे उद्ध्वस्त केले होते त्याची आठवण त्याला झाली. आजही जपानमध्ये २० हजार अमेरिकन सैनिक आहेत, आणि त्यांनी जपान सोडावे अशी जपानी तरुणांची मागणी आहे; परंतु टोकियोत मला एकही अमेरिकन सैनिक कधी व कुठेच दिसला नाही. त्याबद्दल चौकशी केली तेव्हा कळले की ते लष्करी गणवेषात शहरात कधीच येत नाहीत. साध्या नागरिकां-प्रमाणे ते शहरात येतात. ' जेते ' म्हणून ते आता वावरले तर जपानी राष्ट्र पुन्हा उठेल.

आमच्या गाईडने स्वतःला मोटारीत गुंतवून घेतले. तो युद्ध विसरला; परंतु थोड्या वेळाने दुसरेच काही सांगण्याच्या भरात चटकन म्हणाला, ' We were never defeated. ' बसमधले लोक हसले, तेव्हा तो जाग्यावर आला. मग म्हणाला, ' I know we were once defeated; but only once. ' आणि ' only once ' (एकदाच) या शब्दावर त्याने केवढा जोर दिला ! त्याने आणखी पुस्ती जोडली– ' आणि आम्ही ते विसरून गेलो आहोत. '

बसमधील सर्वांनीच मग ते विसरून जायचे ठरविले. कारण त्या पराभवाच्या राखेतून उभा राहिलेला टोकियो टॉवर ढगांशी खेळत आमच्यासमोर उभा होता. तेथे पोहोचल्यावर तो टॉवर कशासाठी बांधला याची कारणेही मिळाली.

टॉवरशिवाय शहराला शोभा येत नाही हे जसे खरे, तसा त्याचा उपयोगही किती करता येतो हे हा टॉवर पाहिल्याशिवाय कळणार नाही. त्या मार्गदर्शका-मध्ये जपानी माणसाचे अंतरंग मी पाहत होतो. या टॉवरमध्ये त्या उद्योगी माणसाची योजकता दिसली. निप्पन टेलिव्हिजन कॉर्पोरेशनचा हा टॉवर आहे व एकूण सात टेलिव्हिजन लहरी हा टॉवर प्रसारित करतो, दोन नभोवाणी केंद्रांच्या ध्वनिलहरी प्रसृत करतो, तर जपानच्या रेल्वेसाठी या टॉवरवरून खास ध्वनिलहरी जातात.

हा टॉवर म्हणजे एक वेधशाळा आहे. सर्व हवामानांत दिसू शकणाऱ्या

तांबड्या व पांढऱ्या पट्ट्यांनी तो टॉवर रंगविलेला आहे. सारे सामने, विविध कार्यक्रम या टोकियोच्या मनोऱ्यावर आधी विद्युत्‌लहरींवर येतात व नंतर जपान-भर पसरलेल्या टी. व्ही. व रेडिओ स्टुडिओजमध्ये पाठविले जातात. याशिवाय हा टॉवर एक वेगळे काम करतो. त्याचे मला महत्त्व वाटले. हवेच्या दूषितीकरणाचे अहवाल ह्या टॉवरवरील यंत्रणा सरकारला देते. टोकियोभोवती कारखानेही भरपूर आहेत. ‘World 's most polluted city,’ असे टोकियोचे वर्णन मी अनेकदा ऐकले होते. अर्थात अनेकांना ते मान्य नाही. टोकियोतील माणसाची आयुर्मर्यादा वाढली आहे असे एकाने मला सांगितले.

काही असो, टोकियो टॉवरवरून आता आम्ही टोकियो पाहत होतो. टोकियो-तील सर्वांत उंच ५५ मजली इमारत समोर दिसत होती. मार्गदर्शक म्हणाला, ‘बत व्ही वाँतेद समतिंग तॉलर.’ पुन्हा उंच उंच जाण्याच्या माणसाच्या आकांक्षेची कथा सुरू झाली. आता ८० मजली इमारत बांधली जात आहे. तिचे बांधकाम चाललेले त्याने आम्हाला दाखविले. न्यूयॉर्कमध्ये मी एंपायर स्टेट बिल्डिंगच्या मनोऱ्यावर गेलो, तर तेथून तेच सांगण्यात आले होते. तेथेही अधिक उंच इमारत बांधली जात होती. ती इमारत आता पूर्ण झाली असेल. मार्गदर्शक कदाचित सांगत असेल, ‘आम्ही आता त्यापेक्षा उंच इमारत बांधीत आहोत.’

जपानी माणूस उंचीने ठेंगणा, पण असेच उंच उंच बांधणारा. त्या टॉवरवर करमणूक भरपूर आहे. परंतु मला पाहावयाचा होता तो महामुनी फुजी– पांढऱ्या केसांचा, हिरव्या अंगाचा फुजी डोंगर. आकाश स्वच्छ असेल तर तुमच्या हॉटेलच्या खोलीतूनही तो दिसेल, असे मला अनेकांनी सांगितले होते; परंतु आता या टॉवर-वरूनही फुजीमहाराज काही दर्शन देण्यास तयार नव्हते. ‘नभ मेघांनी आक्रमिले’ या नाट्यगीताच्या ओळी गुणगुणत मी आकाशात पाहत होतो. शेवटपर्यंत फुजीने काही दर्शन दिले नाही. एखादी गोष्ट पाहून झाल्यावर तिचे आकर्षण संपते. ताजमहाल मी पाहिला नसता तर अधिक बरे झाले असते असे मला कधी कधी वाटते. माऊंट फुजी मी अखेरपर्यंत पाहिला नाही, आणि त्याचीच गोडी मला आता अधिक वाटते.

टॉवरवरून आम्ही गेलो ते टोकियोतील सुप्रसिद्ध मेयजी श्राईनमध्ये. बुद्धधर्म हा जपानमधील तसा प्रमुख धर्म; परंतु त्यातही शिंटो पंथाचे माहात्म्य जपान-मध्ये मोठे. टोकियोचे अखेर वैशिष्ट्य कोणते ? तर इतक्या भल्या मोठ्या शहरा-तही त्यांनी जतन केलेल्या बागा. राजवाड्याभोवती तर प्रचंड हिरवागार परिसर आहे. परंतु हा मेयजीचा मठ म्हणजे नुसते हिरवे नंदनवन आहे. भारतीय ऋषिमुनीं-प्रमाणे बुद्धमंदिरेही वृक्ष व वेलींच्या सहवासात वाढली. भारताचा बुद्ध समजण्या-साठी व त्याचे कार्य पाहण्यासाठी जपानला जावे लागते हे आश्चर्य खरे; परंतु

त्यांनी जे जतन करून ठेवले आहे तसे आपण कदाचित ठेवले नसते. त्यांनी हे सारे जतन केले याचे कारण त्यांनी बुद्धधर्मही जतन केला हे असेल. टॉवरच्या त्या वैज्ञानिक वातावरणातून आमच्या त्या मार्गदर्शकाने एकदम आम्हाला एका रानात आणून सोडले.

समोर एक उंच चौकट आमच्या स्वागताला उभी होती. दिल्लीच्या इंडिया गेटऐवजी एक लाकडी कमान उभी आहे व त्यावर एक लांब व दुसरी त्यापेक्षा कमी लांब अशा दोन फळ्या आडव्या टाकल्या आहेत, असे चित्र नजरेसमोर आणा. परंतु या कमानीला दाट हिरव्यागार वृक्षांची पार्श्वभूमी लाभलेली असल्याने या कमानीचे ऐश्वर्य काही वेगळे दिसते. ख्रिश्चनांचा ' अल्तर ' व हिंदूंच्या मंदिराचे प्रवेशद्वार यांचे काही मीलन मला त्या कमानीत दिसले. आणि त्यामधून पुढे गेल्यावर मेयजी या राजाचे भगव्या रंगाचे जे धर्ममंदिर दिसते ते विलक्षण सुंदर आहे. १८६८ ते १९१२ हा मेयजीचा कालखंड. लोकमताची कदर व्हावी, असा विचार-प्रकट करणारा मेयजी. त्यानेच ' इडो ' या शहराचे नाव टोकियो असे बदलले.

या मठात जाण्यापूर्वी सर्वांना आपले हात-पाय धुवावे लागतात, हिंदू मंदिरा-प्रमाणे पादत्राणे काढावी लागतात. हिरव्या चादरीवर तांबड्या माणकांचे एक सुंदर पॅगोडा पद्धतीचे मंदिर आहे. एखाद्या कुशल हाताने भरावे तसे हे हिरव्या वनश्रीतील भगव्या-लाल रंगातील मंदिर वाटते.

या मंदिराची वर्णने अनेक ठिकाणी आली आहेत. तेथे जे दृश्य मी पाहिले ते अजून समोर चित्रासारखे दिसते. समोरच्याच दालनात स्त्रियांची एक लांबलचक रांग उभी होती. प्रत्येकीच्या कडेवर अगदी लहान बालक होते, आणि त्या स्त्रीच्या मागे तिचा पती अपराध्यासारखा चेहरा करून उभा होता. डावीकडे एक बौद्ध शास्त्री उंच काळी टोपी घालून, पांढरा-लाल असा झगा घालून प्रार्थना म्हणत होता.

हे सारे काय चालले आहे त्याची चौकशी केली तेव्हा बुद्धधर्माने हिंदुधर्मा-तूनही काय घेतले ते पाहावयास मिळाले. मूल जन्माला आल्यानंतर बाळंतीण घराच्या बाहेर मुलाला घेऊन प्रथम जाते ती देवळात. टोकियोत सारे येतात ते या ऐतिहासिक मेयजी मंदिरात. साऱ्याजणी आपल्या नवजन्मलेल्या बालकांना घेऊन आल्या होत्या. पिते असे अपराधी चेहरे करून का उभे ते मग सहज लक्षात आले. त्यातही एक मजेचा भाग होता. त्या पित्यांमागे आणखी नातेवाईक उभे होते... म्हातारेकोतारे. सगळा कुटुंबवत्सल जपान तिथे जमला होता आणि शास्त्री-बुवांची प्रार्थना चालू होती. ती किडकिडीत स्वारी फार उंच दिसत होती. हा

शास्त्री एवढा उंच कसा म्हणून मी वाकून त्याच्या पायांकडे पाहिले. हल्लीच्या सर्व फॅशन्सना मागे टाकील असे उंच लाकडी बूट त्याने घातले होते. धूप वगैरे सर्व जळत होतेच. टोकियो हे अत्याधुनिक शहर मानले जाते; परंतु तेथेही नव्या-जुन्याचा संगम आहे. यंत्रयुगाला सावरणारी अशी बुद्धमंदिरे आहेत, जेथे धूप–नैवेद्य चालू आहेत.

१७५ एकर जमीन या मेयजीच्या स्मरणार्थ बांधलेल्या मठाने व्यापली आहे, यावरून त्याचा विस्तार कळून येईल. सबंध जपानमधून लोकांनी विविध तऱ्हेचे वृक्ष या बागेसाठी पाठविले. असे एक लाख वृक्ष तेथे आहेत. वृक्ष-वनचरांना तुकारामाने आपले 'सोयरे' म्हटले आहे. या सोयरे शब्दाची लज्जत अशा दाट वृक्षांच्या रांगांतून चालताना खरी कळते. या वृक्षांचा जो हिरवा रंग आहे तोही मला थोडा वेगळा वाटला. त्यात दोन-तीन वेगवेगळ्या छटा दिसल्या, व त्या झाडांचे वयही माणसांसारखे त्या चेहऱ्यांवरच्या हिरव्या छटांतून व्यक्त होताना दिसत होते. अनुभवातून आलेली परिपक्वता, तारुण्यातील अवखळपणा व बालपणातील अल्लडपणा यांचे दर्शन म्हणजे त्या वेगवेगळ्या हिरव्या छटा! मध्येच एक सहप्रवासी म्हणाला, 'दूरवर पहा.' आणि तेथे आकाश दिसले; निळेभोर, ढगांना चुकवून प्रगट झालेले. दोन्ही हात तरलतेने हलविणाऱ्या एखाद्या नर्तकीसारखे दिसणारे ते अध्यात्ममंदिरही क्षणभर मला वेगळे वाटले. नयनरम्यता हा काही स्त्रीचा गुण नाही. एखाद्या निर्जीव वास्तूलाही तो लाभू शकतो याचे दर्शन येथे घडले. स्त्रिया लहान बालकांना घेऊन आता परतल्या होत्या. नवे जपान माझ्यापुढून चालले होते.

मेयजीच्या मठातून आम्ही गेलो ते राजवाड्यासमोर. आणि तेथे जे दृश्य होते ते पाहून मी तर राजवाडा सोडून दिला. त्यासमोरचा हमरस्ता गिझाप्रमाणे मोटारवाहतुकीसाठी बंद केला होता, आणि तो खुला केला होता टोकियोच्या सायकलस्वारांसाठी. 'दि सीज अवर सायकल पॅरडाईज.' आमचा मार्गदर्शक दोन्ही हातांनी सायकल चालविण्याचा अभिनय करीत म्हणाला. राजवाड्या-समोरचा हा हमरस्ता रविवारी सकाळी सायकलस्वारांसाठी राखून ठेवला जातो– आणि जपानी कुटुंबे, आई-बाप, मुले– सारेजण आपल्या सायकली घेऊन येतात. जपानमध्ये सर्व सायकलीही गियरच्या असल्याने त्यांचे वजन कमी व वेग जास्त. पुन्हा त्यांस अनेक रंग. सायकली रंगीत, सायकलीवरचे लोक रंगीत– सारे वाता-वरण खुल्या रंगात भिजलेले. इतक्यात पावसालाही सायकलवर बसण्याची लहर आली. साऱ्या सायकली बाजूच्या बागेतील झाडाखाली आल्या. ते पॅरडाईज आता पावसात भिजत होते. मागे राजवाडा भिजत होता. आमचा मार्गदर्शक आमच्या-बरोबर उभा होता. तो म्हणाला, 'आमचा हा राजा १९२६ मध्ये गादीवर बसला.

गेली ५३ वर्षे तो गादीवर आहे. आणि राजपुत्र आकिहिटो आता ४३ वर्षांचा आहे. मोठा राजा जिवंत आहे तोपर्यंत या राजपुत्राला राजा कसे होता येईल ?' आणि पुढे हळूच म्हणाला, 'तू मच वेतिंग !' आणि सारे खळाळून हसले.

पाऊस थांबला होता आणि सायकल पॅरडाईज पुन्हा फुलले होते. टोकियोच्या हमरस्त्यावर पोरं मित्रांना शिट्या घालीत होती. ऐतिहासिक राजवाडा तिथंच उभा होता. मी वर्तमानात गुंतलो होतो, व त्यामधून बाहेर यावेसे वाटलेच नाही.

□

" And who knows why with so much labour he builds his house or how such things can give him pleasure ? Like the dew on the morning glory are man and his house, who knows which will survive the other. "

–The Hajoki.

# ४. नयनमनोहर नारा

जपानची आधुनिक राजधानी टोकियो, तर प्राचीन व सांस्कृतिक राजधानी नारा. जपानला गेलेला प्रत्येक पर्यटक क्योटो व नारा पाहण्यासाठी जातो. फुकुयामा येथील जपानमधील सर्वांत मोठा पोलाद कारखाना मी पाहण्यासाठी गेलो होतो, व क्योटो–नारा फुकुयामाच्या वाटेवर होते. रात्री परतताना क्योटोला येऊन मुक्काम केला व सकाळी उठून रेल्वेगाडीने क्योटोहून मी नाराला गेलो. नारा स्टेशनच्या बाहेरच पर्यटकांसाठी दौरे आखणाऱ्यांची कार्यालये होती. अर्ध्या दिवसाची नाराची सहल मी घेतली. सकाळी आठ वाजता मी नारात होतो. ८–१५ ला बस सुटायची होती. बसचे तिकीट विकत घेतानाच ते देणाऱ्या 'नारी'ने एक छोटी बॉक्स तिकिटा-बरोबर भेट दिली. हाताला ती जड लागली. तेथेच ती उघडून पाहणे बरे नव्हते; म्हणून बसमध्ये बसत त्या बॉक्स-

मध्ये काय आहे ते उघडून पाहिले. एक चिनी मातीची छोटी बशी होती व त्यावर 'नारा' एवढीच अक्षरे होती. नाराची केवळ स्मृती म्हणून तिकिटाबरोबर ती देण्यात मोठे औचित्य साधले होते. प्रत्येकाला ती छोटी भेट मिळाल्याने आनंद झाला होता. त्या बशीची किंमत तिकिटातच आमच्याकडून घेतलीही असेल; परंतु ती देण्याची पद्धत मला आवडली. टोकियाच्या मार्गदर्शकाने आम्हा सर्वांनाच खूप हसविले होते. नाराला मार्गदर्शक साहजिकच एक नारी होती. या नारीच्या खांद्यावर एक हिरवा झेंडा होता. तिच्या गटातील पर्यटकांची ती खूण. नारीच्या नव्हे, या झेंड्याच्या मागे आम्ही जायचे होते. या सांस्कृतिक राजधानीचे नावही पूर्वी कदाचित नारीच असावे. ऊन फारसे नव्हते. आकाशात ढगच अधिक रेंगाळत होते. जपानच्या पूर्वकालीन संस्कृतीचे दर्शन घेण्यासाठी आमची बस निघाली होती.

५५२ साली चीन व कोरियाच्या मार्गे बुद्धधर्म जपानमध्ये शिरला तो प्रथम या नारामध्ये. जपानमधील बुद्धधर्माचे नारा हे उगमस्थान. सहाव्या शतकापासून ते आठव्या शतकापर्यंत अशी दोनशे वर्षे बुद्धधर्माचा सर्व विकास या नारात घडला. ते ऐश्वर्य आजही जपानने जतन करून ठेवले आहे. नारा हे जपानच्या सांस्कृतिक चळवळीचे केंद्र झाले. सर्व तऱ्हेच्या कलांचे संवर्धन नाराने केले. ७८४ पर्यंत नारा हीच जपानची राजधानी होती. नंतर ती जवळच्याच क्योटोला गेली. बौद्ध भिक्षुकांनी भारतात असंख्य लेणी खोदली, डोंगर-दऱ्यांत वास्तव्य करून तेथे सुरेख प्रार्थनास्थाने निर्माण केली. तेच काम जपानच्या बौद्ध भिक्षुकांनी केले. त्यांचे शिल्प वेगळे होते इतकेच. मोठ्या दरवाज्यांच्या उंच लाकडी इमारती, पॅगोडा पद्धतीचे पायघोळ अंगरख्यासारखे छप्पर, प्रत्येक ठिकाणी लांब-रुंद पटांगणे, आणि हे सारे डोंगरांच्या गर्द झाडीच्या आधाराने बांधलेले. त्यामुळे ऋषिमुनींच्या वनविश्वात आपण विहारासाठी जात आहोत असे या प्रवासात सतत वाटते. अतिशय निमुळत्या रस्त्यावरून बस धावत होती, व तीही डोंगर-रानातून. एका वेगळ्या जगात आपण जात आहोत हे जाणवते. निसर्गाचे सान्निध्य हे भारताच्या व जपानच्याही जुन्या संस्कृतीचे मुख्य वैशिष्ट्य होते. ११०० वर्षांचे हे जुने जंगल असेच राहिले याचे कारण कोणतेही झाड तोडायचे नाही हा त्यावेळचा मुख्य कायदा होता. बस एका डोंगराच्या माथ्यावर येऊन थांबली. तेथे फक्त एक गच्ची असलेली आधुनिक इमारत होती. सबंध नाराचे दर्शन पर्यटकांना मिळावे या हेतूने डोंगरमाथ्यावर ती इमारत बांधलेली होती. गोव्यामध्ये झाडांतून चर्चचे क्रूस डोकावताना दिसतात, तशी डोंगरउतारावरील बुद्धमंदिरांची छपरे उन्हात चमकताना दिसत होती. बस तेथून निघाली नि प्रथम थांबली ती मान उंचावून आणि शिंगांचा डौल सांभाळून उभ्या असलेल्या हरणांसमोर. जुन्या ऐतिहासिक वास्तूमध्ये अनेकदा जो जुनाटपणा असतो किंवा भग्नतेची छाया असते ती नष्ट

करण्यासाठी तेथे काही सजीव गोष्टींचा उपयोग केलेला परदेशांत सर्वत्र दिसतो. त्यात येथील कासुगा मंदिरातील देव हा हरणावर बसून आला अशी कल्पना असल्याने देवाचा वाहक म्हणून येथे हरणाला खास मान. त्या परिसरात चैतन्य ओतण्याचे काम ही हरणे आज करतात व वनश्रीला शोभा आणतात. पर्यटकां-कडून मिळणारे खाद्यपदार्थ खाऊन धष्टपुष्ट झालेली ही हरणे पोरासोरांना अगदी गुंगवून टाकतात.तेथून जवळच नारामधील सर्वात भव्य असा दायबुत्सुदेन हॉल समोर दिसत होता. पॅगोडा पद्धतीची दोन भव्य छपरे या सभागृहावर आहेत. ती हात पसरून आपल्या छायेखाली आम्हाला बोलावीत होती. या सभागृहातील तोडायजी मंदिरात सबंध जगातील सर्वांत मोठा बुद्धाचा ब्राँझचा पुतळा आहे. भव्यतेचे केवढे आकर्षण या बौद्ध शिल्पकारांना असावे ! सूर्य हे जपानचे बोधचिन्ह. बोधचिन्ह सूर्यरूपी गौतम बुद्धापासूनच आले. कारण येथे प्रकाश देणाऱ्या सूर्याच्या रूपात बुद्धाला साकार केले आहे. या सूर्यरूपी बुद्धाच्या अस्तित्वातून इतका प्रकाश पसरावयास हवा की काळोखाचा कोपराही कुठे राहू नये. यासाठी तो बुद्धही भव्य आहे. तो दायबुत्सुदेन हॉल पाहूनच माणूस स्तिमित होतो. ४८ मीटर्स उंची या हॉलची आहे. इतका उंच, लाकडी बांधकाम असलेला यापेक्षा मोठा हॉल जगात नाही. नजरेच्या एका टप्प्यात इमारत पाहावयाची तर ती दुरूनच पाहावी लागते. त्या दर्शनी भागाची लांबी १८७ फूट आहे तर उंची १६० फूट आहे आणि आत ५३ फूट १ इंच उंचीचा बुद्धाचा पुतळा आहे. परमेश्वराच्या छायेत माणसाला देण्याची कल्पना या सभागृहाच्या शिल्पात असावी. या सभागृहाचे दुहेरी छत गरुडाच्या पसरलेल्या पंखांसारखे वाटले, व आत निवारा देणारा तो बुद्ध एका कमळावर आशीर्वाद देत होता. ५३ फुटांपेक्षा उंच असलेल्या या बुद्धमूर्तीचा केवळ चेहराच १५ फूट ८ इंचांचा आहे. ३ फूट ८ इंच तर नुसता डोळा आहे. १ फूट ५ इंच आकार नाकाचा आहे. कानाचा आकार ८ फूट २ इंच आहे. सारेच भव्य असावे, भव्यतेने आपण दिपून जावे असे तेथे गेल्यावर होते. पुन्हा या ध्यानस्थ मूर्तीमागे सिंहासनाचा डौल आहे. त्यामुळे सारेच शिल्प तसे आकर्षक दिसते. या पुतळ्याचे वजन ५०० टन आहे ७५२ सालात हे सारे उभारले. बुद्धधर्माचा प्रभाव त्यावेळी जपानवर होता याची साक्ष ते पटवून देते. दोन वेळा ही लाकडी इमारत जळाली. पुन्हा त्याच स्वरूपात ती उभारली गेली. आजची इमारत ही २५० वर्षांची जुनी आहे; परंतु तिने जुने जपान, जुनी संस्कृती व जुना धार्मिक प्रभाव यांचे जतन करून ठेवले आहे.

या साऱ्या संस्कृतीचे प्रतीक एकच होते व ते म्हणजे तऱ्हेतऱ्हेचे दिवे. दिव्याला किती आकार देता येतात याचे केवळ नमुनेच पाहावयाचे असतील तर नाराच्या वनराजीतील कासुगा श्राईन पाहावे. सध्या घरे, मोठे वाडे व हॉटेल्स

सजविण्यासाठी दिव्यांना वेगवेगळे आकार दिलेले आपण पाहतो. त्या सर्वांची उत्पत्ती या जपानच्या दिव्यांत आहे. जपानचे बोधचिन्ह सूर्य, व नंतरचा मान दिव्याला. प्रकाशाचे वेड असलेली ही माणसे. आणि तो प्रकाश पकडून ठेवण्यासाठी घर बांधायचे तेही किती सुंदर ! अष्टकोनी ! वर पुन्हा वर्तुळाकार झाकण, तर खाली कासवाच्या पायांसारखे खूर. या कासुगा श्राईनच्या पायऱ्या चढून नुसते पहिल्या सभागृहात गेलो तर काय, दिवेच दिवे. दगडी व ब्राँझचे तीन हजार दिव्यांचे नमुने येथे गोळा करून टांगून ठेवलेले आहेत. या मंदिराला समोर एक बाल्कनी व चांगले अंगण पण आहे. या अंगणात स्त्रियांचे नृत्य चालू होते. पोषाख एक हजार वर्षांपूर्वीचे. ते तांबडे-पांढरे अंगरखे त्या अंगणात नृत्य करताना हिरव्या तृणांकुरांनाही हळुवारतेने स्पर्श करीत होते, व मधूनच डोकावत ती शुभ्र पावले. हे सारे तीन हजार दिवे पेटवावेत व त्या प्रकाशात हे नृत्य पाहण्यास मिळावे असे मनात आले. आत शिरलो, तर पलीकडचा हॉल ओलांडून गेल्यावर डोंगरातून वाहत आलेला एक छोटा ओहोळ सहजपणे त्या इमारतीला बगल देऊन वाहत होता. पारिजातकासारखी झाडे उभी होती व एक रुक्मिणी तिथे दिमाखात उभी होती. या मंदिराची व्यवस्था पाहणाऱ्या जपानी जोडप्याचे ते घर होते. दोघांचा पोषाख हा धार्मिक परंपरेतील होता, परंतु त्यात संन्यासाची छाया नव्हती. जीवनानंद घेण्याचे औत्सुक्य चेहऱ्यावर ओसंडत असलेली युवती एक दिवा पुसत होती. तिने त्या झऱ्यातील पाण्यात आपला हात टाकला. तेव्हा क्षणात समोर उभी राहिली ती कण्वमुनींच्या आश्रमातील शकुंतला. तेथे हरण नव्हते एवढेच; परंतु कण्वऋषींच्या आश्रमातील शकुंतलाच तेथे झऱ्याच्या पाण्यात आपले निमुळते गोरे हात खेळवीत होत्या. जास्त वेळ पर्यटक येथे थांबतील याची कल्पना असल्यामुळे की काय, आमच्या या पर्यटक गटाचे नेतृत्व करणाऱ्या मार्गदर्शिकेने आपल्या हातातील झेंडा हलविला— गाडीने आयत्या वेळी शिटी देऊन हिरवा झेंडा हलवावा तसा— आणि आम्ही सारेचजण कण्वऋषींच्या आश्रमातून बाहेर आलो. शकुंतला वर राहिली होती व हरणांचा वेढा आमच्याभोवती पडला होता.

नारा हे अखेर देवळांचे क्षेत्र आहे, व तेथे पाच मजली व तीन मजली असे जे दोन पॅगोडे आहेत त्यांचे केवळ शिल्प पाहण्यासाठी लोक येतात. ७१० मध्ये बांधलेले कोफुकुजीचे मंदिर हे पाच मजल्यांचे आहे व ते पुन्हा एका तळ्याच्या काठी आहे. तळे व हे मंदिर यांमध्ये आता एक रस्ता झाला आहे, परंतु अजूनही त्याचे सौंदर्य कमी झालेले नाही. सध्या दिव्यांसाठी घराघरांत ज्या शेड्स वापरल्या जातात त्या बहुतेकांना या पॅगोड्यांचाच आकार दिलेला असतो. अशा पाच शेड्स मध्ये थोडा स्तंभासारखा भाग ठेवून त्या एकमेकांवर ठेवल्या व त्यावर एक मक्याचे कणिस खोवले तर कोफुकुजीचे मंदिर तयार होईल. दुसरे याकुशीजीचे जे

मंदिर आहे त्या पॅगोडयास तीन मजले आहेत व दीपमालेसारखा उंच तुरा वर खोवलेला आहे. तो दाखविण्यासाठी हिरव्या टोपीच्या, हिरव्या झेंडयाच्या त्या मार्गदर्शिकेने आपली मान त्या उंच तुऱ्यापर्यंत उडविली. आपली भारतीय तरुणी असती तर तिचे नाकही उडाले असते. येथे फक्त मान उडाली व ती म्हणाली, ' या शिल्पाला दुसरे एक नाव आहे– ' Frozen Music ' (गोठले गेलेले संगीत). सुंदराबाईची एखादी ठुमरी श्रोत्यांपुढे चिरस्वरूप देण्याची ही कल्पनाच किती न्यारी होती !

हिंदू संस्कृती व मंगोलियन संस्कृतीचे मिश्रण या बुद्धधर्मीय मंदिरांच्या शिल्पांत आढळते. सर्व मंदिरे लाकडी असल्याने त्यांचे स्वरूप एकदम वेगळे वाटते. आजूबाजूच्या वृक्ष-वेलींशी एकरूपता हे पॅगोडे सहजपणे साधतात व सारे एक-मेकांना कसे पूरक, पोषक वाटतात. तेथे जुन्या ऐतिहासिक वस्तूंचा व मूर्तींचा उत्तम संग्रह एका वस्तुसंग्रहालयात पाहावयास मिळतो. दत्तात्रेयासारखी तीन मुखे, सहा हात असलेली मूर्ती तेथे आहे. पाच पॅगोडयांच्या कोफुकुजी मंदिरातच ती पूर्वी होती. आता ती या म्युझियममध्ये आणून ठेवली आहे. जपानी माणूस भारतीयाप्रमाणे लोटांगण घालून गौतम बुद्धाला नमस्कार करताना मी पाहिला. फळे, फुले देवाला आणण्याची हिंदू परंपरा त्यांच्यातही दिसली. गौतम बुद्ध हा त्यांचा आज सर्वांत मोठा देव. आपल्यापुढे गौतम बुद्ध हा माणूस म्हणूनच अधिक आहे. खरे पाहता ज्यांना ज्यांना आपण आज देव मानतो तीही सारी माणसेच होती.त्यांच्या कर्तृत्वाने त्यांना देवपण लाभले– व आपल्याला आदर्श हवे होते म्हणून त्यांची मंदिरे आपण उभारली इतकेच. अखेर सारे Relative आहे. नाराचे सौंदर्य तेथे जतन केलेल्या वनराजीत आहे, डोंगराच्या चढ-उतारात आहे, व ही सारी देवळे स्त्रीच्या अंगा-वरील अलंकाराप्रमाणे या नाराला सजवतात. खादाड व उधळपणा करणारी हरणे ही करमणुकीसाठी– काही माणसांची प्रतीके म्हणून. ' आरिगातो गोदाई मस्ता ' म्हणजे ' थँक्यू व्हेरी मच 'चा पुकार त्या झेंडेवालीने केला व आमची बस पुन्हा नारा शहराकडे धावू लागली. जपानच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक राजधानीकडून आधुनिक जपानकडे आम्ही सारे पुन्हा चाललो होतो.

□

" भारताने अणुस्फोट केला या घटनेने मी व्यथित झालो "

—कोजी ओकोमोतो

# ५. कोजी आणि काझुए

卐 卐 卐 卐 卐 卐 卐

कोजी ओकोमोतो व त्यांच्या पत्नी काझुए ओकोमोतो यांची भेट श्री. नरेश मंत्री यांच्यामुळे झाली. श्री. नरेश मंत्री हे श्री. काका कालेलकरांच्या शिष्यवर्गापैकी एक. १२ वर्षांपूर्वी श्री. कालेलकरांच्याच प्रेरणेने ते जपानला गेले. तेथे त्यांनी जपानी विद्यापीठाची पीएच. डी.मिळविली. हे सारे त्यांना कोजी व काझुए यांच्या पितृमातृवत अशा प्रेमामुळेच शक्य झाले. ' त्यांच्या घरी तुम्हाला नेतो, ' असे मंत्री म्हणाले, आणि आम्ही टोकियोच्या भुयारी रेल्वेतून निघालो.

टोकियोची भुयारी रेल्वे ही लंडन, न्यूयॉर्क या शहरांसारखीच आहे. दोन ठिकाणी आम्ही गाडी बदलली व टोकियोच्या अशा एका विभागात आलो की तेथे पुस्तकांची दुकाने व प्रकाशन कंपन्यांचीच कार्यालये अधिक आहेत. ग्रंथनिर्मिती व विक्री यांचीही एक बाजारपेठ असावी या कल्पनेनेच मला मोहित केले.

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

रस्ता ओलांडून पुढे गेलो. उजवीकडे जवळच कोजी ओकोमोतो यांचे घर होते. घराच्या दाराशी पोहोचताच जपानी लयकारीत नरेश मंत्रींनी कोजींना साथ दिली. अगदी जपानी थाटाचे ते घर होते. डावीकडच्या एका लहानशा खोलीत अंकल कोजी बसले होते. ते त्यांचे कार्यालय. टेबलावर अनेक कागद पडले होते, आणि एक गोरागोमटा गोल आकाराचा देह एका खुर्चीत बसून आपल्या चष्म्यातून कशाचा तरी भेद घेत होता. मंत्रींची हाक ऐकताच ते गडबडीने उठले; परंतु त्यांच्यापेक्षा वेगाने समोरच्या जिन्यावरून त्यांच्या पत्नी काझुए आल्या. एक हसतमुख, हात उडवून बोलणारे व्यक्तिमत्त्व जिन्यावरून इतक्या खेळकरपणे उतरले, की क्षणार्धात वाटले, की मी माझ्या जवळच्या नातेवाईक कुटुंबात कितीतरी वर्षांनी आलो आहे. 'अरे, कधी आलास ?' असे सख्ख्या आत्याने अगर मावशीने विचारावे तसे दोघांनीही मला विचारले. आम्ही अजून घराच्या दारातच आतल्या बाजूस उभे होतो, आणि तेथेच चैतन्याच्या पहिला शिडकावा साऱ्यांवर झाला.

आम्ही बूट काढले आणि मी सवय नसल्याने तेथेच ठेवले. क्षणात ओकोमोतोंच्या पत्नीने उचलून ते जवळच मुद्दाम ठेवलेल्या रॅकमध्ये ठेवले. मी ओशाळलो. इंग्रजीत सॉरी म्हटले. परंतु त्यांना इंग्रजी कुठे येत होते ? काझुए व कोजी त्यावर दिलखुलासपणे हसले व म्हणाले, 'कशाचा संकोच करू नका व आत या' नरेश मंत्रींनी अनुवाद सांगितला तेव्हा मी मान डोलावली. मनात म्हटले, पत्रकाराला संकोच असतोच कुठे ?

घरात उजव्या बाजूला त्यांची एक छोटीशी खोली आहे. त्या खोलीत जाऊन बसलो. बसलो म्हणजे खुर्च्यांवर नव्हे. एका चौरंगाभोवती हातऱ्या टाकलेल्या होत्या. सारी बैठक जपानी पद्धतीची म्हणजे भारतीय पद्धतीचीच होती; आपण गाद्यागिरद्यांवर बसतो त्याच पद्धतीची ही बैठक, परंतु मध्ये एक छोटे चौरंगासारखे एक टेबल ठेवून त्याच्याभोवती बसतात. खोली तशी लहानशी होती, परंतु त्यात मग जी बैठक आमची सुरू झाली ती चार तास चालू होती.

'याच खोलीत बसून मी पीएच. डी.चा प्रबंध लिहिला.' मंत्री म्हणाले.

श्री. कोजी ओकोमोतो हे स्वतः सर्वोदयवादी आहेत. महात्मा गांधींच्या विचारप्रणालीचा प्रभाव त्यांच्यावर पडला व काका कालेलकरांच्या सहवासात आल्यावर तो वाढत गेला. जपानमध्ये टोकियोसारख्या आधुनिक शहरात कोजी ओकोमोतो हा एक जपानी गृहस्थ सर्वोदयवाद स्वीकारून तळमळीने काम करतो हे पाहून मला आश्चर्यच वाटले. 'सर्वोदय' या नावाचे मासिक ओकोमोतो चालवितात व त्यासाठी आर्थिक झीजही सोसतात. त्यांचा मुख्य पेशा शिक्षकाचा. त्याच घरात वरच्या मजल्यावरच्या खोलीत ते शिकवणीचे वर्ग चालवितात. क्लासेस चालविणाऱ्या कोणत्याही साठीशी आलेल्या व्यक्तिमत्त्वासारखे ओकोमोतो

यांचे व्यक्तिमत्त्व आहे. विद्यार्थी हा त्यांचा पहिला आवडता विषय, व दुसरा भारत. 'गेल्या जन्मी मी निश्चित भारतीय होतो,' असे ते बोलता बोलता म्हणाले ते अगदी उत्कटतेने. त्यांना मूलबाळ नाही. सारे विद्यार्थी ही त्यांची मुले. आणि ते विद्यार्थीही अध्ययन संपल्यावर त्यांच्याशी असलेले संबंध कधीच तोडत नाहीत असे दिसले.

आमची दुपारी तीनच्या सुमारास जी बैठक त्या चौरंगाभोवती पाय दुमडून सुरू झाली ती सातपर्यंत चालू होती. उजव्या बाजूला नरेश मंत्री बसले होते, डावीकडे अंकल कोजी, आणि समोरचा माणूस तासातासाला बदलत होता. अंकल कोजी मधूनमधून उठून जात असत. पाच-दहा मिनिटांनी ते परत येत. तेवढ्यात काझुएकाकी तेथे हजर होत. येताना प्रत्येक वेळी काहीतरी नवा पदार्थ खाण्यासाठी आणत. सर्वप्रथम बैठकीत सामील झाल्या त्या प्रा. कावाकामी. पन्नाशी ओलांडलेल्या या जपानी प्राध्यापिका मराठी भाषा शिकल्या आहेत. काही वर्षांपूर्वी त्या गोव्यालाही येऊन गेल्या. मितभाषी परंतु भारताबद्दलच्या अनेक गोष्टींत रस असलेल्या कावाकामी टोकियोतील जीवनाबद्दल जरा वेगळे बोलल्या. अमेरिकेचा प्रभाव टोकियोसारख्या शहरी जीवनावर अतिशय झालेला आहे असे त्यांचे म्हणणे होते.

'४० वर्षे आम्ही शेजारी शेजारी राहणारे लोक आता एकमेकांशी अनोळख्यांप्रमाणे राहतो. आम्ही सारे एकदाच एकत्र घराबाहेर आलो होतो— आमच्या विभागात एका घराला आग लागली होती तेव्हा !' त्या हसून म्हणाल्या.

हे बोलणे चालू असतानाच कोजीकाका एका अगदी तरुण प्राध्यापकांस घेऊन खोलीत आले.

श्री. मानाबू शिमिझू हे त्यांचे नाव. इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपिंग एकॉनॉमिज या संस्थेत करंट अफेअर्स डिव्हिजनमध्ये ते प्राध्यापक आहेत. पोरसवदा दिसणारा हा प्राध्यापक प्राध्यापकांपेक्षा जपानी तरुणांचाच मला प्रतिनिधी वाटला. समोरच्या जागेवर तो स्थानापन्न झाला. प्राध्यापिका कावाकामी जरा उजवीकडे सरकल्या. कोजीकाकांनी विषयाला सुरुवात करण्यासाठी हास्यविनोद सुरू केले. आम्ही बोलू लागलो आणि कोजीकाका पाच-दहा मिनिटांसाठी पुन्हा नाहीसे झाले.

एखाद्या गुरुकुलात चर्चासत्र बसवावे तसे कोजीकाकांनी माझ्यासाठी ते येथे बसविले होते. काझुएकाकी खाण्याचा मारा ठेवीत होत्या. सारे जपानी पदार्थ. त्यांची नावे सांगणे कठीण. चहा मधूनमधून चालूच होता. फळांचे विविध प्रकार समोर पडले होते. कोजीकाका सर्वोदयवादी, शिक्षक; म्हणून मी तेथे चार तास बसून सिगारेटही काढली नाही तर ड्रिंक्सचे काय ? परंतु गप्पा अशा रंगत चालल्या होत्या की वेळ व इतर गोष्टी यांचे भान आम्हाला राहिले नव्हते.

या तरुण प्राध्यापकाने मला जपानच्या विद्यार्थिजगात नेले. आज जपानमधील विद्यार्थ्यांपुढील सर्वांत मोठी समस्या कोणती, तर प्रमुख अशा विद्यापीठात प्रवेश मिळविणे. जपानमधील सर्वांत प्रमुख कंपन्यांतील अगर सरकारमधील नोकऱ्या या टोकियो विद्यापीठातीलच विद्यार्थ्यांना मिळतात. टोकियो विद्यापीठाचा तो विद्यार्थी आहे असे म्हटले की त्याला समाजात फार मोठे स्थान. त्यामुळे ग्रामीण विभागातील हुशार विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत आहे, असे प्रा. शिमिझूंचे म्हणणे होते. कारण तो अतिशय हुशार असला तरी त्याला टोकियोत येऊन राहणे कधीच परवडणार नाही. टोकियोच्या उपनगरात या प्राध्यापकांनी पूर्वी राहण्यास जागा घेतली तेव्हा त्यांना ३० लाख येन्स आगाऊ रक्कम द्यावी लागली. आता त्याच जागेसाठी एक कोटी येन्स द्यावे लागतील असे ते म्हणाले. तरी त्यांना शहरात येण्यास १ तास ५० मिनिटे लागतात. एका तासात जो टोकियोत पोहोचतो तो सर्वांत भाग्यवान समजला जातो. मला मुंबईत विरार, पालघर अगर कल्याण–कर्जतहून येणाऱ्या लोकांची आठवण झाली. शहरे वाढली, शहरांत सारे केंद्रीकरण झाले की समान प्रश्न कसे उद्‌भवतात त्याचे हे दर्शन होते. सामान्य वस्तीत एखाद्या विद्यार्थ्याला राहावयाचे असेल तर साधारण ३० हजार येन्स म्हणजे ७०० रुपये त्यास प्रत्येक महिन्यास हवेत. टोकियो विद्यापीठातील प्रवेश हे ग्रामीण विभागातील जपानी तरुणांचे आज स्वप्न बनले आहे. विद्यार्थ्याला कोणते विद्यापीठ मिळते यावर त्याचे सर्व भवितव्य ठरते. पदवी मिळणे मग विशेष नाही. जपानमध्ये केवळ भाषांचे अध्ययन उपलब्ध करणारे एक वेगळे विद्यापीठ आहे.

हे सारे चालू असताना कोजीकाका व काझुएकाकी त्या प्राध्यापकांस मधूनमधून सूचना देत. त्या जपानीमधून असल्याने मला कळत नसत. परंतु विविध विषयांवर दोघांनाही बोलके करण्याचा त्यांचा प्रयत्न त्यात असे. औद्योगीकरणाची चर्चा सुरू झाली तेव्हा जपानच्या या आर्थिक फुगवट्याने येथे वस्तू बनविणे किती महाग झाले आहे हे ते सांगू लागले. प्रा. शिमिझूंच्या मते जपानमध्ये वस्तूंचे पूर्णपणे उत्पादन करणे आता जपानला परवडणारच नाही, इतकी मजुरी येथे वाढली आहे. जपानमध्ये रस्त्यावर झाडू मारणाऱ्यास महिन्याला एक लाख येन्स (अडीच हजार रुपये) वेतन मिळते. जपानचे दरडोई वार्षिक उत्पन्न पाच लाख येन्स आहे. म्हणजे साधारण १२ ते १३ हजार रुपये होते. याचा अर्थ एक हजार रुपये मासिक उत्पन्न असलेले लोक आहेत, तसेच तितके उत्पन्न कमीत कमी जपानी माणसाचे आहे. मला हा आकडा कमी वाटला. जपानी माणसाचे दरडोई मासिक उत्पन्न हे दोन हजार रुपये तरी असावे. कारण जपानमध्ये खेडी, मागासलेली खेडी असा काही प्रकारच नाही. मोठी शहरे, लहान शहरे व गावे

असेच सारे जीवन वाटलेले आहे.

जपान–भारत संबंधाचा विषय निघाला. हे तरुण प्राध्यापक सहजपणे म्हणाले, 'जपानला भारतात आता फारसा रस उरलेला नाही. भारताने जपानला लोहखनिजाखेरीज काहीच दिले नाही.'

मी त्यांस अडवून म्हटले, 'एवढा गौतम बुद्ध भारताने दिला. बुद्धधर्म जपानला भारताने दिला– मग तुम्ही असे का म्हणता ?'

कोजीकाका ताबडतोब उत्तरले, 'तुम्हाला नको होता म्हणून तो धर्म तुम्ही आम्हाला दिलेला दिसतो !' आणि रुंद खांद्यावरील मान तिरकी करून ते एकदम हसले. पण थोड्या वेळाने गंभीर झाले व म्हणाले, 'भारताने अणुस्फोट का केला ? तो स्फोट केल्याचे वाचून आम्हाला फार दु:ख झाले.'

जपानी माणसाचे हृदय हिरोशिमा व नागासाकी या दोन ठिकाणी केलेल्या अणुस्फोटाने जितके विदीर्ण झाले आहे तितके कशानेच झाले नसेल. ही दोन्ही शहरे अमेरिकेच्या पैशांनीच पुन्हा बांधली गेली. परंतु उंच उंच घरे बांधली, शहर वसविले तरी जपानी मने काही सांधली गेलेली नाहीत. भारताने अणुस्फोट केला याचे कोजीकाकांना तर अतिशय दु:ख झाले. भारत या अणुशक्तीचा शांततेसाठीच उपयोग करील, अणुस्फोट केल्यापासून पाकिस्तान नरमले, दिल्लीला येण्याचे टाळणारे किसिंजर दिल्लीला आले; वगैरे सर्व सांगून पाहिले; परंतु ओकोमोतो पति-पत्नींना ते काही पटले नाही. कोजीकाकांनी एक चित्रांचा भला मोठा आल्बम आणला, त्यात हिरोशिमा व नागासाकी येथील अणुस्फोटानंतरची भयानक दृश्ये होती. 'ही चित्रे पहा आणि अणुस्फोटाचे समर्थन करा,' असे कोजीकाका थोड्या तडफेने बोलले. अतिशय मृदू,मुलायम हसणारा हा माणूस त्या वेदनानी अंत:करणातून पेटलेला दिसत होता. किंकाळ्या फोडणाऱ्या स्त्रियांची, मातांची, मुलांची ती चित्रे होती. जपानने शरणागती का पत्करली हे ती चित्रे पाहिल्यावर मला जाणवले. 'मानवतेचा संहार टाळण्यासाठी जपानची शरणागती' असा मथळा त्या वेळी वृत्तपत्रांनी दिला होता, त्याचा अर्थ मी त्या चित्रांत पाहत होतो, व त्याचे प्रतिबिंब ओकोमोतो पति-पत्नींच्या डोळ्यांत पडलेले दिसत होते.

'तुम्ही सर्वोदयाकडे कसे वळलात ?' असा प्रश्न मी कोजीकाकांना विचारला होता. 'त्याचे उत्तर आत्ता देतो,' असे म्हणून त्यांनी पुन्हा त्या चित्रांकडे बोट दाखविले. देशा–देशांचे आक्रमण व देशांतर्गत होणारी सर्व तऱ्हेची आक्रमणे यावरचा उपाय म्हणून आपण सर्वोदय तत्त्वज्ञानाकडे पाहतो असे ते म्हणाले.

हे बोलणे चालू असतानाच तरुण प्राध्यापक शिमिझू निरोप घेऊन आपला वर्ग घेण्यास निघून गेले. त्यांची जागा आता एका पत्रकाराने घेतली. प्रदूषण हा फार मोठा विषय या सर्व चर्चेत चालला होता. तो विषय चालू असतानाच

कोजीकाका उठले व पंधरा मिनिटे कुठेतरी जाऊन आले, आणि त्यामुळेच हा पत्रकार हजर झाला होता. 'आसाही शिबून' या जपानी भाषेतील दैनिकाचा खप ९५ लक्ष २० हजार इतका आहे. त्यांचेच 'मैनिची डेली न्यूज' हे इंग्रजी दैनिक निघते. मी सकाळीच या दैनिकाच्या प्रचंड कार्यालयात जाऊन आलो होतो व त्याच्या परराष्ट्र विभागाच्या संपादकांशी भरपूर बोलून आलो होतो. 'आमचे स्टाफ रिपोर्टर कैकिची किहारा आज रजेवर आहेत. नाहीतर त्यांची-तुमची भेट करून दिली असती,' असे त्या वृत्तपत्रसंस्थेच्या अध्यक्षांचे मुख्य सचिव मला म्हणाले. परंतु आमच्या कोजीकाकांनी कैकिची किहारा या स्टाफ रिपोर्टरला माझ्यासमोर त्या खोलीत हजर केले होते. त्यात किहारा रिक्त हस्ताने आले नाहीत. येताना जपानी मिठाई घेऊन आले. 'कोजी व काझुए यांच्या घरचे पाहुणे ते माझे पाहुण' असे आत शिरता शिरता ते म्हणाले व त्या गप्पानंदात सामील झाले. काही केक्ससारखे तर काही मैद्याच्या मिठाईसारखे ते पदार्थ होते. काझुएकाकींनी त्यांचा आधी ताबा घेतला व विद्यार्थ्यांना खाऊ वाटावा तसा प्रेमाने तो आम्हा सर्वांना वाटला. इंग्रजी यत नाही याची फिकीर न करता काझुएकाकी थेट जपानी भाषेत माझ्याशी बोलत. व उत्तराची वाट न पाहता पुढचे बोलत. भाषेच्या पलीकडचे काही संज्ञासूत्र असते, व माणसाचा चेहरा हा जगातील सर्व भाषांपेक्षा बोलका आहे, मनातील सारे काही प्रकट करणारा आहे, याची जाणीव या दोन चेहऱ्यांनी मला दिली. स्वतःवर त्यांचे अनेक विनोद चालले होते. पत्रकार आल्यावर दुसरे चर्चासत्र सुरू झाले ते प्रदूषणाबद्दलचे. त्याचा स्वतंत्र समाचार घेण्याइतके ते प्रचंड मोठे आहे.

चर्चा चालू होती. दुमडलेले पाय मी तर केव्हाच मोकळे सोडले होते. इतक्यात काझुएकाकी अनेक बशा घेऊन आल्या. माझ्यासाठी जपानी पद्धतीचे जेवण आणले होते. चमच्यांची जागा जपानी बारीकशा काठ्यांनी घेतली होती. बश्यांतून भात होता, तर दुसऱ्या बश्यातून सर्व कच्च्या माशांचे पदार्थ होते.' सुशी ' हा कच्च्या माशांचा पदार्थ या काका-काकींनी मुद्दाम आणला होता. पुन्हा आग्रह कमालीचा. आता अंकल कोजी अणुबाँब विसरले होते. चार तास चाललेली बैठक संपली ती उद्या पुन्हा भेटायचे असे ठरवूनच. सर्वोदयवादी कोजीकाकांच्या घरात सिगारेट तरी कशी प्यायची म्हणून मी खिशातील पाकिटाकडे गेलेला हात दोनदा आवरला होता. दुसऱ्या दिवशीच्या भेटीत कळले की कोजीकाका जे मधूनमधून उठून जात होते ते सिगारेट पिण्यासाठीच. दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळचा कार्यक्रम कोजीकाकांनी मोठा अपूर्व असा ठरविला होता. तो रविवार होता. सोमवारी मी पुन्हा जपान सोडणार होतो. शुक्रवारपर्यंत तर मी नुसता कामातच होतो. कोजीकाकांचे असंख्य विद्यार्थी. त्यांपैकी त्यांच्यावर पुत्रवत प्रेम करणाऱ्या

एकाने एक आधुनिक बार काढला होता. टोकियोतील हे बार्स म्हणजे एक ऐश्वर्य आहे. त्या बारमध्ये सर्वोदयवादी कोजीकाका आम्हा सर्वांना घेऊन जाणार होते. ठरल्याप्रमाणे तो विद्यार्थी सपत्नीक आला. आपल्या गाडीतून आपले सर्वोदयवादी गुरुवर्य, आमच्या काझुएकाकी, प्रिय मित्र नरेश मंत्री व मी या सर्वांना घेऊन तो आपल्या बारमध्ये आला आणि तेथे मग पार्टी सुरू झाली. जपानी सांतुरी व्हिस्कीत मी त्या दिवशी सर्वोदय पाहिला.

अंकल कोजींना मी थट्टेने म्हटले, ‘ विनोबांना काय वाटेल ?’

ते म्हणाले, ‘ आता येथे त्यांची चिंता नको.’

अर्थात त्याही पार्टीचा ताबा काझुएकाकींकडेच होता.

त्या विद्यार्थ्यास मी विचारले, ‘ तू दोघांना इतके का मानतोस ?’

तो म्हणाला, ‘ मला ते आई-वडिलांसारखेच आहेत. त्यांचे मोठेपण असे, की ते आपला मोठेपणा कधीच सांगत नाहीत.’

दोन दिवसांत हे कुटुंब स्वतःबद्दल कधीच बोलले नाही. त्यांचे घर भाड्याचे आहे. लाकडी पद्धतीच्या घरात वरच्या मजल्यावर त्यांची शिकवण्याची खोली आहे. तेथे फळा लटकलेला आहे. दुसरी एक खोली त्यांच्या निवासाची. परंतु जे आहे ते आनंदाने उपभोगणारे आणि मित्रांच्या सदैव शोधात असलेले हे जोडपे मला वेगळा आनंद देऊन गेले. त्या रात्री निरोप घेताना पुन्हा भेटण्याची आश्वासने होती, ‘ पुढच्या वेळी आमच्या घरीच राहा,’ असा आग्रह होता. आणि तो मनापासून होता.आणि ते भाग्य फक्त माझेच नव्हते. जे त्यांच्याकडे आले ते त्यांचे झाले. त्यांचे व्हिजिटिंग कार्ड मी उलटे करून पाह्यलेच नव्हते. त्यामागे त्यांनी स्वतःची व्यंगचित्रेच छापली होती. फक्त तोंडे. दोन गमतीदार, निर्मळ मनाची जपानी माणसे आपल्याकडे पाहून सारखी हसत आहेत असे त्या चित्रांचे स्वरूप होते.

□

"The frog in the well knows nothing of the ocean."

—एक जपानी वाक्प्रचार.

# ६. जपानी वृत्तपत्रांचे अफाट जग

'आसाही शिंबून' या जपानमधील सर्वांत अधिक खपाच्या दैनिक वृत्तपत्राचे मुख्य कार्यालय टोकियोतच आहे, व त्यामुळे तेथे भेट देण्याचा कार्यक्रम मी जपानमध्ये पोहोचतात निश्चित करून घेतला होता. 'न्यूयॉर्क टाइम्स'पासून लंडनच्या 'फ्लीट स्ट्रीट'पर्यंत अनेक वृत्तपत्रांची कार्यालये मी पाहिलेली असल्याने टोकियोतील 'आसाही शिंबून'चा व्याप किती मोठा आहे हे पाहण्यास मी उत्सुक होतो. अर्थात तो मला तितका मोठा वाटला नाही. मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया'इतकाच सर्व पसारा 'आसाही शिंबून'चा आहे. मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया'त 'हमादा' ही जपानचीच छपाई-यंत्रे आहेत. येथेही तीच पाहावयास मिळाली. येथे एकूण १२ छपाई-यंत्रे होती व प्रत्येक मशिनची दोन युनिट्स धरली तर २४ छपाई-यंत्रे येथे मला पाहावयास मिळाली. प्रत्येक मिनिटाला २,००० प्रती हे यंत्र

छापते, व त्यामुळे १ कोटी प्रतींच्या घरात खप असलेल्या या दैनिकाच्या सर्व आवृत्त्या या यंत्रावर छापल्या जाऊ शकतात.

जपान हा वाचणाऱ्यांचा देश म्हणून ओळखला जातो. अमेरिकेत दैनिक वृत्तपत्रांचा खप ६।। कोटी, रशियामध्ये ७ कोटी, ब्रिटनमध्ये जवळजवळ ३ कोटी तर जपानमध्ये हा खप आता ६ कोटींवर पोहोचला आहे. अमेरिका भारतापेक्षा तिप्पट मोठी आहे व जपानपेक्षा नऊपट मोठी आहे. भारतामधील एकूण ७९३ दैनिकांचा खप फक्त ९० लाख ५० हजार आहे. भारताची लोकसंख्या ५५ कोटी व जपानची लोकसंख्या १० कोटी ३५ लक्ष आहे. याचा अर्थ प्रत्येक दोन जपानी माणसांमागे एक वृत्तपत्र तरी विकत घेतले जाते. भारतामध्ये एक हजार लोकांमागे १५ वृत्तपत्रे खपतात. भारतामध्ये अजूनही निरक्षरता आहे वगैरे सर्व लक्षात घेतले तरी साक्षरांची संख्या १५ कोटी कमीत कमी आहे. निदान भारतामधील वृत्तपत्रांचा एकूण खप जपानइतका म्हणजे ६ कोटी असावयास हवा. पण तो अजून १ कोटीवरही पोहोचलेला नाही. भारतीय वृत्तपत्रांचा प्रभाव हा फक्त शहरांवर आहे असे म्हटले जाते, कारण या ९० लाखांपैकी जवळजवळ ७० टक्के खप हा शहरांतील मोठ्या दैनिकांचाच आहे. सबंध भारतामधील दैनिकांच्या एकूण खपापेक्षा (९० लाख) एकट्या 'आसाही शिंबून' या दैनिकाचा खप हा ९५ लाख म्हणजे ५ लाखांनी अधिक आहे, हा विचार अतिशय अस्वस्थ करणारा होता.

'आसाही शिंबून'च्या पायऱ्या चढून वर गेलो. त्यांच्या संपर्काधिकाऱ्यांनी माझे स्वागत केले व विचारले, 'आधी प्रेस पाहणार की चर्चा ?'

'प्रेस आधी पाहू या,' असे मी म्हटले व सरळ आधी उतरलो ते त्यांच्या छपाई-यंत्रांकडे.

या 'आसाही शिबू न'च्या एकूण १३ आवृत्त्या निघतात. त्यांची तीन सायं-दैनिके आहेत व त्यांच्याच १० आवृत्त्या निघतात. तीन ठिकाणांहून 'आसाही शिबून' प्रसिद्ध होते व एकूण चार शहरांत त्यांची मुख्य कार्यालये आहेत.

आज जागतिक वृत्तपत्रसृष्टीतील टेलिव्हिजन तंत्रानेच वृत्तपत्राचे संपूर्ण पान दुसऱ्या शहरात पाठविण्याची जी क्रांती झाली तिचा फायदा जपानने घेतलाच आहे. एक हजार किलोमीटर अंतरावर फक्त पाच मिनिटांत संपूर्ण पान 'आसाही शिबून'चे जाते व तेथे पाने पोहोचताच छपाई सुरू होते. प्रत्येक ठिकाणी स्थानिक बातम्यांचे पान फक्त वेगळे तयार केले जाते. 'आसाही शिबून'मध्ये फोटोग्राफी पद्धतीचे कंपोझिंग मात्र अजून आलेले नाही. त्यामुळे कंपोझिंग खात्यात लायनो-मशिन्सचे खडाडखट चालू होते.

कोणत्याही दैनिकाचा वृत्तविभाग हा आमच्या दृष्टीने महत्त्वाचा येथील वृत्त.

विभागातही ३ पाळ्यांत काम चालते व एकूण १९ विभागांत ते विखुरलेले आहे. परराष्ट्रीय विभागात अर्थात मी सर्वप्रथम गेलो, कारण भारताबद्दलच्या कोणत्या बातम्या तेथे आल्या आहेत हे जाणून घेण्याची उत्सुकता होती. भारतामध्ये दि. २६ जून रोजी आणीबाणी पुकारली गेली व दि. २८ जून रोजी मी ' आसाही शिंबून '-मध्ये गेलो होतो. तेथेही भारताबद्दलच्या बातम्यांबद्दल अतिशय औत्सुक्य होते. जपानमधील दि. २७ जूनच्या सर्व वृत्तपत्रांनी भारतामधील बातम्यांना मोठे मथळे दिले होते. ' जपान टाइम्स ', ' मैनिची डेली न्यूज ' ही जपानमधील दोन प्रमुख इंग्रजी दैनिके. दि. २७ जून रोजी सकाळी मी हॉटेलमध्ये खाली ब्रेकफास्टसाठी आलो व ७० येन्सची नाणी यंत्रात टाकून ' मैनिची डेली न्यूज ' हे १२ पानी पत्र विकत घेतले होते. त्या पत्रात श्रीमती गांधींच्या छायाचित्रासह आणीबाणीचे सर्व वृत्त दिले होते.

त्यामुळे एक भारतीय पत्रकार आपल्याकडे आला आहे असे कळताच त्यांच्या मुलाखती घेण्याऐवजी मलाच अनेक प्रश्न विचारावयास त्यांनी सुरुवात केली. अमेरिका, जपान व ब्रिटनमधील प्रगत वृत्तपत्रव्यवसायाचे सर्वांत मोठे लक्षण असे की, तेथे प्रत्येक विषयाचे specialisation असते व त्यामुळे संपादक विभाग हा फार मोठा असतो. येथे प्रत्येक विषयासाठी एक विभाग तर आहेच, परंतु केवळ वृत्तपत्राच्या ले-आऊटसाठी वेगळा विभाग येथे काम करीत असल्याचे मला पाहावयास मिळाले. भारतामध्ये पत्रकारांनी सहा तास फक्त काम करावे असे कायदा सांगतो. येथे सात तासांची ' ड्यूटी ' न्यूजरूममधील पत्रकारांना पडते. रेडिओ, टेलिव्हिजन, सर्व वृत्तसंस्था या सर्व बातम्या प्रसृत करणाऱ्यांचा उपयोग येथील वृत्तपत्रे सतत करतात. तरीही अखेर जगातील माणसे सर्वत्र सारखीच असावी.

' आसाही शिंबून 'च्या छायाचित्र विभागात मी गेलो व त्यांच्याकडे ' अनेक पतंग एका दोरीला लावून ते उडविणाऱ्याचे छायाचित्र असल्यास मला त्याची प्रत द्या,' असे म्हटले. ' जपानमध्ये एकाने एकाच दोरीला ४० च्या वर पतंग लावून ते उडविले व नवे रेकॉर्ड प्रस्थापित केले,' असे वृत्त भारतीय वृत्तपत्रांनी चौकटीत छापले होते, परंतु ' आसाही शिंबून 'च्या त्या विभागाला त्याचा पत्ता नव्हता. असे छायाचित्र आपण जपानच्या वृत्तपत्रांत पाहिले नसल्याचे तो म्हणाला. यावरून दोन गोष्टी संभवतात, की त्याचे छायाचित्र कुणी घेतले नसेल अगर त्या पतंगाचे छायाचित्र घेणे अशक्य झाले असेल. परंतु ते काही मला कुठे मिळू शकले नाही.

अखेर आमची चर्चाबैठक संपादकीय कार्यालयात सुरू झाली. आसाही शिंबून या वृत्तपत्रसंस्थेच्या अध्यक्षांचे सचिव श्री. माखातेरू शिगा व या दैनिका-

तील अग्रलेख लिहिणारे संपादक श्री. योशिफुमो सायटो ह्या दोघांची माझी भेट करून देण्यात आली. श्री. सायटो हे पूर्वी याच पत्राचे दिल्लीतील प्रतिनिधी होते. त्यामुळे दिल्लीतील अनेक भारतीय पत्रकार त्यांच्या परिचयाचे होते. ओळखी-पाळखी झाल्या, व्हिजिटिंग कार्डांची अदलाबदल झाली व बोलणे त्यांनी सुरू केले ते भारताबद्दलच. त्यांनाच मला अधिक विचारावयाचे आहे हे लक्षात येताच मी कोरियाचा विषय काढला. दि. २५ जूनच्या ' मैनिची डेली न्यूज 'मध्ये दोन संघर्षांवर फार चांगला लेख आला होता. १९७६ च्या नोव्हेंबरमध्ये अमेरिका अध्यक्षीय निवडणुकीत गुंतेल, त्या वेळी उत्तर कोरिया दक्षिण कोरियात आपले सैन्य घुसवील, असे इशारावजा भाकित दक्षिण कोरियाच्या अध्यक्षांनी केल्याचे या लेखात प्रसिद्ध झाले होते. त्याकडे मी श्री. सायटो यांचे लक्ष वेधले. ' २५ वर्षांपूर्वी ३८ व्या सीमारेषेवर थांबविलेला हा संघर्ष पुन्हा वाढवावयाचा की नाही हे बरेचसे चीनवर अवलंबून आहे,' असे ते म्हणाले. ' अमेरिका व चीन यांच्या मैत्रीची कसोटी कोरियात लागणार आहे,' असेही ते म्हणाले. कोरियाच्या सीमेजवळ रशिया आहे व एकूण रशिया, चीन, अमेरिका या तिघांच्या हातीच कोरियाची सूत्रे आहेत. निक्सनने पेकिंगला झेप घेऊन ज्या दिवशी चीनशी मैत्री प्रस्थापित केली त्या दिवशी दक्षिण कोरियाची सुरक्षितता वाढली. चीन–जपान मैत्रीने तर आता या परिसरातील सर्वच चित्र बदलून टाकले आहे. या सर्वांचे सुखाचे सहजीवन सुरू झाले आहे.

जपानची वृत्तपत्रे समारंभांना विशेष स्थान देत नाहीत. जपानमध्ये उद्घाटने नाहीत, व त्यामुळे त्यांची छायाचित्रे येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जपानी पत्रे ही उर्दूप्रमाणे शेवटच्या पानावरून सुरू होतात. त्यामुळे जपानमधील ' जपान टाइम्स ' ह्या इंग्रजी दैनिकातील अग्रलेखही शेवटच्या पानावर असतो, व तेथे ते लेख, एखादा कॉलम असे साहित्य छापतात. तेथे जाहिरात नसते. ' मैनिची डेली न्यूज ' मात्र पान दोनवर अग्रलेख टाकतात. ' आसाही शिंबूने 'चे ' आसाही इव्हिनिंग न्यूज ' हे सायंदैनिक शेवटच्या पानावर अग्रलेख प्रसिद्ध करते. ' मध्य-पूर्वेतील घटनांमध्ये जपानमधील सामान्य वाचकाला तितकासा रस नाही.' अग्रलेख लेखक श्री. सायटो म्हणाले. जपानवर तेलाच्या किमतीचा फार मोठा परिणाम झालेला नाही याचे मुख्य कारण असे की, तेलांचे फार मोठे साठे जपानमध्ये केलेले होते व त्याचा फायदा व्यापाऱ्यांना मिळाला. जपानमध्ये पेट्रोलचा दर लिटरला ९० येन्स म्हणजे साधारण अडीच रुपये आहे.जपानच्या एकूण आर्थिक जीवनमानाच्या दृष्टीने हा कमी आहे. अरब राष्ट्रांनी तेलांचे दर वाढविले तेव्हा जपानची प्रतिक्रिया फार उशिरा आली याचे हे साठेच कारण होते, असे त्या चर्चेतून दिसून आले. श्री. योशिफुमी सायटो यांनी सांगितलेली एकच गोष्ट मला अधिक खटकली.

'Japan's interest in India is diminishing.' ते म्हणाले. राजकीयदृष्ट्या भारत–जपान एकत्र येऊ शकले नाहीत, परंतु आर्थिक क्षेत्रात आपण अधिक एकत्र यावयास हवे होते. गोवा–जपान संबंध हे जितके निकटचे आहेत तितके उर्वरित भारताचे नाहीत हे खरे. परंतु 'हिंदुस्थान मशिन्स टूल'ने घड्याळांच्या निर्मितीसाठी जपानचेच सहकार्य घेतले; व आज 'हिंदुस्थान मशिन टूल्स'ची घड्याळे जागतिक कंपन्यांच्या मानाने अतिशय स्वस्त व त्यांची प्रतही उत्तम आहे. भारत व जपान ही दोनच राष्ट्रे आशियातील खऱ्या अर्थाने लोकशाही राष्ट्रे आहेत, व भारत हे आशियातील सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र मानले जाते याची आठवण हे दोन्ही पत्रकार मला सारखी करून देत होते. जपानच्या वृत्तपत्रांचा प्रचंड खप, त्यांचे स्वातंत्र्य व सामर्थ्य यांचे दर्शन घेऊन मी 'आसाही शिंबून'च्या पायऱ्या उतरलो.

अमेरिकेत अध्यक्ष निक्सन यांचे वॉटरगेट प्रकरण जसे वृत्तपत्रांनी उजेडात आणले, त्याचप्रमाणे जपानचे माजी पंतप्रधान तानाका यांची लाचलुचपतीची प्रकरणे जपानच्या वृत्तपत्रांनीच उजेडात आणली. मी तेथे असतानाच 'मैनिची डेली न्यूज' या टोकियोच्या इंग्रजी दैनिकात 'Tanaka's Money Scandal' या मथळ्याचाच अग्रलेख होता. या अग्रलेखाचे दोन उद्देश सरळ दिसत होते. जपानच्या डायेटने (संसदेने) तानाकांची सुरू केलेली चौकशी बंद केली होती, ती पुन्हा सुरू करण्याची मागणी या अग्रलेखात होती, तर त्याचबरोबर श्री. तानाका पुन्हा पंतप्रधानपदावर येण्याचा प्रयत्न करीत होते, तो हाणून पाडणे हा दुसरा उद्देश स्पष्ट दिसत होता. श्री. तानाका पंतप्रधानपदावर असताना त्यांनी आपल्या मालकीच्या अनेक कंपन्यांना अनेक सवलती दिल्या, त्यांमधून त्यांना लाखो येन्स मिळाले व त्यावरील प्राप्तिकर तानाकांनी चुकविला, हे आरोप या अग्रलेखात होते. तानाका यांनी साधारण २० लक्ष रुपयांचा आकार चुकविला होता. एवढे सर्व करूनही तानाकांचा गट लिबरल डेमॉक्रेटिक पक्षात पुन्हा डोके वर काढण्याच्या प्रयत्नात होता. त्यासाठी हा हल्ला होता. तानाकांच्या पाठीराख्यांनी वापरलेली एक जपानी म्हण या अग्रलेखात उद्धृत करण्यात आली होती. 'कोणतीही अफवा ७५ दिवसांपेक्षा अधिक टिकू शकत नाही,' अशी ती जपानी म्हण होती. व ती उच्चारण्यामागे उद्देश असा की, तानाकांबद्दलच्या 'अफवां'ना आता ७५ दिवस झाले असून लोक ते सर्व विसरले आहेत. अर्थात तानाकांबद्दलच्या अफवा नव्हत्या तर ते सत्य होते, अशी मल्लीनाथी या अग्रलेखात होती, व त्यासाठीच चौकशी पूर्ण करा अशी मागणी करण्यात आलेली होती. तानाकांच्या प्रकरणांची चाहूल जपानमधील वास्तव्यातच मला मिळाली.

एका जपानी मासिकानेच तानाकांची सर्व प्रकरणे नंतर उघडकीस आणली. लॉकहीड प्रकरण तर बाहेर आणलेच, परंतु त्यापूर्वी दुसरे एक तानाकांचे प्रकरण

जपानी वृत्तपत्राने ते पंतप्रधानपदावर असतानाच प्रकाशात आणले होते. त्याची हकीगत एका पत्रकाराकडूनच मी तेथे ऐकली. शिनानो गावा या नदीच्या पात्रातील वाळवंटासारखी पडलेली जमीन एका कंपनीने विकत घेतली. त्या कंपनीला नावही नव्हते. त्या वेळी त्या खरेदीचे कुणालाच काही वाटले नाही. परंतु काही वर्षांनी त्याच जमिनीतून रेल्वे व हमरस्ते काढण्यात आले– व सरकारने त्या जमिनीबद्दल भरपूर पैसे त्या धड नाव नसलेल्या कंपनीला दिले, तेव्हा पुढे ह्या सर्व उद्योगाचा पत्ता लागला. कंपनीचे डायरेक्टर कोण याची चौकशी सुरू झाली. ती कंपनी तानाकांचीच होती, व आपल्या एका सेक्रेटरीला त्यांनी डायरेक्टर करून ती कंपनी काढली होती. जपानच्या वृत्तपत्रांनी तानाकांची ही कॉर्पोरेशन्स, गुप्त बँक अकौंट्स, खोटी आयकर निवेदने शोधून प्रसिद्ध केली व अमेरिकेत ज्याप्रमाणे निक्सन यांना संपविले त्याचप्रमाणे तानाकांना राजीनामा देण्यास भाग पाडले. यामधूनच पुढे लॉकहीड प्रकरणाचा जन्म झाला. जपानचे हे वॉटरगेट. त्यात अखेर पंतप्रधान मिकीही वाहून गेले.

□

"We must not forget that a phoenix rises only from its own ashes, and that is not a bird of passage, neither does it fly on pinions borrowed from other birds."

--Inazo Nitobe in 'Bushido'.

# ७. जपानचे राजकारण

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

लॉकहीड प्रकरणाची शहानिशा करण्यापूर्वी जपानच्या एकूण राजकारणाचा वेध घेणे बोधप्रद ठरेल. टोकियोच्या टोलेजंग इंपीरियल हॉटेलमध्ये दुपारच्या जेवणाचे निमंत्रण जपानच्या परराष्ट्रखात्याच्या एका प्रमुख अधिकाऱ्याने दिले होते. श्री. तेत्सुया इंडो हे त्यांचे नाव. परराष्ट्रखात्याच्या आग्नेय आशिया विभागाचे ते संचालक होते. त्यांचे दुसरे सहकारी तोमोजी मुतोह हे हॉटेलमध्ये मी पोहोचलो तेव्हा माझी वाट पाहत होते. जपान सरकारचा दौऱ्यात स्वीकारलेला व मिळालेला हा एकमेव सरकारी पाहुणचार. एका कोपऱ्यातील टेबलावर आम्ही स्थानापन्न झालो व गप्पा सुरू झाल्या. अर्थात जपानच्या लोकप्रिय संतोरी व्हिस्कीचे पेग टेबलावर आले होते. चर्चेला सुरुवात मी चीनपासून केली. 'चीनशी असलेले पिढ्या न् पिढ्यांचे वैर तुम्ही एकदम कसे मिटविले ?' मी श्री. इंडो

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

यांना विचारले. गेली ३५ वर्षे तर चीन–जपानचे राजनैतिक संबंधही नव्हते. पंत-प्रधान तानाका पेकिंगला गेले व त्यांनी जपान–चीन संबंधाचे नवे पर्व सुरू केले. त्यांनी त्याच वेळी तायवानशी संबंध तोडले नाहीत.

'अमेरिकेने चीनबरोबरचे सहजीवन स्वीकारले; आम्हीही स्वीकारले.' श्री. इंडो म्हणाले.

'जपानच्या मालाला चीनची प्रचंड बाजारपेठ मिळविणे हा तुमचा उद्देश होता हे खरे काय?' या माझ्या प्रश्नाला मात्र नकारार्थी उत्तर मिळाले.

श्री. इंडो यांनी माझ्या पुढे चीन–जपानच्या ऐतिहासिक नात्याचे चित्र उभे केले. ते म्हणाले, 'चीनकडून जपानने अनेक गोष्टी घेतल्या आहेत. बुद्धधर्म चीन-मधून जपानमध्ये आला. जपानी भाषेची लिपी ही चीनकडून घेतली. कन्फ्युशियस हा आमचा मुख्य आधार. तो चीनकडून आम्ही घेतला.'

'Is it not delightful to have friends coming from distant quarters,' असे कन्फ्युशियसने म्हटले ते अनेक अर्थांनी.

'चीन कन्फ्युशियसला मानत नाही.' मी त्यांना म्हणालो.

'वरकरणी नाही– परंतु चिनी माणसाच्या मनात अजूनही कन्फ्युशियसचे तत्त्वज्ञान घर करून आहे.' उत्तर आले, 'त्याशिवाय उत्तर व्हिएतनाम कन्फ्युशि-यसला अजून मानतो.'

मी विषय कोरियाचा काढला. 'चीनशी राजनैतिक संबंध प्रस्थापित झाल्याने उत्तर व दक्षिण कोरियाचे उद्या युद्ध सुरू झाले तर चीन हस्तक्षेप करणार नाही असे तुम्हाला वाटते काय?' या प्रश्नावर श्री. इंडो ताबडतोब म्हणाले, 'व्हिएतनाम-सारखा कोरियाचा प्रश्न नाही. दोन्हींतील परिस्थिती वेगळी आहे. कोरियात जर युद्ध झाले तर ते गनिमी काव्याचे युद्ध असणार नाही. व्हिएतनाम व कोरिया यांची भौगोलिक स्थितीच वेगळी आहे. तेथे युद्ध समोरासमोर होईल, व उत्तर कोरियास ते मानवणारे नाही. रशिया व चीनलाही ते नको आहे.'

गप्पांत मॅकऑर्थरचा विषय निघाला. जपानमध्ये मॅकऑर्थर लोकप्रियही झाले व त्यांच्यावर टीकाही झाली. जपानच्या एका शेतकऱ्याला त्या काळात एका पत्र-काराने मॅकऑर्थरबद्दल विचारले, तर तो उत्तरला, 'The Emperor couldn't have picked up a wrong man.' एकूण, राजानेच त्यांची नेमणूक केली असे ग्रामीण भागातील सामान्य जपानी माणसाला वाटे. राजाला कोणत्याही स्थितीत ते कमी लेखण्यास तयार नसतात. आमच्या नव्या मित्राने ताबडतोब त्यावर एक जपानी म्हण सांगितली– 'The Emperor's army, if you win; the rebel army, if you loose.'

या चर्चेत स्पष्ट झाले ते असे की, जपानच्या राजाला इंग्लंडच्या राणीइतकेही

अधिकार नाहीत. राजा स्वागताला गेला तर गर्दी होते, इतकाच दृष्टिकोन त्यामागे आहे असे नव्हे. परंतु राष्ट्र एकत्र ठेवण्यासाठी त्याचा उपयोग होतो, व तितकाच उपयोग त्याचा केला जातो.

मी पुन्हा मॅकआर्थरचा विषय काढला. ‘ अमेरिकेचे अध्यक्ष ट्रुमन यांनी त्या वेळी मॅकआर्थरना परत बोलाविले. त्यावद्दल आज तुम्हाला काय वाटते ? ’ मी श्री. इंडो यांना प्रश्न केला.

‘ त्यांचा निर्णय अगदी बरोबर होता. जपानच्या तो हिताचा होता. नाहीतर चीन–जपान वैर कुठच्याकुठे गेले असते. ’

‘ जपानमध्ये आज अमेरिकेबद्दल इतकी अप्रियता का ?’ मी विचारले.

‘ अमेरिकेने जपानची जुनी जीवनपद्धती बदलण्याचा प्रयत्न केला असे अनेकांना वाटते. परंतु आज अमेरिका आम्हाला अण्वस्त्रांसाठी हवी आहे. अण्वस्त्रांवर जपानने स्वतंत्रपणे खर्च करावयाचे ठरविले तर आमच्या संरक्षण-खर्चावर त्याचा सर्व ताण येईल. ’ श्री. इंडो म्हणाले.

परंतु एक दिवस शेवटचा अमेरिकन जपानच्या भूमीवरून जाईल व दुसऱ्या महायुद्धातून निर्माण झालेल्या एका प्रदीर्घ राजकीय पर्वाचा जपानमध्ये शेवट होईल. या दोन राजनैतिक अधिकाऱ्यांशी आलेल्या बोलण्यातून मला हीच गोष्ट जाणवली. त्यांचा निरोप घेऊन मी निघालो तो जपानच्या संसदेकडे. दुपारी तेथे जाण्याचे ठरले होते.

टोकियोमध्ये फिरत असताना जाता-येता ही जपानच्या पार्लमेंटची इमारत दिसते, इतकी ती मध्यवर्ती ठिकाणी आहे. ‘ नॅशनल डायेट ’ या नावाने जपानची जनता आपल्या संसदेला ओळखते. मुंबईतील पारशी अग्यारीसारखा ‘ डोम ’ या नॅशनल डायेट इमारतीचा आहे. परराष्ट्रखात्याचा हिंदी शिकलेला तरुण जपानी अधिकारी माझ्या समवेत होता. त्याच्याबरोबर पायऱ्या चढताना अर्थात चर्चा सुरू झाली ती जपानमधील राजकीय पक्षांची. जपानमध्ये सतत लिबरल डेमॉक्रेटिक पक्षाचे सरकार अधिकारावर आहे. तानाका गेल्याने पक्षाचे सामर्थ्य वाढले असे या तरुण अधिकाऱ्याचे मत होते. नवे पंतप्रधान श्री. तकिओ मिकी हे एक आदर्श-वादी राजकारणी म्हणून मानले जात, व त्यांना सोशालिस्ट्स व डेमॉक्रेटिक सोशालिस्ट्स या दोन्ही पक्षांचा पार्लमेंटमध्ये पाठिंबा होता. १९३७ पासून ते जपानच्या संसदेचे सदस्य आहेत. ४९१ सदस्यांच्या या संसदगृहात त्या वेळी लिबरल डेमॉक्रेटिक पक्षाचे २७६ सदस्य असल्याने निर्णायक बहुमत होते व त्याशिवाय ११४ सोशालिस्ट्स व २० डेमॉक्रेटिक सोशालिस्ट्स त्यांच्यामागे होते. ३९ सदस्य कम्युनिस्ट पक्षाचे तर कोमेटो या पक्षाचे ३० सदस्य होते. कम्युनिस्ट व कम्युनिस्टविरोधी अशी साधारण विभागणी पक्षांत दिसली, व मग अधिक

समाजवादी, कमी समाजवादी असे फरक कम्युनिस्टविरोधी पक्षांत आहेत. दुपारी दोन वाजताच अधिवेशन सुरू होते. बाकीच्या सर्व कार्यपद्धती अगदी आपल्याप्रमाणेच दिसल्या. प्रश्नोत्तरे, कम्युनिस्ट सदस्यांचे पुन्हा पुन्हा उठणे, त्यांचे आवाज चढविणे, हे जाणवणारे; परंतु भाषा अपरिचित, त्यामुळे सारेच विनोदी वाटले. सात स्त्रिया जपानच्या संसद-सदस्य आहेत. त्यांत तीन कम्युनिस्ट पक्षाच्या आहेत. सभापतींवर अविश्वासाचा ठराव विरोधी पक्षाने त्या वेळी आणलेला होता व त्याची चर्चा त्यानंतरच्या आठवड्यात यावयाची होती. सरकारपक्षाने आणलेली विधेयके मंजूर व्हावीत म्हणून त्यांना दुसऱ्या दोन पक्षांशी हातमिळवणी करण्यास वेळ दिला, असा आरोप विरोधी पक्षाचा होता. तानाकांचा अंतर्गत गट बंड करील अशी विरोधी पक्षीयांची अपेक्षा होती. लॉकहीड प्रकरणाने ती नष्ट झाली. एकूण, सत्तासंघर्ष हा सर्वत्र समान आहे.

जपानचे राजकारण हे दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेचे राजकारण झाले, व त्याचबरोबर या पक्षांनीही अमेरिकेप्रमाणे पैशाचे सर्व खेळ सुरू केले. पंतप्रधान मिकी ह्यांचे हात स्वच्छ आहेत असे मानले जाते, तरी त्यांची एकूण मिळकत चार लाख डॉलर्स इतकी आहे. १९४१ मध्ये अमेरिकेबरोबर युद्ध करण्यास त्यांनी विरोध केला होता, हा आज त्यांच्याबद्दलचा जमेचा मुद्दा. १९६८ मध्ये निक्सन यांनी अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत जितका खर्च केला तितका खर्च १९७२ मध्ये तानाका यांनी आपल्या निवडणुकीवर केला. ३ कोटी ४० लाख डॉलर्स इतकी रक्कम निवडणुकीत उडविल्यावर ती भरून काढायलाच हवी !

ज्या डायेटमध्ये मी हिंडत होतो तेथे निवडून येणाऱ्या सदस्याला दर महिन्याला १६ हजार डॉलर्स खर्च करावे लागतात. आपल्या मतदारसंघाला खूष ठेवण्यासाठी ही रक्कम खर्च करावी लागते. या जपानच्या खासदाराला वेतन मिळते ३,३०० डॉलर्स! उरलेले पैसे त्याने कुठून उभे करावयाचे ? खासदाराच्या निवडणूकखर्चाचा अंदाज मी विचारला. तो कमीत कमी दोन लाख डॉलर्स ! भारताचीही स्थिती तशीच आहे. फक्त आपल्या जीवनमानानुसार आकडे बदलतात इतकेच. भांडवलशाहीचा पाश लोकप्रतिनिधींना कसा आवळत असतो याचेच हे चित्र होते.

तो आमचा तरुण मार्गदर्शक सर्व काही बोलत नव्हता. डायेटच्या त्या लोकप्रतिनिधिगृहात आम्ही पोहोचलो.

भारताप्रमाणे येथेही दोन सभागृहे आहेत. हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज् व हाऊस ऑफ कौन्सिलर्स अशी त्यांची नावे. मेयजी राजाने जी पहिली घटना जपानला दिली त्या घटनेनुसारच ही दोन्ही सभागृहे स्थापन झाली; परंतु दुसरे महायुद्ध संपेपर्यंत पंतप्रधान अगर त्याचे मंत्रिमंडळ हे जपानच्या राजाला

जबाबदार असे, लोकांना ते जबाबदार नसे. ३ नोव्हेंबर १९४६ रोजी नवी घटना जपानमध्ये जाहीर करण्यात आली व ३ मे १९४७ पासून तिचा अंमल सुरू झाला. तेव्हापासून हे पंतप्रधान व मंत्रिमंडळ या लोकप्रतिनिधिगृहास जबाबदार ठरले, राजा नामधारी ठरला.

या नॅशनल डायेटचा मुख्य दरवाजा उघडला जातो तो राजा संसद अधिवेशनाच्या उद्घाटनासाठी येतो तेव्हाच. पारशी अग्यारीसारखा जो डोम दिसतो त्याखाली राजाची स्वारी दरवाज्यातून प्रवेश करते. अर्थात पायऱ्यांपासून तांबडा-लाल गालिचा राजासाठी अंथरलेला आहेच. या वर्तुळाकार जागेत जे तीन पुतळे आहेत ते सर्वांचेच लक्ष वेधून घेतात. जपानचा पहिला पंतप्रधान राजपुत्र इटो एका कोपऱ्यात उभा आहे, तर दुसऱ्या कोपऱ्यात वासेटा विद्यापीठाची ज्याने स्थापना केली ते ओकुमा उभे आहेत. तिसरा पुतळा लिबरल डेमॉक्रेटिक या सत्तारूढ पक्षाच्या पहिल्या अध्यक्षांचा आहे. लिंकनप्रमाणे ओकुमांचाही नंतर खून झाला. जपानच्या संसदीय कार्यपद्धतीमधील या तीन व्यक्ती म्हणजे तीन टप्पे मानले जातात. त्यांना मुजरे देत जपानचा आजचा राजा हिरोहिटो या संसदेचे उद्घाटन करतो ते वरिष्ठ सभागृहातच. डायेटमध्ये आल्याबरोबर राजाला बसण्यासाठी एक प्रचंड मोठे दालन ठेवलेले आहे. गालिचे, उत्कृष्ट तोरणे, कोरीवकाम केलेली कपाटे, दारे– असे सर्व राजेशाहीला साजेसे दिवाणखान्याचे स्वरूप आहे; परंतु एवढ्या भव्य दिवाणखान्यात फक्त एकच खुर्ची व समोरचे टेबलही रेशमी वस्त्रांनी झाकलेले. कारण राजा बसल्यावर त्याच्या समोर कुणी बसायचा प्रश्नच नाही. पंतप्रधानांपासून सभापतीपर्यंत सर्व उभे.

जपानच्या प्रतिनिधिगृहाची रचना जवळजवळ भारतीय लोकसभेसारखीच आहे. आकार, प्रेक्षागृहे, वृत्तपत्र-प्रतिनिधी विभाग– सर्व सारखेच वाटले. एकच फक्त नवे दृश्य दिसते. ब्रिटिश संसदेतही छायाचित्रकारांना प्रवेश नसतो. येथे एक गॅलरी नुसती टी. व्ही. कॅमेऱ्यांनी भरलेली होती. जपानची संसद चक्क टी. व्ही.वर पाहता येते, तिची छायाचित्रे वृत्तपत्रांत प्रसिद्ध होतात; आणि त्यात नवेपण उरलेले नसल्याने त्यास एवढे प्राधान्यही दिले जात नाही. २ लाख २० हजार सदस्यांच्या मागे एक प्रतिनिधी संसदेवर प्रत्यक्ष निवडला जातो. जपानच्या वरिष्ठ सभागृहाची निवड वेगळ्या पद्धतीने होते. १०० सदस्य सरळ लोक निवडतात. इतर आपल्याप्रमाणे वेगवेगळ्या विभागांतून येतात. निवडणुकीपूर्वी अधिकारारूढ पक्ष जपानमध्येही राजीनामा देत नाही. त्यामुळे विरोधी पक्षांना सत्तासंपादनाची संधी मिळालेली नाही. सरकारपक्ष तेथे आपली सर्व यंत्रणा, अधिकार सत्ता टिकविण्यासाठी वापरतो. त्यामुळेच जपानमध्ये तरुण पिढीत फार मोठ्या प्रमाणावर असंतोष आहे. अनेक ठिकाणी बॉंबस्फोटाचे प्रकार चालू आहेत.

मध्यंतरी जपानच्या राजपुत्रावर बाँब टाकण्यात आला. या सर्वांचे वर्णन 'Mad fellows' या शब्दांत श्रीमंत जपानी माणूस करतो. अमेरिकन सैन्यदलातील एकही माणूस जपानच्या भूमीवर राहता कामा नये अशी कम्युनिस्ट पक्षाची मागणी आहे. जपानचे संसद-सदस्यत्व हे अमेरिकेप्रमाणे चार वर्षे मुदतीचे आहे. त्याला दोन सेक्रेटरी डायेटच्या खर्चाने मिळतात. त्यांचे वेतन, ऑफिसची जागा, विमान अगर रेल्वेचा पास या सर्व सवलती जपानच्या खासदाराला मिळतात. राजा संसद इमारतीत ज्या खुर्चीवर येऊन बसतो ती खुर्ची अखंड आहे. तिचे लाकडी भाग एकमेकांशी जोडलेले नाहीत व २७ पौंड सोने त्या खुर्चीवर आहे असे सांगण्यात आले. परंतु राजाची खुर्ची अखंड असली तरी ते अखंडत्व जपानी माणसांच्या मनात नाही. एकीकडे प्रचंड सामर्थ्याचा चीन, दुसरीकडे व्हिएतनाम-मध्ये झालेले स्थित्यंतर, दोन कोरियांची झुंज यांचे पडसाद तेथे उमटत आहेत. मी तेथे होतो तेव्हा जपानला आर्थिक मंदीने ग्रासले होते. त्यांनी कारखान्यांतील उत्पादन कमी केले होते. या सर्वांचे पडसाद जपानच्या डायेटमध्ये उमटत आहेत. लोकशाही ज्यांना हवी आहे त्यांनी लोकशाहीचा फायदा कमी उठविला तरच लोकशाही जपानमध्ये टिकू शकेल असे डायेटमधून परतताना वाटले. कारण जपानच्या राजकारणावर भांडवलशाहीची फार मोठी पकड आहे व त्यांच्या एकूण वर्तणुकीवरच जपानचे भवितव्य ठरणार आहे. जपानची ही 'पारशी अग्यारी' भव्य आहे, पाहण्याजोगी आहे; परंतु अखेर तिचे भवितव्य जपानच्या जनतेच्याच हाती आहे. लॉकहीड प्रकरणाने जनतेच्याच आकांक्षांना वाचा फुटली. वादाच्या लाटा सातासमुद्रात उफाळल्या आणि जपानमध्ये नवे पंतप्रधान सत्तेवर आले.

□

" Japan's modernisation had been accomplished in haste as a result of foreign pressures, the conscience and sincerity of the Japanese people had been lost and a shallow society, filled with deceit, had come into being. "

–Eminent Novelist Soseki Natsume

---

# ८. लॉकहीड : जपानचे वॉटरगेट

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

जपानचे एक ख्यातनाम कादंबरीकार सोसेकी नात्सुमे यांच्या वरील उद्गारांत लॉकहीड भ्रष्टाचार प्रकरणाचे सर्व सार आले आहे. १९४५ मध्ये जपानने पूर्ण शरणागती पत्करली व अमेरिकेला आपली दारे मोकळी करून दिली. जनरल मॅक-आॅर्थरने टोकियोमध्ये कार्यालय उघडले व जपानच्या पुनर्रचनेचे, फेरउभारणीचे कार्य हाती घेतले. त्याने कुळांना जमीन-मालक करण्याचा फतवा सर्वप्रथम काढला व त्याचबरोबर औद्योगिक विकासाचे नवे मार्ग जपानला खुले करून दिले. ' १९४५च्या पराभवात नव्या राष्ट्रीय उत्थापनाचा मार्ग आम्हाला दिसला, ' असे उद्गार जपानमधील वास्तव्यात त्यांच्या परराष्ट्र-खात्याच्या एका प्रमुख अधिकाऱ्याने चर्चेत माझ्याजवळ काढले होते, त्याची येथे आठवण होते. जपानच्या अर्थकारणाची बैठकच बदलली व ती जगत्व्यापी झाली. शेती हा जपानचा मुख्य व्यवसाय होता,

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

तो उद्योगधंदा झाला. उद्योगधंद्यातून तांत्रिक प्रगतीची क्षितिजे विस्तारली. १९४५ मध्ये महायुद्ध संपले त्या वेळी लोकसंख्येतील ४५ टक्के जनता शेतकरी अगर शेतमजूर या गटातील होती, ती १९६७ मध्ये १९ टक्क्यांवर आली. परंतु शेतीचे पूर्ण आधुनिकीकरण झाल्याने प्रत्यक्ष उत्पादनात २.४ टक्के वाढच झाली. आज जगामध्ये आर्थिक क्षेत्रात जपानचा तिसरा क्रमांक आहे, व येत्या २५ वर्षांत जपानचे दरडोई उत्पन्न हे सवंध जगात पहिल्या क्रमांकाचे असेल असा जपानी अर्थतज्ज्ञांचा दावा आहे.

हे सर्व कशामुळे घडले ? औद्योगिक क्रांतीतून जपानमध्ये हे सारे घडले. मोटार-उत्पादनाच्या क्षेत्रात जपानचा सबंध जगात दुसरा क्रमांक आहे. टोकियो शहराच्या रस्त्यावर धावणाऱ्या मोटारींचे नमुने पाहून घ्यावे. जपानच्या एका लेखकाने ही भरभराट पाहून एकदा इशारा दिला : ' मूल्यांचा गोंधळ होत चालला आहे. यामधून आपण परत जाऊ शकणार नाही.' (There is more and more confusion in values. There could be no turning back.)

लॉकहीड प्रकरण हे या मूल्यांच्या गोंधळाचे प्रकरण होते, व त्यामधून आता मागे फिरण्याची जपानला आशा नाही. एकेकाळच्या पंतप्रधानांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते ह्यात राष्ट्राची प्रतिष्ठा लयाला गेली असे मानणारा संतप्त जपानी तरुण तेथे आहे.

' Honour is heavier than the mountains, and death lighter than a feather, ' ही जपानच्या राजेशाहीची सैनिकांना शिकवण होती. डोंगर-पर्वतांपेक्षा देशाचा मान हा वजनदार होता, व त्यासाठी स्वीकारावा लागणारा मृत्यू हा पिसापेक्षा त्यांना हलका वाटे असा तो काळ होता. परंतु आज जपान बदलले आहे, व ते बदलले ते अमेरिकेमुळे. या परिवर्तनाची किंमत म्हणजे लॉकहीड प्रकरण. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने जपानचे पुनरुज्जीवन केले. परंतु त्या पुनरुज्जीवनात जपानचा आत्मा हरवला. पैशाचे विविध खेळ उभे राहिले. त्यांपैकीच हा एक.

' लॉकहीड एअर-क्राफ्ट कॉर्पोरेशन ' ही अमेरिकेतील एक विमान-उत्पादने करणारी कंपनी. तिच्या एका अधिकाऱ्याने अमेरिकन सिनेटच्या एका उपसमितीसमोर दिलेल्या साक्षीत असे सांगितले की, लॉकहीड कंपनीला ऑर्डरी मिळविण्यासाठी जगातील अनेक राष्ट्रांत कोट्यवधी डॉलर्सची लाच गेल्या दहा वर्षांत द्यावी लागली. अमेरिकेत ज्या जगव्यापी अशा उत्पादक कंपन्या आहेत त्यांच्या एकूण कारभाराची चौकशी सिनेटची ही उपसमिती सिनेटर फ्रँक चर्च यांच्या अध्यक्षतेखाली काम करीत होती. त्यात लॉकहीड कंपनीच्या तपासणीच्या वेळी ही माहिती बाहेर आली. त्याच सुमारास युरोपमध्ये लॉकहीड कंपनीचा प्रचारक म्हणून वावरत असलेला

अर्नेस्ट एफ. हॅन्सर याने आपली डायरी प्रसिद्ध केली व त्यातही अनेक गौप्यस्फोट केले. परंतु १९७२ मध्ये या हॅन्सरला पैसे खाल्ल्याच्या आरोपावरून शिक्षा झाल्यामुळे त्याच्या प्रसिद्धीला लोकांनी अधिक किंमत दिली नाही. परंतु सिनेटर फ्रँक चर्च समितीने हे प्रकरण पुढे नेले व त्यामुळे जगातील निदान सात राष्ट्रांच्या चौकशीचे सत्र सुरू झाले. जपान व डेन्मार्क या दोन देशांवर सर्वांत अधिक परिणाम झाला. पॅसिफिक महासागरात रशियन पाणबुड्यांचे वर्चस्व फार मोठे आहे ही आज अमेरिका व जपान, दोघांचीही खरी चिंता आहे. परंतु दोन्ही राष्ट्रांचे हित ज्या पाणबुडी विनाश करू शकणाऱ्या विमानांच्या खरेदीत होते ते बाजूला ठेवून लॉकहीड कंपनीचा माल जपानने घेतला. बेल्जियमचे २८ वर्षे राज्यावर असलेले ६४ वर्षांचे राजपुत्र बर्नहार्ड यांनी गेल्या २० वर्षांत जवळजवळ ११ लाख डॉलर्स लॉकहीड कंपनीकडून घेतले, असा उल्लेख हॅन्सरच्या डायरीत आहे. सिनेट सब-कमिटीपुढे या राजपुत्राचे नाव घेण्यात आले नाही. फक्त 'एक वरिष्ठ सरकारी पदाधिकारी' असा उल्लेख तेथे करण्यात आला. शेक्सपियरचा हॅम्लेट हा प्रिन्स ऑफ डेन्मार्क म्हणून आतापर्यंत आपल्याला परिचित होता. जगावे की मरावे, करावे की करू नये, असा डेन्मार्कच्या त्या राजपुत्रापुढे प्रश्न होता; परंतु तो नाटकातला. हा खरा असल्याने डेन्मार्कच्या या राजपुत्राला तसा संभ्रम पडला नाही. त्याने जे मिळाले ते घेतले. डेन्मार्कचे राजपुत्र हे त्या सैन्याचे प्रमुख या नात्याने सरकारी अधिकारीही मानले जातात. १३८ फायटर जेट्स त्यांनी या कंपनीकडून विकत घेतली.

लाचलुचपतीचे विविध प्रकार कसे असतात याची मनोरंजक माहिती 'टाइम' साप्ताहिकाच्या २३ फेब्रुवारीच्या अंकात दिली होती. आपल्याकडेही हेच प्रकार चालू आहेत. पक्षासाठी काही लाख घेणारे नेते अर्धेच आपल्या पक्षनेत्याकडे पोचवितात व अर्धे खिशात घालतात असे आपण अनेकदा ऐकतो. याला अमेरिकन पद्धतीत 'शेअरिंग' पद्धती म्हटले जाते. दुसऱ्या कार्यपद्धतीला 'पंडा पद्धती' म्हटले जाते. एखाद्या कामाबद्दल पैसे घेणे, परंतु ते आपल्या आवडत्या धर्मादाय संस्थांना देऊन टाकणे, हे दुसऱ्या पद्धतीत येते. डेन्मार्कच्या राजपुत्राने हे पैसे घेऊन काही चांगल्या संस्थांना दिले असावेत असा एक तर्क; परंतु तशा त्याच्या नावावर फार मोठ्या देणग्या कुठे नाहीत. त्यांच्या पाहुणचार पद्धतीत वारांगनांचा समावेश अधिक असतो. चौथ्या पद्धतीप्रमाणे डोळे मिटून स्वतःच्या खिशात पैसे टाकण्यात येतात.

एकूण या चारही पद्धती आज जगभर अमलात आणल्या जातात. तेच कार्य लॉकहीड कंपनीने केले. इटालीत अंतर्गत कारभाराचे जुईजी गुई हे ६१ वर्षांचे मंत्री यात सापडले व त्यांनी अलीकडे राजीनामा दिला. इटालीमध्ये कम्युनिस्ट व बिगर

कम्युनिस्ट यांचे द्वंद्वयुद्ध काही वर्षे चालू आहे, त्यात ही लॉकहीडची विमाने पडली. इटालीच्या संरक्षणमंत्र्यांनी जवळजवळ ११ लाख डॉलर्स १९७० मध्ये घेतले व त्या बदल्यात सी–१३० जातीची कार्गो प्लेन्स ६ कोटी डॉलर्स देऊन घेतली, अशी माहिती सिनेट उपसमितीकडे आली आहे.

पश्चिम जर्मनीतही या विषयाने वादळ उठविले. हॅन्सरच्या डायरीप्रमाणे माजी संरक्षणमंत्री फ्रान्स जोसेफ स्ट्रॉन्स यांच्या ख्रिश्चन सोशल युनियनला पैसे मिळाले असा आरोप आहे. १९५६ ते ६२ या काळात ते पश्चिम जर्मनीचे संरक्षण-मंत्री होते, व त्याच काळात ज्याची डायरी आज कमी महत्त्वाची मानली जात आहे त्या हॅन्सरची व या स्ट्रॉन्समहाशयांची चांगली मैत्री होती. इतकी, की हॅन्सरच्या एका मुलाचे पालनपोषण स्ट्रॉन्सने केले व त्याचे नावही फ्रान्स जोसेफ असे ठेवले. लॉकहीड कंपनीबरोबर एकूण जो व्यवहार पश्चिम जर्मनीने केला तो अनेक अब्ज डॉलर्सचा झाला. स्ट्रॉन्सने भरपूर पैसे घेतले असा आरोप हॅन्सरचा आहे; परंतु लॉकहीड कंपनीच्या वतीने ज्यांनी सिनेट कमिटीपुढे साक्ष दिली त्यांनी स्ट्रॉन्सचा उल्लेख केला नाही. स्ट्रॉन्सने आता हॅन्सरवर डायरीतील उल्लेखाबद्दल बदनामीचा खटला भरला– परंतु त्याच वेळी ‘स्टर्न’ या मासिकावर व रेडिओ आणि टेलिव्हिजन-वरही कोर्टाचा मनाई हुकूम बजावून आपल्याविरुद्धचे काही छापले जाणार नाही व टेलिव्हिजनवरही दाखविले जाणार नाही याची व्यवस्था केली. प. जर्मनीतील नियत-कालिके त्यांच्या बरीचशीं विरुद्ध आहेत. १९७१ मध्ये हे संरक्षणमंत्री न्यूयॉर्कला गेले तेव्हा एका वेश्यांच्या पथकानेच त्यांना इतके लुबाडले की त्याबद्दल तक्रार करण्याची वेळ त्यांच्यावर आली. एकूण, लॉकहीड पैशाबरोबर इतरही व्यवस्था करीत असल्याची माहिती यावरून खरी दिसते.

तुर्कस्थानमध्ये लॉकहीड कंपनीने नऊ लाख डॉलर्सची लाच स्टार फायटर विमानांच्या विक्रीसाठी दिली. स्वीडनमध्ये एअर-फोर्स जनरल डिक स्टेनबर्ग यांचे नाव घेतले गेले. त्यांनी तावडतोब स्वत:हून आपले प्रकरण अशा गोष्टींची चौकशी करणाऱ्या संसदीय समितीकडे दिले; व त्यांच्या चौकशीत स्टेनबर्ग निर्दोषी ठरले. सौदी अरेबियात राजघराण्यातील प्रमुखांना असेच पैसे विमानखरेदीसाठी द्यावे लागले. मध्यपूर्वेत मध्यस्थीचे काम ज्यांनी केले त्याचे स्वत:चे बोइंग ७२७ जातीचे विमान आहे, व लॉकहीडच नव्हे तर अनेक विमान कंपन्यांकडून त्यांनी पैसे घेतले व ते सौदी अरेबियाच्या राजांना दिलेच नाहीत. अरबांना विकत घेऊ पाहणाऱ्यांना अशीच अद्दल घडविली पाहिजे असे त्यांनी वर बोलून दाखविले. अदनान खाशोग्गी असे या अरबांची प्रतिष्ठा पैसे घेऊन जपणाऱ्याचे नाव.

निवडणुका तोंडावर आल्या असताना लॉकहीड प्रकरण निघाल्याने ते सत्तारूढ पक्षाला महाग पडले. भांडवलशाही राष्ट्रांचे भ्रष्टाचाराचे जाळे असे जगव्यापी

असते. जपानमध्ये तर लाखो येन्सची खोकी अधिकाऱ्यांच्या घरी भेट म्हणून गेली. त्या खोक्यांतील भुते आता उभी राहिली आहेत.

तानाका यांना पकडण्यासाठी दोघेजण सकाळी सहा वाजता त्यांच्या घरी आले. त्यांनी उत्तम सूट्स घातलेले होते. २५ खोल्या असलेल्या तानाकांच्या दारावरील बेल त्यांनी वाजवली. प्रथम एक नोकराणी बाहेर आली. त्या दोघांनी आपली कार्डस् दिली. ती कार्डस् तानाकांना देण्यात आली. टोकियो जिल्हा प्रॅसिक्युटर्स ऑफिसचे ते दोघेजण असल्याचे त्यांनी ओळखले. जपानी झग्यात असलेले ५८ वर्षांचे तानाका बाहेर आले. 'काही प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आमच्या कार्यालयात चला.' ते म्हणाले. आणि तानाका आपला आलिशान बंगला सोडून निघाले. त्यांची प्राथमिक चौकशी झाली व एकेकाळच्या या समृद्ध जपानच्या श्रीमंत पंतप्रधानाला ६ फूट रुंद व ९ फूट लांब अशा एका खोलीत नेऊन ठेवण्यात आले.

अर्थात तुरुंगाचा अनुभव तानाकांना अगदीच नवा नव्हता. १९४८ मध्ये कोळसाउद्योगातील भ्रष्टाचाराबद्दल त्यांना तीन आठवडे अशाच एका तुरुंगात आणून ठेवले होते. काकुसान या लोकप्रिय नावाने तानाका पूर्वी ओळखले जात. होन्शू बेटावरचा हा अडखळत बोलणारा तरुण वयाच्या १५ व्या वर्षी टोकियोला आला, त्या वेळी त्याच्या खिशात तीन डॉलर्स इतकी रक्कम होती. एक गाडगा घेऊन शहरात येणाऱ्या भारतीय मारवाड्यासारखा त्यानेही स्वउन्नतीचा मार्ग स्वतः शोधला. रात्रीच्या शाळेत तानाका शिकले, मंचुरियात युद्धआघाडीवर जाऊन आले, आणि त्यामधूनच उद्योगधंद्याला सुरुवात झाली. लष्कराला माल पुरविणाऱ्या कंत्राटाने त्यांना हात दिला. दुसरे महायुद्ध संपले त्या वेळी कोरियात गुंतलेल्या जपानी सैन्याला माल पुरविण्याचे जे कंत्राट त्यांना मिळाले होते ते दोन कोटी डॉलर्सचे होते. १९४७ मध्ये ते जपानच्या संसदेत शिरले ते कायमचे.

तानाका राजकीय आघाडीवर कसे यशस्वी झाले त्याचे जपानी भाषेतील उत्तर 'किंकेन' असे आहे. किंकेन म्हणजे अर्थशक्ती. ती अश्वशक्तीप्रमाणे सारी चक्रे फिरवते. अश्वशक्तीने यंत्रे फिरवता येतात तर अर्थशक्ती जग विकत घेत जाते. लॉकहीड प्रकरण म्हणजे जग विकत घेत जाण्याची यात्रा. हे यात्रेकरू वेगळे. लिबरल डेमॉक्रेटिक पक्षात तानाकांचा गट ९३ सदस्यांचा होता. मिकींच्या गटात फक्त ४६ सदस्य होते. यावरून तानाकांचे सामर्थ्य कळू शकते. या सर्व प्रकरणात दोन गोष्टी महत्त्वाच्या होत्या. जपानचे प्रॉसिक्युटिंग खाते स्वतंत्र आहे हे गृहीत धरले, तरी पंतप्रधान मिकी यांनी तानाका यांना वाचवावयाचे ठरविले असते तर ते शक्य झाले असते. परंतु मिकींना स्वतःची काळजी होती, व लोकमताचे दडपण इतके वाढले होते की त्यांना कारवाईखेरीज इलाज नव्हता.

या सर्व प्रकरणांचे अखेर आपल्या दृष्टीने महत्त्व कोणते ? लाचलुचपत ही जगभर आहे. पैसे चारल्याशिवाय टेंडर स्वीकारले जात नाही, व टेंडरबरहुकूम काम केल्यावरही बिले मिळविण्यासाठी पैसे द्यावे लागतात, ही परंपरा आपल्या भारतीय नोकरशाहीतही आहे. वॉटरगेट प्रकरणात टेलिफोन चोरून ऐकले– की जे सर्वत्र सर्रास चालते– त्यासाठी निक्सन यांच्यावर अशी वेळ आली व त्यांचे मोठमोठे सहकारी तुरुंगात गेले. हे लॉकहीड प्रकरण म्हणजे भांडवलशहांच्या देशात अनंत ठिकाणी घडणाऱ्या घटनांपैकी एक. वॉटरगेट व लॉकहीड या दोन्ही प्रकरणांत एक मूलतत्त्व आहे, की चोऱ्या चालतातच असे गृहीत धरून त्यांकडे आधी दुर्लक्ष करणे व ती पूर्ण पकडली गेल्यास कारवाई करणे हे अमेरिकन व जपान या दोन्ही लोकशाही राज्यपद्धतींत चालते. जपानचे पंतप्रधान मिकी यांचा हस्तक्षेप न होताही खटल्याचा प्रॉसिक्युटर तानाकांना पकडू शकतो व अमेरिकन सिनेट कमिटीच्या समितीला अशी चौकशी करता येते, हीच यामधील आशास्थाने आहेत. लोकशाहीचे हे अकुंश राजकर्त्यांची व नोकरशाहीची मान पकडून विचारू शकतात यातच या सर्व देशांचे पुन्हा सामर्थ्य आहे. जपानच्या डायेटमध्ये समाजवादी सदस्यांनी मागणी करताच चौकशीला सुरुवात झाली, व ' आमच्या मंत्रिमंडळातील एकालाही अटक झाली तर आपण राजीनामा देऊ ' असे आश्वासन पंतप्रधान मिकी यांना त्या वेळी द्यावे लागले.

यामध्ये अमेरिकन राजकारणही गुंतलेले आहे. अमेरिकेने शस्त्रास्त्रांचेच कारखानेच जास्त काढले, व ही शस्त्रे व विमाने विकण्यासाठी त्यांनी युद्धे निर्माण केली. या शस्त्रास्त्रांच्या कारखानदारांनी अमेरिकन निवडणुकीत पैसा ओतावयाचा, आपल्याला अनुकूल असे अध्यक्ष, असे सिनेटर्स निवडून आणावयाचे व पुन्हा सरकार-वर नियंत्रण ठेवावयाचे, असेच सतत चालले आहे. नाटो-सीटो करार या शस्त्रास्त्रां-वरच्या विक्रीसाठी त्यांना उपयोगी पडले. नाटो अधिकाऱ्यांनाही या लॉकहीड कंपनीने विकत घेतले व नाटोचा दबाव आणून जपानला त्यांनी विमाने घ्यावयास लावली. दोन कोरियांचे युद्ध झाले नसते तर जपानची युद्धोत्तर भरभराट झाली नसती. एकूण जगाला घेरणारा हा एक प्रचंड उद्योग आहे. शस्त्रे व लढाऊ विमाने ही त्यामधील सामुग्री आहे. विकत घेतलेली माणसे ही त्यातली प्यादी आहेत. राष्ट्रांचे अध:पतन हे त्याचे परिणाम आहेत. एक जबरदस्त रुपेरी हात तो खेळ चालू ठेवतो. राष्ट्रे म्हणजे अखेर माणसे. भ्रष्टाचारांनी ती विकत घ्यावयाची व अशा तऱ्हेने आपल्या छायेत त्या माणसांच्या राष्ट्रांना ठेवायचे, हे राजकारण ज्या अमेरिकेत चालते त्याच अमेरिकेत त्याला तोंड फुटते, किंबहुना फुटू शकते. अमेरिकेची प्रचंड बदनामी आतापर्यंत अमेरिकनांनीच केली आहे. ' U. S. has

come to live under a system of Government by leak,' असे मत वॉशिंग्टनच्या राजकीय निरीक्षकांचे आहे. जगातील दारिद्रय, धान्याची तूट ही एका बाजूला, तर दुसरीकडे वॉटरगेट व लॉकहीडची अस्वले गुदगुल्या करीत राहतात. हसणाऱ्यांना सुरुवातीला कळत नाही, की अस्वलाच्या गुदगुल्या या माणसाला मरणाच्या दाराकडे नेतात. त्या स्थितीत आज सारे आहेत. ज्यांनी ज्यांनी हे पैसे घेतले त्यांनी त्यांनी देशद्रोहच केला. सामान्य माणसाची सदसद्‌विवेक-बुद्धी कोणत्या तरी समितीच्या रूपाने अखेर एक दिवस उभी राहते. खूप अंधारलेल्या खोलीत मेणबत्ती पेटवावी तसे तिचे सुरुवातीला रूप असते, परंतु अखेर तो दिवा मोठा होतो; आणि तो प्रकाश ज्यांच्या डोळयांना सहन होत नाही असे लोक तो दिवा विझव् पाहतात. परंतु असा दिवा कधीच विझत नाही. माणसाच्या जन्मा-पासून हा दिवा घेऊन कुणीतरी चालत आला आहे, व ती चाल थांबलेली नाही. वॉटरगेट संपलेले नाही. लॉकहीडने मिकी यांना अखेर सत्ताभ्रष्ट केले. थायलंडमधील अमेरिकनांना विद्यार्थ्यांनी अखेर भूमी सोडावयास लावली. जपानमधील शेवटचा अमेरिकन परत जाण्याचा दिवस दूर नाही, व त्याचे श्रेय या लॉकहीड प्रकरणाकडे असेल. काही विमाने न उडताच पडतात ती ही अशी !

□

" Dumplings are better than flowers. "

—एक जपानी वाक्प्रचार.

# १. जपानचे पोलादी अर्थकारण

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

ब्रिटनपेक्षा आकाराने थोडे मोठे व अमेरिकेतील कॅलिफोर्निया या एका राज्यापेक्षा लहान अशा ह्या जपानचे राहणीमान आज आशियात सर्वांत अधिक आहे. अमेरिका, रशिया, प. जर्मनी व जपान असे क्रमांक आज आर्थिक जगाचे आहेत; परंतु दोन हजार साली या जपानचे दरडोई उत्पन्न अमेरिकेच्या पुढे जाईल असा अर्थशास्त्रज्ञांचा अंदाज आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या राखेतून हे राष्ट्र पुन्हा उभे राहिले ते अर्थात अमेरिकेच्या मदतीने. पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांनी जर्मनीचा पराभव केला, परंतु शत्रुत्व नाहीसे झाले नव्हते. त्यामुळे दुसरे महायुद्ध झाले. शत्रूचा पराभव करणे व शत्रुत्व नाहीसे करणे या दोन गोष्टी फार वेगळ्या आहेत, हे ब्रिटन–अमेरिकेला दुसरे महायुद्ध झाल्यावर जाणवले व त्यांनी जर्मन आणि जपान या दोन्ही पराभूत राष्ट्रांच्या पुनरुत्थानाचे कार्य

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

हाती घेतले. १९४५ ते ५२ ही सात वर्षे जपानच्या अर्थकारणाची सूत्रे अमेरिकेच्या हाती होती. ज्या हिरोशिमा व नागासकी बेटांवर त्यांनी अॅटमबाँब टाकले तेथे त्यांनी नव्या प्रचंड इमारती उभ्या करून दिल्या. शेतीप्रधान अर्थव्यवस्थेकडून शेती व उद्योग अशा मिश्र अर्थव्यवस्थेकडे जनरल मॅकआॅर्थरने जपानला नेले.

टोकियोतील जनरल मॅकआॅर्थरच्या निवासस्थानावरून आमची टूरिस्ट बस जाताच येथे मॅकआॅर्थर याचे कार्यालय होते अशी माहिती त्या मार्गदर्शकाने दिलीच, परंतु कसणाऱ्या शेतकऱ्याला जमीनमालक करण्याचे काम मॅकआॅर्थरने केले असे तावडतोब सांगून टाकले. जपानमधील १७ टक्के जमीन ही कोणत्याही लागवडीस योग्य अशी आहे. डोंगराळ भाग पुष्कळ आहे, व त्यामुळे कमी जमीन व भरपूर माणसे ही जपानची समस्या आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी या १७ टक्के लागवडीयोग्य जमिनीपैकी अर्ध्या जमिनीची मालकी ही फक्त सात टक्के शेतकऱ्यांच्या हाती होती. ७० टक्के कुळे होती व भरमसाट खंड त्यांच्याकडून जमीनदार वसूल करीत असत. कुळाला जमीन विकत घेण्याचीही संधी नव्हती. १९४५ च्या डिसेंबरमध्ये मॅकआॅर्थरने फतवा काढून सर्व कुळांना जमीनमालक करून टाकले. गैरहजर जमीनमालकांना कायद्यानेच आपल्या जमिनी सरकारला विकाव्या लागल्या, व त्या जमिनी जुन्या कुळांना मिळाल्या. १९५१ पर्यंत १६ लक्ष ७० हजार एकर जमीन कुळांच्या मालकीची झाली. जमीनमालकांना नुकसानभरपाई कमी मिळाली. परंतु तेव्हापासून जपानमधील शेतीतील जमीनदारी संपली व शेतीचे नवे युग सुरू झाले. शेतीपुरते लोक शेतीत राहिले व इतर उद्योगधंद्यांकडे वळले. जपानच्या लोकसंख्येपैकी ४५ टक्के लोक शेतमजूर होते. त्यांची संख्या १९६७ पर्यंत १९ टक्क्यांवर आली, परंतु शेतीचे उत्पन्न मात्र वाढले. जपानी माणूस जसा उद्योगी, तसेच त्या राष्ट्राचे धोरणही उद्योगप्रधान कसे आहे याचे एक उदाहरण एकाने सांगितले. एका बँकेकडे दोन तरुणांनी कर्जासाठी अर्ज केले. बँकेने हे तरुण काय तयार करीत आहेत हे पाहण्यासाठी माणूस पाठविला. त्याचे काही समाधान झाले नाही. ‘ दोन तरुण तारांशी खेळत आहेत, ’ असा अहवाल त्याने दिला. परंतु ते तरुणही चिकाटीचे होते. त्यांनी बँक आॅफ टोकियोच्या चेअरमनला पत्र लिहिले. त्याने आपला खास माणूस पाठविला. त्या दोघांकडे काहीही भांडवल नव्हते. त्यांना जामीन राहण्यास कुणी तयार नव्हते. तरीही त्या तरुणांना कर्ज देण्यात आले. बँकेचे चेअरमन त्या वेळी म्हणाले, ‘ आम्ही उद्योगधंदे वाढण्यासाठी माणसात भांडवल गुंतविले पाहिजे, केवळ उद्योगधंद्यात नव्हे.’ ‘ Investment in man and not in industry ’ हे तत्त्व जपानच्या बँकांनी स्वीकारले व त्यामधून जपानचे आजचे औद्योगिक विश्व उभे राहिले. हे कर्ज मागणारे तरुण म्हणजे आजच्या ट्रान्झिस्टर्सचे कल्पक उत्पादक सोनी ! सोनी

ट्रान्झिस्टर आज जगभर गेला, परंतु त्या वेळी हे दोन भाऊ एका गॅरेजमध्ये ट्रान्झिस्टर बनविण्याचा प्रयत्न करीत होते. बँकेने त्यांना साहाय्य केले. आज जपानचा ट्रान्झिस्टर अमेरिका–युरोप–हाँगकाँगच्या बाजारात हजारोंनी विकला जातो. जपानी लोकांचे असे विशेष गुण आपण तसेच्या तसे उचलावयास हवेत. आणि ते सर्वांच्यात आहेत, म्हणून जपान हे राष्ट्र म्हणून मोठे झाले. त्यांचा समान असा मोठा गुण म्हणजे काटकसरीपणा. ‘ All Japanese are frugal. Frugality is in fact a bond among them, ’ असे उद्‌गार त्यांच्याबद्दल अनेकांनी काढले आहेत. दुसरा मोठा गुण अर्थातच उद्योगीपणा, व तिसरा गुण दुःखदायक गोष्टी विसरण्याचा. ‘ दुसरे महायुद्ध आम्ही विसरलो, ’ हे त्या टोकियोतील मार्गदर्शकाचे उद्‌गार या आर्थिक भरभराटीच्या संबंधात मला अतिशय पटले. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर नवी दुकाने निघाली त्यांत दोन नावे अनेकांनी वापरली. ‘ Forgive and Forget Electric Co.’ असे एक नाव, तर ‘ Sincere Clothes Shop ’ हे दुसरे. ‘ Five Gentleman of Japan ’ या फ्रँक गिबनच्या पुस्तकात जपानी माणसाच्या व्यक्तित्वाचे अनेक नमुने आले आहेत. जपानच्या समाजाचे वर्णन तो ’ Web Society ’ म्हणून करतो. ‘ सबंध जगातील नम्र लोक ’ असे जपानी माणसांचे तो वर्णन करतो. जपानच्या संसदेत तो जेवणाच्या सुट्टीत गेला. टोकियोच्या रस्त्यातील कामगार छोटया प्लॅस्टिक पेटयांत जे खाणे खात होते तेच खाणे कॅबिनेट मंत्री खात होते. जपानमध्ये सर्व थरांचे लोक एकाच पद्धतीचे व दर्जाचे खाणे खाताना दिसतात. रात्री गेशांच्या उपस्थितीत बडयांच्या प्रचंड पार्ट्या होतात, परंतु तो बडाही दिवसा सहजपणे छोटे जेवण घेईल व आपल्या उद्योगाला लागेल. पराभवात नव्या उत्थापनाचा मार्ग शोधणारा जपानी माणूस आज आपल्याकडे काही नसताना आपल्या अर्थकारणाचा कणा पोलादी बनवितो याचे आश्चर्य वाटते. चीनकडून कोळसा, मलेशियातून लोखंड, पाकिस्तानमधून कापूस आणून जपानने आपल्या नव्या अर्थकारणाला सुरुवात केली; परंतु आज ऑस्ट्रेलिया, ब्राझिल, भारत यांच्याकडून लोहखनिज, तर कॅनडाहून कोळसा आणून जे पोलाद आज जपान बनविते ते जगाच्या बाजारपेठेत सहजपणे विकले जाते. जपानकडे आज जगातील सर्वांत मोठे जलविद्युत संपत्तीचे जाळे आहे. या विजेबरोबर जपानी माणसाच्या अंतःकरणात दुसरी एक वीज खेळत असते ती जबावदारीच्या जाणिवेची. ‘ Sekinin ’ म्हणजे जबाबदारी. या जपानी शब्दाला त्यांच्या जीवनात फार मोठे स्थान आहे. गोव्याचे श्रेष्ठ उद्योगपती श्री. विश्वासराव चौगुले यांनी स्वतःचा सांगितलेला अनुभव जपानी माणसाच्या या स्वभावाचा प्रत्यय आणून देणारा आहे.

श्री. चौगुले यांचा व्यवहार ज्या कंपनीमार्फत टोकियोत चालतो तेथे दुपार-

पासून संप सुरू व्हायचा होता. दुपारी १२-३० च्या सुमारास टेलेक्स विभागाचा कर्मचारी त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला व म्हणाला, 'दुपारपासून आम्ही आमच्या मागण्यांसाठी संपावर जाणार आहोत. परंतु तुमची अडचण होता कामा नये. तरी तुम्हाला काही संदेश पाठवायचे असतील तर ते माझ्याकडे द्या. मी जेवणाच्या सुट्टीतही थांबून ते पुरे करून जाईन. कारण तुम्ही देत असलेल्या धंद्यावर आमच्या कंपनीचे काम चालते. तुम्ही उद्या ते बंद केले तर आमच्या कंपनीचे नुकसान होईल– म्हणजे पर्यायाने आमचेच नुकसान होईल.'

जपानमध्ये टेबलावर काम ठेवून अगर अर्धवट उत्पादन टाकून कुणी संपावर जात नाही. मी टोकियोत असताना याच ओकुरा ट्रेडिंग कंपनीत दुपारी संप व्हायचा होता. संप होतात ते वाढीव बोनससाठी. तेथे २० ते २५ टक्के बोनस सर्वांनाच मिळतो. त्यांची मागणी ३५ टक्क्यांची होती. ओकुराचे एक प्रमुख श्री. आर. काकू यांची सेक्रेटरी माझ्याबरोबर मार्गदर्शिका म्हणून फिरत होती. तिलाही संपावर जाणे भाग होते. 'मला वेगळे राहता येणार नाही.' ती म्हणाली. परंतु १२ वाजता तिने श्री. काकू यांना टेलिफोन केला. आपण दुपारी येऊ शकणार नाही, असे तिने माझ्यासमोरच सांगितले व केलेल्या कामाचा अहवाल सांगितला. 'Sekinin' (Responsibility) चे स्वरूप मी स्वतःच तेथे अनेकदा पाहिले.

जपानचे सर्व अर्थकारण निर्यातप्रधान आहे. या दृष्टीने जपानचा आदर्श आपण ठेवावयास हवा. १९७४ मध्ये जपानने एकूण ५८,००० मिलियन डॉलर्सची निर्यात केली. त्यापैकी १२,५०० मिलियन डॉलर्सची निर्यात केवळ पोलादाची होती. ३ कोटी ४३ लक्ष ५० हजार टन पोलाद जपानने निर्माण केले. एकूण निर्यातीत पोलादाची निर्यात २२ टक्के आहे. पोलाद-निर्यात हा जपानच्या अर्थकारणाचा कणा आहे. तो पोलादी असल्याने जपान इतर क्षेत्रांतही आघाडीवर राहिला आहे. जपान जवळजवळ ३३ टक्के निर्यात ही मशिनरीची करतो. जपानमध्ये जो माल विकला जातो तो परदेशांत विकल्या जाणाऱ्या जपानी मालापेक्षा चांगला असून, बाहेर तो कमी प्रतीचा असतो अशी सामान्य जपान्यांची समजूत दिसली. अमेरिकेत व पूर्व आशियात जपानी मालाची रेलचेल आढळते. कुठेही गेलात तरी आधी जपानी माल दाखविला जातो. कारण तो स्वस्त असतो. गुणवत्तेत ब्रिटिश माल सर्वांत चांगला, नंतर अमेरिकन व नंतर जपानी, हा माझा सामान्य ग्राहक म्हणून अनुभव.

आज १० कोटी टन पोलादाचे उत्पादन करणारा जपान १९८० मध्ये १६ कोटी टनांवर जाईल व १९८५ मध्ये १७ कोटींवर जाईल असा अंदाज श्री. सबुरो तानाबे या 'निप्पन स्टील कॉर्पोरेशन' या जपानमधील सर्वांत मोठ्या पोलाद कारखान्याच्या प्रमुखाने माझ्याशी बोलताना व्यक्त केला. जपान आपल्या

पोलादाचे उत्पादन वाढवील– आपल्या कमी किमतीच्या जोरावर अमेरिका, प. जर्मनी, ब्रिटनशी स्पर्धा करील असे चित्र दिसते आहे.

गोव्याहून जपानला लोहखजिनाची जी निर्यात होते त्यासंबंधात पाहणी करणे हाच माझा जपानदौऱ्याचा मुख्य हेतू होता. त्यामुळे जपानमधील सर्वांत मोठ्या Steel Magnets ना भेटण्याची मोलाची संधी मला मिळाली. १९५० मध्ये 'शोझन मारू' हे जहाज गोव्यातून सर्वप्रथम लोहखनिज घेऊन गेले. ही निर्यात तेथील चौगुले बंधूंनीच केली. या निर्यातीने गोवा–जपान आर्थिक व्यवहाराचा पाया घातला. १९५१ मध्ये ३४ वर्षांच्या विश्वासराव चौगुले यांनी बँक ऑफ टोकियोशी करार केला, तो 'योजना क्रमांक १' असा तेथे नोंदविलेला आहे. चौगुले फॉर्म्युला म्हणून तो तेथे ओळखला जातो. आज गोव्याच्या सर्व निर्यातदारांची लोहखनिजाची निर्यात जपानशी या फॉर्म्युल्याप्रमाणे चालते.

या त्यांच्या कार्यात ज्या जपानच्या प्रमुख व्यक्तींनी त्यांना साहाय्य केले त्यांच्या मुलाखती घेणे हा माझा प्रमुख उद्योग होता. या मुलाखतींमुळेच जपानच्या पोलादी अर्थकारणाच्या मागे असलेल्या पोलादी पुरुषांचीच भेट मला घडत होती. ओकुराचे श्री. आर. काकू माझ्याबरोबर होते. याच श्री. काकू यांनी १९५१ मध्ये श्री. विश्वासराव चौगुले यांची याच उद्योगपतींशी भेट करून दिली. २५ वर्षांनंतर माझी ते भेट करून देत होते– ती प्रदीर्घ कथा ऐकण्यासाठी.

गोव्याच्या मुरगाव बंदरात ते १९५१ मध्ये ज्यांनी प्रथम श्री. विश्वासराव चौगुले यांच्याशी हस्तांदोलन केले ते श्री. एच. वातानाबे हे आता ८५ वर्षांचे आहेत. टोकियोच्या उपनगरातील त्यांच्या जुन्या पद्धतीच्या घरी त्यांना मी भेटण्यास गेलो. किमोनो घातलेली त्यांची पत्नी आमच्या स्वागतासाठी उभी होती. गोव्याचा सायबा संत झेवियर या वातानाबेंच्या मनातही पक्का बसलेला दिसला. ते म्हणाले, 'In the land of St. Francis Xavier, two hands were firmly held, and it was a good omen.' जपान–गोवा आर्थिक व्यवहाराचा पाया या हस्तांदोलनाने घातला. त्यात अडचणीही आल्या. शिरगावच्या खाणींचे आधुनिकीकरण करण्यासाठी श्री. चौगुले यांना वातानाबे यांच्या कंपनीने कर्ज दिले. परंतु पुढे काम चालू असताना क्रांतिवीर मोहन रानडे यांच्या नेतृत्वाखालील संघटनेने तेथे स्फोट घडवून आणले. गोव्याची आर्थिक नाकेबंदी भारत सरकारने केली होती– आणि खनिज-निर्यातीला प्रोत्साहन देऊन पोर्तुगीज नवे अर्थकारण गोव्यात सुरू करीत होते. एच. वातानाबे मला म्हणाले, की त्या स्फोटाचे वृत्त आले तेव्हा मला आत्महत्या करावी लागणार असे माझ्या मनात आले. बँक ऑफ टोकियोला ते जबाबहोते. पुन्हा त्याच 'Sekinin'चा उच्चार मी ऐकला.

जपानच्या या पोलाद कंपन्यांची कार्यालये पाहताना एक नवे विश्वच माझ्या-

समोर खुले होत होते. ती सुरेख मोटार आधी तळघरात जात असे. लिफ्टने वर जाताना अनेक ठिकाणी सुरक्षादलाकडून बिल्ले घ्यावे लागत. कारण जपानची भांडवलशाही अर्थरचना उखडून टाकण्यासाठी तेथील विद्यार्थी अनेक ठिकाणी घातपाताचे प्रकार करीत आहेत.

गोव्याचे पॅलटायझेशन प्लँट उभे करण्यास ज्यांनी मदत केली ते Hisao Makita निप्पन कोकन के. के. या प्रचंड कंपनीचे अध्यक्ष. जपानच्या पोलादी जगाचा हा कणा. निप्पन स्टील कॉर्पोरेशनचे एस. तानाबे हे जपानचे दुसरे स्टील जाएंट. त्यांच्या खोलीतून तर सबंध टोकियो दिसत होते. प्रदूषणाबद्दल त्यांच्याशी माझे बरेच बोलणे झाले. सुरुवातीस औद्योगीकरण करताना जपानच्या उद्योगपतींनीही प्रदूषणाची मुळीच काळजी केली नाही. त्याचे दुष्परिणाम काही भागातील लोकांना भोगावे लागले, या टीकेकडे मी त्यांचे लक्ष वेधले. श्री. तानाबे यांचे मत मात्र वेगळे होते. आता जपानमध्ये प्रदूषणविषयक कायदे अतिशय कडक करण्यात आले आहेत. ‘People in Japan were deceived by industrialists,’ या कडक शब्दांत श्री. मानाबू शिमिझू या तरुण जपानी प्राध्यापकाने मला आपली प्रतिक्रिया ऐकविली. इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपिंग एकॉनामिक्स या टोकियोतील सस्थेत ते प्राध्यापक आहेत. त्यांनी मिनामाटा या बेटाची हकीगत सांगितली. तेथे मर्क्युरीच्या प्रदूषणाने १३० माणसे मरण पावली, तर जन्माला आलेल्या मुलांचे हात-पाय वाकडे निघाले.

उद्योगपतींनी सुरुवातीस प्रदूषणाची काळजी का घेतली नाही याचे उत्पादकांचे उत्तर असे की, त्या वेळी प्रदूषणनिवारक उपायांची माहिती नव्हती. कोरियात युद्धामुळे उत्पादन सुरू करण्याची घाई होती व प्रदूषणनिवारणाच्या खर्चामुळे उत्पादित वस्तूची विक्री किंमत वाढणार होती. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाच्या बाजारपेठेत जपानला स्थान मिळावयाचे होते. एक गोष्ट खरी, की ते स्थान त्यांनी मिळविले, परंतु सबंध जगातील प्रदूषित राष्ट्र (Polluted Country) म्हणून जपानचे नाव झाले.

१९७० मध्ये जपान प्रदूषणाबद्दल जागे झाले. यासाठी संसदेचे खास अधिवेशन भरून त्यांनी १४ नवे कायदे केले. १९७१ मध्ये Ministry for environment म्हणून नवे खाते सरकारने उघडले. स्टॉकहोमच्या परिषदेस हे मंत्री उपस्थित राहिले व जपानच्या अनुभवापासून प्रगतिशील राष्ट्रांनी धडा घ्यावा असे ते तेथे म्हणाले. आधी प्रदूषण रोखा, नंतर विकास, असे मूलभूत धोरण स्वीकारण्यात आले. जपानच्या वृत्तपत्रांनी मोठी कामगिरी बजाविली. फुजी बेटावरच्या जलप्रदूषणाच्या अनेक गोष्टी वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केल्या. या विषयाचे राजकीय पक्षांना लोकांनी भांडवल करून दिले नाही. लोकांनी त्यांना दूर करून ठेवले व

अपक्ष पातळीवर प्रदूषणविरोधी लढे दिले. चीनने जपानमधील प्रदूषणाची पाहणी करण्यासाठी शिष्टमंडळ पाठविले.

जपानच्या आर्थिक विकासाचे मूल्यमापन करताना तेथे लोकांना जी किंमत द्यावी लागली त्याचाही विचार करावयास हवा. आज जपानची लोहखनिजाची मागणी १० कोटी टनांची आहे. मी फुकुयामाचा पोलाद प्रकल्प पाहिला. आता त्यापेक्षाही मोठा पोलाद प्रकल्प जपानमध्ये उभा राहिला आहे. तरी या १० कोटी टनांत गोव्याचा वाटा फक्त एक कोटी टन आहे. गोव्याला म्हणजे पर्यायाने भारताला ब्राझिल व ऑस्ट्रेलियाने या स्पर्धेत हरवले आहे. तरी दरवर्षी १७ ते १८ कोटी रुपये या निर्यातीमुळे गोव्यात येतात व गोव्याच्या अर्थकारणाचे चक्र फिरत राहते. लोहखनिज व कोळसा, दोन्ही बाहेरून आणून जपान दरवर्षी पाच कोटी टन क्रूड स्टील व चार कोटी टन फिनिश्ड स्टीलचे उत्पादन करते. या फिनिश्ड स्टीलचा प्रत्येक टनाचा दर २५० डॉलर्स असा आहे. अमेरिकेच्या पोलादापेक्षा हा ४० टक्क्यांनी कमी आहे तर पश्चिम जर्मनीपेक्षा ८० टक्क्यांनी कमी आहे. ब्रिटन-पेक्षा ६० टक्क्यांनी कमी आहे तर फ्रान्सपेक्षा ९० टक्क्यांनी कमी आहे. एकूण जगातील पोलाद बनविण्याऱ्या सर्व प्रमुख देशांत जपानचे पोलाद स्वस्त आहे व त्यामुळे सबंध जगातून त्यांच्या मालास मागणी आहे. जपानच्या पोलादाची प्रत इतर राष्ट्रांपेक्षा कमी असली पाहिजे, हा माझा आक्षेप पोलाद उद्योगातील बड्यांनी साफ धुडकावून लावला. ‘ Lowest cost of production, highest productivity and best quality ’ हे आपल्या सर्व उद्योगाचे सूत्र असल्याचे एकाने सांगितले.

ओकुरा ट्रेडिंग कंपनीचे श्री. आर. काकू यांनी विविध देशांतील पोलाद-निर्मितीची आकडेवारी माझ्यापुढे ठेवली. या आकडेवारीप्रमाणे चीननेही नंतर येऊन पोलादनिर्मितीत भारतावर कशी कुरघोडी केली ते पाहावयास मिळते.

| देश | वार्षिक उत्पादन (टनांमध्ये) |
|---|---|
| अमेरिका | १४ कोटी |
| रशिया | १३ कोटी ५० लक्ष |
| जपान | १० कोटी |
| चीन | २ कोटी ५० लक्ष |
| भारत | ७० लक्ष |

आज भारतात एकूण पाच पोलादनिर्मितीचे कारखाने आहेत, परंतु कोणत्याही कारखान्यात त्याची पूर्ण उत्पादनक्षमता वापरली जात नाही. ‘ पाच कारखान्यांत थोडे थोडे उत्पादन करण्यापेक्षा एकाच कारखान्यातून पुरेपूर उत्पादन का करीत नाही ?’ असा प्रश्न श्री. तानाबे यांनी मलाच विचारला. जपानी भाषेत म्हणींचा

एकूण सुकाळ दिसला. प्रत्येकजण बोलताना त्यांचा उपयोग करी. श्री. तानाबे हसत म्हणाले, 'गुणकारक औषध हे कडू असते. सदुपदेश हाही गोड लागत नाही.'

जपानने दुसऱ्या महायुद्धानंतर कडू औषध घेतले व उद्योगाची जोड देऊन नवे राष्ट्र उभे केले. 'World's fourth largest economy' असे जपानचे आज वर्णन केले जाते. या आर्थिक विकासाने जपानची काही मूल्ये बदलली तरीही त्यांनी आपली काही वैशिष्टये कायम ठेवली. जपानमध्ये मी फिरत होतो तेव्हा मंदी होती. चलनफुगवटा कसा कमी करावयाचा हा प्रश्न जपानपुढे होता. तरुण पिढी संतप्त दिसत होती. जपानचे अर्थकारण पुन्हा cross roads ला उभे आहे असे मला वाटले. आशियात सर्वत्र उदयाला आलेल्या समाजवादाची पकड जपानवरही एक दिवस बसल्याशिवाय राहणार नाही असे माझे मत झाले. त्याला काही वर्षे लागतील. नवी पिढी नवे मार्ग शोधते आहे.

□

# १०. फुकुयामाचा पोलाद प्रकल्प

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

जपानच्या पोलादी अर्थकारणाचा कणा पाहण्यासाठी मी फुकुयामाला गेलो. फुकुयामा हे हिरोशिमाजवळ येते व ज्या परिसराने अणुबाँबने केलेला विध्वंस अनुभवला तेथे जगातील सर्वांत मोठा ब्लास्ट फर्नेस आहे. रोज ११ हजार टन पोलाद या एका भट्टीतून तयार होते. त्यात मुख्यत्वे गोव्याचे अर्थकारण ज्या लोहखनिज-निर्यातीवर अवलंबून आहे, त्याचे जपानच्या संदर्भातील नेमके स्थान कोणते हे समजून घेण्याचा मी प्रयत्न करीत होतो. १९५१ मध्ये श्री. विश्वासराव चौगुले यांनी जपानबरोबर पहिला करार केला त्या वेळी जपानची लोहखनिजाची गरज फक्त १० लाख टन होती, आणि हे १० लाख टन गोव्याने निर्यात केले की खूप झाले, अशा मन:स्थितीत जपानचे बडे बडे पोलादनिर्माते होते. दुसऱ्या महायुद्धाच्या राखेतून जपान वर डोके काढीत होते. आज जपान १०० कोटी टन लोह-

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

खनिज आयात करते, त्यापैकी फक्त १ कोटी टन गोव्याचे. १९५१ मध्ये जपानला लोहखनिज निर्यात करणाऱ्या देशांत पहिला क्रमांक गोव्याचा, पर्यायाने भारताचा होता. आता शेवटचा क्रमांक आहे; पण या एक कोटीवर गोव्याचे सर्व आर्थिक जीवन अवलंबून आहे. जपान-भारत अंतर हे पाच हजार नॉटिकल मैल, तर जपान ब्राझिल हे अंतर अकरा हजार नॉटिकल मैल आहे. या ब्राझिलहून तीन कोटी टन लोहखनिज जपानमध्ये येते. जपानचा दुसरा मोठा निर्यातदार म्हणजे ऑस्ट्रेलिया.

ऑस्ट्रेलिया व ब्राझिल हे भारताचे फार मोठे स्पर्धक. टोकियोत ऐकलेल्या या साऱ्या गोष्टींचा विचार फुकुयामाला जाताना माझ्या मनात होता. सकाळी ८–१५ वाजता वेगवान गाडीने मी टोकियो सोडले व दुपारी २–३० वाजता ७०० किलोमीटर्सवरील फुकुयामाला पोहोचलो. गाडीच्या डब्याचा क्रमांक, माझ्या सीटचा क्रमांक हे सर्व तेथे कळविलेले असल्याने, स्टेशनवर गाडी थांबली, मी दरवाज्यात आलो तर अगदी नाकासमोर एक जपानी माणूस आपली छत्री उंचावीत मला खुणावताना दिसला. फुकुयामा प्लँटच्या वतीने तो मला घेण्यासाठी आला होता. गाडीतून खाली उतरताच 'आपका स्वागत,' असे तो जपानी माणूस चक्क हिंदीत बोलला. छत्री एका हातात उंचावलेली, जपानी पद्धतीने कमरेत नमस्कारासाठी वाकलेला व तोंडाने 'आपका स्वागत' असे हिंदीत बोलणाऱ्या ह्या व्यक्तीचे चित्रच काढायला हवे. श्री. एस. उएयामा हे त्याचे नाव. दुसऱ्या महायुद्धात ब्रह्मदेशाच्या आघाडीवर तो होता. आझाद हिंद सेनेच्या भारतीय सैनिकांशी त्याचा संबंध आला व त्यांच्याबरोबर बोलून तो हिंदी शिकला होता. या हिंदी स्वागतामुळे एका मिनिटात आम्ही मित्र झालो. ओकुरा कंपनीच्या हिरोशिमा ऑफिसचे श्री. ओगावा तेवढ्यात आले व आम्ही फुकुयामाच्या दिशेने निघालो. निप्पन कोकन या ज्या कंपनीशी श्री. चौगुले यांनी १९५१ मध्ये पहिला करार केला त्याच कंपनीचा हा पोलाद कारखाना. जगात १ कोटी ६० लक्ष टन पोलादाची निर्मिती दरवर्षी हा कारखाना करतो. निप्पन कोकनचे असे दोन कारखाने आहेत. जगातील आधुनिक अशा या पोलाद प्रकल्पासाठी २,३०० एकर जागा समुद्रात भरणी घालूनच तयार केली. जपानकडे भूमी इतकी कमी आहे, की समुद्र बुजविणे व जमीन निर्माण करणे हेच सर्वांना करावे लागते. कच्च्या लोहखनिजाची आयात व पोलाद तयार झाल्यावर त्याची निर्यात हे सर्व समुद्रालगत कारखाना ठेवल्याने परस्पर होते.

पोलाद प्रकल्पावर आम्ही पोहोचलो. व्यवस्थापक श्री. मारूया यांनी आमचे स्वागत केले. व्हिजिटिंग कार्डांची देवाण-घेवाण, पोलाद कारखान्यात होतो तरी ते वाकणे वगैरे सर्व झाल्यावर चर्चा सुरू झाली. सबंध प्रकल्पाची आखणी त्यांनी मॉडेलवरून समजावून सांगितली. समुद्रात कारखान्यासाठी एक बेटच येथे तयार

केले आहे. पूर्वेकडच्या बाजूला लोहखनिज उतरते तर पश्चिमेकडे तयार पोलादाची निर्यात करणाऱ्या बोटी येऊन उभ्या राहतात. गोव्यातील मुरगाव बंदराचा पूर्ण विकास झाल्यावर जास्तीत जास्त ८० हजार टनांची बोट आपण आत घेऊ शकणार आहोत. येथे आजच दोन लाख टनांची बोट या फुकुयामा स्टील प्लँटच्या धक्क्याला लागू शकते. ऑस्ट्रेलिया व ब्राझिल हे एकेक लाख टन लोहखनिज एका वेळी आणून एका बाजूला टाकतात व त्याची प्रक्रिया सुरू होते.

उरलेली चर्चा प्रकल्प पाहिल्यावर करू, म्हणून आम्ही हिंडण्यास निघालो. भिलाई अगर रूरकेला येथील पोलाद प्रकल्प ज्यांनी पाहिले असतील त्यांना या प्रक्रियेची कल्पना येईल. चीनने तर सुरुवातीस अनेक ठिकाणी पोलादनिर्मितीच्या भट्ट्या उघडल्या व जुन्या पद्धतीने पोलाद बनविले. येथे कॉम्प्युटरने नियंत्रित केलेला पोलाद प्रकल्प मी पाहत होतो. फर्नेसच्या आकारावरून प्रकल्पाची उत्पादन क्षमता कळू शकते. संबंध जगातील मोठ्या ब्लास्ट फर्नेससमोर मी उभा होतो. दोन उंच जिने चढून आम्ही सारे वर गेलो. वाफ, धूर, आवाज यांच्या मिश्रणात आम्ही उभे होतो. या कारखान्याकडे आगगाडीचे रूळ बनविण्यापासून पाण्याचे मोठे पाईप्स बनविण्यापर्यंत असंख्य गोष्टींचे काम आहे. ' हॉट ' मिल व ' कोल्ड ' मिल हे दोन अशा प्रकल्पाचे मुख्य विभाग असतात. फुकुयामाच्या हॉट मिलची उत्पादनक्षमता वार्षिक ४० लाख टन इतकी आहे. यावरून लोखंडाच्या रसाला तिथे जो आकार दिला जातो त्याच्या वेगाची कल्पना येईल. त्या रसरसत्या गरम अशा तांबड्यालाल पोलादाची तुलना उन्हाळ्यातील भर दुपारच्या सूर्यबिंबाशी होऊ शकेल. कोल्ड मिलमध्ये बाजूच्या कठड्यावर आम्ही जाऊन उभे राहिलो व समोर प्रचंड वेगाने पंजाब मेल यावी तसा तो तांबडालाल पोलादी पत्रा समोरच्या यंत्रात आला. त्यावर थंड पाणी सोडले जात होते. त्याची क्षणार्धात वाफ होत होती व त्याच वेगाने त्या पत्र्याला पातळ आकार देत त्याचे रोल्स तयार होत होते. वृत्तपत्रांना मिळणाऱ्या न्यूजप्रिंट्सच्या रोल्सऐवजी पोलादी पत्र्यांचे रोल्स तयार झालेले व सरळ एका गार्डावर निर्यातीसाठी निघालेले दिसत होते. १२००° ते १५००° तपमान त्या भट्टीत असते. यावरून सूर्यगोलाची उष्णता घेऊन येणाऱ्या तांबड्यालाल पोलादाची कल्पना येऊ शकेल. एकूण पाच ब्लास्ट फर्नेसेस या प्रकल्पात आहेत. स्लॅबिंग मिलमधून आम्ही बाहेर आलो तर समोर एक छोटी दोन-तीन डब्यांची आगगाडी चालली होती, परंतु त्या गाडीला ड्रायव्हर नव्हता. Remote Control ने ती गाडी इकडून तिकडे सामुग्री घेऊन जाते.

फुकुयामा पोलाद प्रकल्पाचा एकूण व्यवहार अफाट आहे. २५ हजार लोक येथे काम करतात. चार पाळ्यांत काम चालते. सध्या जपानमध्येही मंदी असल्याने आठवड्यातून दोन दिवस येथील कामगारांना सुटी दिली जाते. या

प्रकल्पाच्या आवारात मला कोळशाच्या राशी पडलेल्या दिसल्या. लोहखनिजही पडून आहे. कारण मंदी. २० लक्ष टन पोलादाचे उत्पादन कारखान्याने कमी केलेले आहे. ९५ टक्के उत्पादित माल हा परस्पर बोटीने निर्यात होतो. फक्त पाच टक्के माल ट्रकने जपानमध्ये जातो.

१९५० मध्ये चौगुले आणि कंपनीने जी सर्वप्रथम लोहखनिजाची निर्यात केली तो साठा या फुकुयामा पोलाद प्रकल्पात आला होता. आज चौगुले कंपनीचे फक्त तीन लाख टन लोहखनिज या फुकुयामा प्रकल्पावर जाते. २२ लक्ष ४० हजार टन पाणी या प्रकल्पाला रोज लागते व हे वापरलेले पाणी पुन्हा स्वच्छ करून प्रकल्पात जाते. तांबडेलाल पाण्याचे पांढऱ्या स्वच्छ पाण्यात होणारे रूपांतर पाहून आम्ही कार्यालयात आलो व उरलेल्या विषयावर चर्चा सुरू झाली. या फुकुयामा प्लँटचे कच्चा माल विभागाचे मॅनेजर श्री. के. ओगिनो आता बैठकीत सामील झाले होते व त्यामुळे अनेक प्रश्नांची उत्तरे मला मिळाली.

ऑस्ट्रेलियाकडून ५६.२ टक्के लोहखनिज या प्रकल्पासाठी येते. दक्षिण अमेरिकेतून (ब्राझिल) जवळजवळ २७ टक्के लोहखनिज येते, तर भारतामधून फक्त ९.५ टक्के ! एकूण २ कोटी १० लक्ष टन लोहखनिज फुकुयामा प्रकल्प आयात करतो, त्यात आपण बिंदूएवढेच आहोत !

गोव्यातील लोहखनिजाची प्रत व ऑस्ट्रेलिया–ब्राझिलमधील लोहखनिजाची प्रत याबद्दल श्री. ओगिनो यांचे मत मी विचारले. त्यांच्याकडून फार उपयुक्त आकडेवारी मिळाली. एकूण जगाच्या स्पर्धेत गोव्याच्या लोहखनिजाची गुणवत्ता कोणती आहे याचे चित्र या आकडेवारीत आहे.

| देश | लोहखनिज प्रकार | लोहाचे प्रमाण |
|---|---|---|
| गोवा | लंपी | ५९.५ |
| ऑस्ट्रेलिया | ,, | ६५.० |
| गोवा | फाईन | ६१.५ |
| ऑस्ट्रेलिया | ,, | ६२.५ |
| गोवा | पेलेट्स | ६६.० |
| ऑस्ट्रेलिया | ,, | ६३.० |

गोव्याचा चांगल्या प्रतीचा माल येथे घेतला आहे. ऑस्ट्रेलियाच्या लोहखनिजात ॲल्युमिना फक्त १.७ असल्याने व लोहाचे प्रमाण ६५ पर्यंत असल्याने या स्पर्धेत आपण फार मागे आहोत. त्याच्या उलट ऑस्ट्रेलियाच्या पेलेट्सपेक्षा गोव्यातील पेलेट्स्‌मध्ये लोहाचे प्रमाण ३ टक्के अधिक व ॲल्युमिन फक्त १.५ टक्के आहे. ऑस्ट्रेलियास टक्कर द्यायची असेल तर पेलेट्स हेच त्याला उत्तर आहे. या खुद्द फुकुयामा प्लँटमध्ये पोलाद निर्माण केल्यावर जी निळी पावडर राहते

त्याचे पेलेट्स केले जातात. थोडाही कच्चा माल ते फुकट घालवत नाहीत. आपल्याकडील लोहखनिज आहे तसे पाठविणे हे गोव्याला व देशाला नुकसानकारक आहे हेही तेथे आकडेवारी पाहिली तेव्हा जाणवले.

जपानकडे स्वत:चे लोहखनिज नाही की पोलाद कारखान्यास लागणारा कोळसा नाही. 'तुम्ही कोळसा कुठून आणता ?' हा माझा साहजिकच पुढचा प्रश्न होता. फुकुयामाचा हा पोलाद कारखाना दोन कोटी १० लक्ष टन लोहखनिज जसे आयात करतो त्याचप्रमाणे ९० लाख टन कोळसाही आयात करतो. टनाला ५५० रुपये प्लँट देते, व ऑस्ट्रेलिया कॅनडा आणि अमेरिकेतून कोळसा येतो. ऑस्ट्रेलिया एका वेळी ५० हजार टन कोळसा जहाजाने पाठविते. त्याबद्दल ७·७५ डॉलर टनामागे वाहतूकखर्च प्लँटला पडतो. समुद्राच्या पाठीवर बेटासारखे असलेले जपान व त्या बेटालगत समुद्र बुजवून उभा केलेला हा कारखाना जगातून कच्चा माल आणतो, इंधनही बाहेरून आणतो व पोलाद बनवतो. भारतातील रूरकेला पोलाद प्रकल्पात २५ हजार कर्मचारी आहेत, तसेच फुकुयामामध्ये २५ हजार कर्मचारी आहेत; परंतु रूरकेलामध्ये वार्षिक ११ लाख टन पोलाद तयार होते तर फुकुयामामध्ये १ कोटी ६० लाख टन तयार होते. 'automation and efficiency' ही दोन कारणे या तफावतीची जपानी तज्ज्ञांनी दिली.

साहजिकच प्रदूषणाचा विषय निघाला. पोलाद कारखाना आला म्हणजे थोडेसे तरी प्रदूषण आले. आज या कारखान्यातील अडीच हजार कामगार जवळच बांधलेल्या खास वसाहतीत राहतात. तीन हजार अविवाहित कामगारांसाठी एक प्रचंड इमारत कारखान्याने बांधलेली आहे. परिसरात भरपूर मोटारीही तेथे उभ्या होत्या. कामगारांना स्वत:ची घरे घण्यासाठी कारखाना मदत करतो. त्याप्रमाणे दोन हजार कामगारांनी स्वत:ची घरेही घेतली आहेत.

या सर्वांना प्रदूषणाचा त्रास होऊ नये यासाठी फार मोठी योजना कार्यान्वित केली आहे. प्रकल्प उभारणीतील १० टक्के खर्च प्रदूषणनिवारणावर जपानमध्ये करावा लागतो, व त्याप्रमाणे फुकुयामा स्टील प्लँटच्या चालकांनी १९७३ च्या नोव्हेंबरपर्यंत २० कोटी ३० लाख डॉलर्स केवळ प्रदूषणावर खर्च केले. पोलाद कारखान्यातून मुख्यत्वे बाहेर येते ती धूळ. ती धूळ जमा करणारे Dust Collectors फर्नेसेसला जोडलेले मी येथे पाहिले. ती धूळही पुन्हा प्लँटमध्ये वापरली जाते. पाणी, हवा, कचरा वा आवाज या चारही गोष्टींचे प्रदूषण व त्रास नाहीसा करण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. या सर्व लोहखनिजयुक्त आवारात हिरवळीचे पट्टे राखलेले तर होतेच; पण मला त्यांनी गुलाबांच्या फुलांचे ताटवे दाखविले व त्याचे एक छापील कार्ड दिले. गुलाबांची फुले, पलीकडे गॅस वाहून नेणारी प्रचंड पाईपलाईन, वर लोहखनिज ब्लास्ट फर्नेसमध्ये ओतणाऱ्या क्रेन्स, या तिन्ही गोष्टी

या एका कार्डात दाखविल्या होत्या. जपानचे वैशिष्टयच या कार्डात प्रकट झाले होते. चर्चा संपवून सर्वांचा दोनदा वाकून निरोप घेतला. ‘ आपका स्वागत ’ असे हिंदीत बोलणारा आमचा पहिला मित्र पुन्हा बरोबर होता. फुकुयामा स्टेशनवर त्याने मला पुन्हा आणून सोडले. येताना मोटारीत तो खूप हिंदी शब्द बोलला. बोलल्यावर तो एकदा हसायचा. मुंबईच्याच गाड्या लेट होतात असे नव्हे. ही फुकुयामा–क्योटो गाडी अर्धा तास उशिरा आली. पोलादाकडून आमच्या गप्पा अनेक विषयांकडे वळल्या. गाडी आली. श्री. उएयामाचा मी निरोप घेतला. गाडी सुटली, आणि त्याने चक्क भारतीय पद्धतीने नमस्कार केला व ‘ नमस्ते ’ असे मोठ्याने म्हटले आणि छत्री उडवत तो गेला. फुकुयामाचा पोलाद कारखाना पाहतानाही मी नेहमीप्रमाणे माणसे शोधत होतो. एक मिळाला. त्याची आठवण नेहमी येते.

□

# ११. सुझी वाँगचे हाँगकाँग

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

सुझी वाँगचे हाँगकाँग ही खरोखरच फार मोठी विलासनगरी आहे. रिचर्ड मॅसन यांनी लिहिलेली 'दि वर्ल्ड ऑफ सुझी वाँग' ही कादंबरी ज्यांनी वाचली असेल किंवा तिच्यावरील जगभर गाजलेला चित्रपट ज्यांनी पाहिला असेल त्यांच्या डोळ्यांसमोर हाँगकाँगचे अंतरंग येऊ शकेल. या अंतरंगाला साजेसेच हाँग-काँगचे बहिरंग आहे.

या बहिरंगाचे पहिले दर्शन मला जपानला जाताना झाले. परंतु त्या वेळी हाँगकाँगला मी उतरलो नाही. रात्रीच्या वेळी हाँगकाँग आल्याची सूचना हवाईसुंदरीने दिली. मी काचेतून बाहेर पाहिले तेव्हा दिसलेले दृश्य भान हरपणारे होते. कोणतेही मोठे शहर रात्री दिव्यांच्या झगमगाटामुळे विमानातून विलोभनीय दिसते, परंतु हाँगकाँगसारखे दिसणारे मोठे शहर मी पाहिलेले नाही. हाँगकाँग हे आधी बेट. त्यात या बेटावर उंच डोंगर पसरलेले

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

आहेत, व या डोंगरांवर न्यूयॉर्कसारख्या अनेक मजली इमारती आहेत. त्यामुळे समुद्र, हाँगकाँग बंदर, बंदरातील प्रचंड मोठ्या बोटी, डोंगर, डोंगरांवरील दिव्यांच्या डोळ्यांनी लखलखणाऱ्या इमारती, उंचावरील इमारती, पायथ्यालगतच्या इमारती, यामुळे दिसणारी वेगळी शोभा– व हे सारे प्रकाशाच्या, निऑन लाइट्सच्या झगमगाटात न्हाऊन निघालेले. त्यामुळे हे असंख्य दिवे आपल्या दोन डोळ्यांत मावत नाहीत, ही स्वप्ननगरी व तिचा विलास दोन लहानशा डोळ्यांत साठवता येत नाही याचीच रुखरुख मनाला वाटत राहते.

हाँगकाँगचा विमानतळही समुद्रातच आहे. या बेटाकडे जमीन थोडी. ती वाढवावयाची म्हणजे दगडी डोंगर कापायचे आणि ते तुकडे समुद्रात टाकून भूमी तयार करावयाची. याच पद्धतीने हाँगकाँगला विमानतळ तयार करण्यात आला आहे. त्यामुळे विमान उतरते ते समुद्राकडून. धावपट्टीवर विमान असते तेव्हा दोन्ही बाजूंना पुन्हा समुद्र दिसतो. श्रीविष्णूने आपले विमान समुद्रात उतरवावे तसे हाँगकाँगला उतरताना वाटते. श्रीविष्णूचे ठीक आहे; परंतु वैमानिकाची थोडी चूक झाली तर विमान समुद्रातच उतरणार व आपला नारदमुनी होण्याचीच अधिक शक्यता ! आमचे विमान तेथे थोडा वेळ थांबले. दूरवरचे हाँगकाँग विलासात मग्न होते. सुझी वाँगच्या नॉम कॉक हॉटेलमध्ये नृत्य चाललेले असावे. जोडीदाराची निवड तेथे होत असावी. 'रिपल्स बे'च्या किनाऱ्यावरील गर्दी आता जवळच्या हॉटेलात गेली असेल. आम्ही विमानातच बसून होतो. फुले वेचावी तसे डोळ्यांत मी ते नवलाख दिवे वेचीत होतो. आणि पुन्हा विमान सुटले. त्या झगमगत्या प्रकाशाकडे तुच्छतेने पाहत आमचे विमान अंधारात गडप झाले. हाँगकाँगचे हे पहिले दर्शन अजूनही डोळ्यांत आहे.

टोकियोहून परतताना हाँगकाँगला उतरलो. वेळ सकाळची होती. दिवे विझले होते. चिनी नोकरवर्ग झपझप काम करताना दिसत होता. हाँगकाँगमध्ये ९८ टक्के लोक चिनी आहेत. १८४१ पासून हे बेट ब्रिटिशांकडे आहे, परंतु लोक मात्र सर्व चिनी. चीनने हाँगकाँगवर आपला हक्क सांगितलाच आहे; परंतु ते घेण्याची घाई चीनला नाही. हाँग काँगलगतचे मकाव हे छोटेसे बेट अजूनही पोर्तुगीजांकडे आहे. चीनने मनात आणले तर एका मिनिटात हे मकाव चीन गट्ट करू शकेल. असे असूनही मकावला चीन हात लावीत नाही की हाँगकाँगसाठी भांडत नाही. याचे मुख्य कारण एकच, की या दोन्ही वसाहतींचा चीनला आपल्या अर्थकारणासाठी उपयोग होतो आहे. मकाव हे तर चक्क 'स्मगलिंग सेंटर' आहे. चीनला जे हवे ते येथून आत घेण्याची चीनने सोय ठेवली आहे, व चीनला नको ते जगाला देऊन टाकण्याचीही व्यवस्था मकावमधूनच चालते. हाँगकाँग हे तर खुले बंदर. हाँगकाँगच्या बाजारपेठेत सर्व देशांच्या मालांची पहिली चाचणी होते

व मग जगाच्या बाजारपेठांकडे हा माल वळतो. हाँगकाँगच्या बाजारपेठेत सध्या चीननेही आपला माल उतरविला आहे व जपानच्या मालाशी त्याची स्पर्धा सुरू आहे.

हाँगकाँगला उतरल्यावर बहुतेक प्रवासी कौलून या पहिल्या बेटावरच राहतात. ते मुख्य हाँगकाँग नव्हेच. कौलून म्हणजे मुंबईचे उपनगर जणू ! या उपनगरातून आठ लाख लोक रोज हाँगकाँग बेटावर नोकरीसाठी, उद्योगासाठी जातात. याचा अर्थ आठ लाख लोकसंख्येचा एक संपूर्ण गोवा रोज हाँगकाँग बेटावर कामासाठी जातो. पूर्वी हाँगकाँगकडे जायला फेरीबोट ओलांडावी लागे– अगदी गोव्यासारखी. याच फेरीबोटीत सुझी वाँगच्या लेखकाला सुझी भेटली व तिने त्याला जबर थापा मारल्या. आता कौलून व हाँगकाँग यांना जोडणारा लांबलचक बोगदा तयार झालेला असल्याने फेरीबोटीचे महत्त्व कमी झाले होते. परंतु फेरीबोटीची मजा काही वेगळी आहे, व आजही हजारो उतारू फेरीबोटीनेच ये-जा करतात.

या बोगद्याची लांबी ८ हजार फूट आहे व त्यापैकी ६ हजार फुटांचा भाग हा पाण्याखाली आहे. रोज ४० हजार मोटारी या बोगद्यातून जातात व त्याच्यासाठी चार रस्ते या बोगद्यात आहेत. दोन जाण्यासाठी तर दोन येण्यासाठी. २० हजार हाँगकाँग डॉलर्स या बोगद्याचे रोजचे उत्पन्न आहे. १ अमेरिकन डॉलर म्हणजे ४ हाँगकाँग डॉलर्स होतात. या हिशेबाने ५ हजार अमेरिकन डॉलर्स इतके उत्पन्न या बोगद्यामुळे रोज मिळते. ६ कोटी अमेरिकन डॉलर्स या बोगद्यासाठी खर्च झाला. ५ वर्षांत बोगद्याचे पैसे वसूल होऊन गेले. जपानहून परतताना मी हाँगकाँगला उतरलो तेव्हा या बोगद्यातून गेलो, परंतु चीनहून परतताना मात्र मुद्दाम फेरीने गेलो.ही फेरी म्हणजे जुनी कोकणची तुकाराम बोटच ! ती बुडाली, परंतु ही अनेक सुझी वाँग घेऊन तरंगते आहे.

कौलूनचे पहिले दर्शन झाले तेव्हा आपण चीन पाहत आहोत असाच क्षणभर भास झाला. सर्वत्र चिनी पाट्या, चिनी लोक, मुंबईसारखी फूटपाथवर पसरलेली दुकाने आणि माणसेच माणसे म्हणजे कौलून. हाँगकाँगला प्रवासी कपडे, साड्या व इतर नानाविध वस्तूंच्या खरेदीसाठी येतात– परंतु त्यांची सर्व खरेदी चालते ती या कौलूनमध्येच. हाँगकाँगमध्ये फार थोडे लोक खरेदी करतात. कारण मूळ हाँगकाँग बेट हे दिवसेंदिवस श्रीमंतांचे होत चालले आहे. अर्थात बंदराजवळचा भाग पूर्वीसारखाच बकाल आहे; परंतु कौलूनसारखा बाजार त्या अल्प वास्तव्यात हाँगकाँग बेटावर दिसला नाही. कदाचित मी तेथे पोहोचू शकलो नसेन.

माझे वास्तव्य थोडे असल्याने मी साहजिकच टूरिस्ट बसने फिरलो. हाँगकाँगमध्ये तीन दिवस तरी राहावयास हवे. एक दिवस मकावला जाण्यासाठी ठेवावयास

हवा. हाँगकाँगहून रोज प्रवासी बस सकाळी मकावला जाते व संध्याकाळी परत येते. दुसरा दिवस उत्तर हाँगकाँगच्या सफरीसाठी तो लागतो. उत्तर हाँगकाँगचा हा भाग १८९८ पासून ब्रिटिशांकडे आहे, व तो त्यांनी केवळ शंभर वर्षांच्या लीजवर चीनकडून घेतला आहे. १९९८ मध्ये हा भाग पुन्हा चीनकडे परत जाईल.

'त्या भागात आज काय आहे?' हा प्रश्न साहजिकच मी आमच्या बसमधील मार्गदर्शकाला विचारला.

'ऑल फॅक्टरीज.' त्याने उत्तर दिले.

'जो भाग २५ वर्षांनी चीनकडे जाणार आहे तेथे कारखाने काढून काय उपयोग?' मी म्हटले.

'हाँगकाँग हे खुले बंदर आहे. येत्या २० वर्षांतच तेथील कारखाने भरपूर फायदा करतील; व २० वर्षांनंतर सरळ आपली सामुग्री घेऊन जातील किंवा येथे कुणाला तरी विकून टाकतील. त्यावेळी त्या यंत्रांचा पुरेपूर फायदा उठवलेला असेल.' त्याने खुलासा केला.

चीनसारखे कम्युनिस्ट राष्ट्र वसाहतवादाविरुद्ध केवढा आरडाओरड करते. येथे चीन ब्रिटिश वसाहतीला आपली भूमी भाडेपट्ट्याने वसाहतीसाठी देते. अखेर हाँगकाँगचे महत्त्व हे बंदर म्हणून आहे, व त्या बंदराचा उपयोग आज चीन, ब्रिटन, जपान व अमेरिका आपापल्या सोयीप्रमाणे करून घेत आहेत. व्यापारातील मैत्री ही राष्ट्र व धर्मच नव्हे तर राजकीय तत्त्वज्ञानाचे असे कोणतेही भेद मानत नाही याची साक्ष हाँगकाँगमध्ये मिळते.

सकाळी त्या सहा कोटी अमेरिकन डॉलर्सच्या बोगद्यात आमची पर्यटन बस शिरली व काही मिनिटांतच आम्ही हाँगकाँगमध्ये आलो. सर्वप्रथम आमचे स्वागत केले ते हाँगकाँगच्या जुन्या ट्रॅमने. मुंबईत बाद झालेली ट्रॅम हाँगकाँग बेटावर व्यवस्थित चालू आहे. चिनी माणसांचे ते आवडते वाहन आहे. १९०६ पासून ही ट्रॅम हाँगकाँग बेटावर मजुरी करणाऱ्या चिन्यांपासून सर्वांची सेवा करते आहे. या हाँगकाँगच्या किनाऱ्यावरच 'नॉम कॉक' हॉटेल आहे. 'दि वर्ल्ड ऑफ सुझी वाँग' या चित्रपटाचे सर्व शूटिंग येथे झाले अशी माहिती आमचा मार्गदर्शक आम्हाला देत होता. चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती झाली व ती राजवट मान्य नसलेले हजारो चिनी हाँगकाँगला निवाऱ्यासाठी आले. त्यांमध्येच शांघायहून वाँग आली व हाँगकाँग बंदराच्या प्रकाशात मानवी जीवनाचे अनेक पैलू प्रकट करून गेली. या कादंबरीतील ग्रॅनदा हॉटेल, सनसेट लॉज हेसुद्धा तो मार्गदर्शक आम्हाला दाखवीत होता. हाँगकाँग शहराच्या जीवनावरील ही कादंबरी तेथील पर्यटकांच्या भ्रमंतीमधील एक भाग झाली होती याचे मला आश्चर्य वाटले. साहित्य व जीवन यांची ही एकरूपता खूप आनंद देऊन गेली.

'तू सारे दाखवितो आहेस, परंतु सुझी वाँग कुठे आहे ?' मी गमतीने त्याला विचारले.

'संध्याकाळी या. नव्या सुझी वाँग या हॉटेलांच्या आडोशाला तुम्हाला दिसतील.' तो म्हणाला. परंतु हे सांगतानाही त्यांच्या जीवनातील दुःखद भागावरच त्याने वोट ठेवले. 'कसले जीवन ?' तो म्हणाला आणि गप्प बसला. हाँगकाँगचे ऐश्वर्य, ती बाजारपेठ यामागेही कुणाचे तरी अश्रू दडले आहेत हे जाणवले.

बस आता एका बागेच्या दाराशी येऊन पोहोचली होतो. मार्गदर्शकांची कळी खुलली होती. 'टायगर बाम गार्डन' पाहा, असे सांगताना त्याने या टायगर बामची गोष्ट मिस्किलपणे सांगितली. 'हाँगकाँगच्या एका व्यापाऱ्याने हा 'टायगर बाम' बनविला आणि त्याची खूप जाहिरात केली. डोके दुखले तर टायगर बाम ! पाय दुखले तरी टायगर बाम ! अहो, पोट दुखले तरी टायगर बाम ! आणि लोकांचे काही सांगता येत नाही. एखादी गोष्ट त्यांना आवडली की ती ते सोडत नाहीत. टायगर बामचा खप खूप झाला. व्यापारी श्रीमंत झाला. त्याने हाँगकाँगची दोन वृत्तपत्रे विकत घेतली. काही लोक म्हणायचे, या वृत्तपत्रांतील काही लेख अतिशय किचकट असतात, त्यामुळे डोके उठते. टायगर बाम संपावा म्हणून हा उद्योग असावा !'

'या व्यापाऱ्यानेच ही बाग बांधली. आपल्या बामची ही कायम जाहिरात, व पुन्हा लोकसेवा !'

'पण काय सांगणार ? हा व्यापारी नुकताच जवळच्या एका बेटावर मरण पावला. लोक म्हणतात, 'त्याने जास्त बाम अंगाला लावला !'

त्या बामपुराणाने सारे हसले व बागेकडे वळले. हाँगकाँगचे वैभव पाहत आम्ही नंतर फिरलो. दिव्यांच्या लखलखाटात जे हाँगकाँग मी रात्री जाताना पाहिले होते ते आता दिवसा पाहत होतो. उंच डोंगरावर बस चढत होती. खाली हाँगकाँग बंदर दिसत होते. हाँगकाँगमध्ये एका डोंगराकडून दुसऱ्या डोंगराकडे अगर पायथ्याकडे नेणारी मोनी रेल आहे. थोडे स्वित्झर्लंड, थोडे लिव्हरपूल, असे काहीसे मिश्रण हाँगकाँगमध्ये आहे. सर्वांत उंच अशा हाँगकाँगच्या भागात बडे राहतात. त्या उंच माथ्यावरून दिसणारे हाँगकाँग विमानापेक्षाही सुंदर दिसत होते. 'सुझी वाँग'च्या कादंबरीतील 'रिपल्स बे'ला आम्ही गेलो. ॲलन मूरचे पैसे चोरणारी सुझी याच बेवर ॲलन मूरशी भांडली. जाताना विल्यम होल्डन या नटाचे किनाऱ्यावरचे घर आम्हाला मार्गदर्शकाने दाखविले. 'रिपल्स बे'वर समुद्रस्नानाचा आनंद घेणाऱ्यांनी गर्दी केली होती. त्या किनाऱ्यात 'रिपलिसव्ह' असे काहीच नव्हते. उलट सर्वत्र उत्साह होता. हाँगकाँग हे केवळ चिन्यांचे नाही याचे दर्शन या किनाऱ्यावरच प्रथम घडले.

तेथून बस निघाली ती हाँगकाँगच्या कोळीवाड्यात. तेच आपले नेहमीचे जीवन, तेच दृश्य. बोटी मात्र पूर्ण लाकडी, देखण्या व खूप नटलेल्या. हाँगकाँग-मधील दारिद्र्य थोडेफार दिसते ते टायगर बाम बागेजवळच्या निर्वासित चिन्यांच्या झोपड्यांत व दुसरे येथे. दुपारच्या वेळेस आम्ही तेथे होतो. फक्त भात व लहानसा मासा. जगातील सर्व कोळी हे व्यवसायाने व वागणुकीने समान असावेत.

दिवसभर आम्ही हिंडत होतो. चांगला चहा मिळविणे ही गोष्ट दिवसा भरात सर्वांत कठीण ठरली. फिरता फिरता दिवस केव्हा मावळला तेच कळले नाही. कौलूनची बाजारपेठ इतकी मालांनी भरलेली आहे की खरेदीसाठी वेगळे दोन दिवस तरी हवेत. त्यात नाथन स्ट्रीटवरील चुंकिंग मॅन्शनमध्ये पूर्ण भारत आहे. हाँगकाँगला गेलेला भारतीय सर्व खरेदी तेथे करतो. त्याशिवाय एका भागात रस्त्यावरचे मोठे मार्केट आहे. मुंबईतील फोर्ट विभागासारखे. तिथे मी गेलो तर तेथील नगरपालिकेची गाडी रस्त्यावरील दुकाने हटवायला येत होती. विक्रेत्या सर्वत्र चिनी मुली– नकट्या; परंतु त्या बारीक डोळ्यांनीही माणसे ओळखणाऱ्यांचे एक वेगळेच विश्व तेथे रस्त्यावर पसरलेले मी पाहिले. माल जप्त करायला गाडी आली की पळापळ होई. वस्तूंचे भाव उतरत, पुन्हा चढत.

दिवस संपला. सुझी वाँगच्या हाँगकाँगचे दिवे पुन्हा लखलखले. काहीजण ह्या दिवेलागणीचीच वाट पाहत होते. एक नवे हाँगकाँग जन्माला आलेले मी समोर पाहिले. नाथन स्ट्रीटवर टोकियोतील गिंझा अवतरली होती... धुंद, विलासी ! आणि पुन्हा आठवल्या त्या आमचे कवी मित्र बा. भ. बोरकर यांच्या ओळी–

'बंदरीचे हे ग दिवे
रात्री सवे विझायचे
शराबीचे काय पेले
पिता पिता फुटायचे !'

परिपूर्ण भांडवलशाही समुद्राच्या पोटातून वर आलेल्या या हाँगकाँगच्या खडकांवर मदिरा आणि मदिराक्षी यांच्या मिठीत विलास करते. पलीकडेच साम्यवादी चीन आहे तेथील विश्व निराळे आहे. परंतु आज हाँगकाँगकडे मांजरी-सारखे डोळे अर्धवट मिटून पाहताना चीन काय म्हणत असेल ? 'लोक खूप रंगून गेलेले दिसतात. यासाठी थोडे थांबू या. परंतु शेवटी हाँगकाँग आमचेच आहे व ते आमचेच होईल !'

□

# १२. अशांत तरुणांचे बँकॉक

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

थायलंडची राजधानी बँकॉक येथे मी उतरलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. आपण भारतामध्येच उतरलो आहोत असे समोरची माणसे पाहून क्षणभर मला वाटले. थाय माणूस हा मूळ काळा असतो, व त्यामुळे कृष्णवर्णीय भारतीय सर्वत्र वावरत आहेत असे चित्र दिसत होते. त्यांची नाके फक्त वेगळी होती. अर्थात सर्वांचीच नाके बुटकी नाहीत हे नंतर लक्षात आले. बँकॉक हे थाय, चिनी व नंतर अमेरिकन अशा तीन संस्कृतींचे मिश्रण असलेले शहर आहे. थायलंडची लोकसंख्या ४ कोटी, तर त्यापैकी ४० लाख लोक बँकॉकमध्ये राहतात. या ४० लाखांत १० टक्के लोक चिनी. बँकॉकचा व्यापार चिनी लोकांकडे आहे. त्यामुळे प्रत्येक दुकानावर तीन पाट्या दिसत होत्या. एक चिनी, दुसरी थाय भाषेतील तर तिसरी इंग्रजी. चिनी पाटी दुकानाच्या मालकाची, दुसरी स्थानिक लोकांसाठी

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

तर तिसरी जपानच्या आक्रमणातून थायलंडची मुक्तता करणाऱ्या अमेरिकनांसाठी.

या अमेरिकन सैनिकांनी थायलंडच्या भूमीवर पाय ठेवला व या देशाचे स्वरूपच पालटले. बँकॉकचे त्यांनी सरळ सरळ एका वासनानगरीत रूपांतर केले. व्हिएतनाममधील युद्धात लढणाऱ्या अमेरिकेनानी बँकॉक हे आपले विश्रांतिस्थान बनविले. अमेरिकेतील व्यक्तिस्वातंत्र्य, त्यांचा उद्योगीपणा, लिंकन–केनेडी–मार्टिन ल्यूथर किंगसारखी तेथील तेजस्वी माणसे यांचे आकर्षण मला सदैव वाटते. परंतु भांडवलशाही राष्ट्राचे दूत हे माणसाचे मोल असे पैशांत करताना दिसतात तेव्हा संताप येतो.

थायलंड हा शेतकऱ्यांचा देश. त्याचे जुने नाव सयाम. सयामी जुळी आपल्याला परिचित होती. बँकॉक शहरातून जरा बाहेर पडले की शेती दिसू लागते. बँकॉक हे शहराचे नावही पाश्चात्यांनी दिलेले. त्याचे जुने नाव क्रुङ: असे श्री. श्रीपाद जोशी यांच्या 'जा जरा पूर्वेकडे' या पुस्तकात मी वाचले होते. चाओफ्या नदीतून जाणाऱ्या छोटया होडया, किनाऱ्यावरील घरे आणि विस्तीर्ण शेते हा थायलंडचा लँडस्केप माझ्या डोळयांसमोर अजूनही दिसतो. आजही होडयांत बाजार भरतो व तो पाहण्यासाठी पर्यटकांना घेऊन जातात. होडयांतून हिंडायचे व होडयांतील दुकानांतून भाजीपाला घ्यायचा. या शेतकऱ्यांच्या, फळवाल्यांच्या मुली बँकॉकच्या बाजारात येत. त्यांच्यासमोर अमेरिकन सैनिकाने डॉलर्स टाकले. कधीही न पाहिलेले हे डॉलर्स, व थायलंडच्या पैशांत त्याचे मोल मोठे. टोकियोहून हाँगकाँगला आले की एका अमेरिकन डॉलरचे चार हाँगकाँग डॉलर्स मिळतात, आणि बँकॉकला त्याचे मूल्य आणखी वाढते. बँकॉकचे बहत अगर बार. १ अमेरिकन = डॉलर २१ बहत बँकॉक हे अगदी मुंबईसारखे शहर आहे. बरेचसे बकाल व काही भाग श्रीमंतांनी सजविलेले. त्यामुळे तुम्हाला त्याच पैशांत तीच गोष्ट महाग व स्वस्त, दोन्ही मिळू शकते. गुणवत्तेत थोडा फरक, व उरलेला छानछोकीचा अशा स्थितीत अमेरिकन डॉलर्सनी तेथे कोणता हैदोस घातला असेल याची कल्पना येऊ शकते. पैसा माणसाची नीतिमत्ता कशी बिघडवतो, निरागस ग्रामीण मुलींच्या कशा वेश्या बनवतो याचे चित्र बँकॉकमध्ये दिसते.

त्यामुळे विमानतळावरच तुम्हाला त्यांचे दलाल भेटू लागतात व तुमचा कार्यक्रम आम्ही ठरवतो म्हणून आग्रह करू लागतात. बँकॉकच्या वृत्तपत्रांत जाहिरातीच असतात. 'कंपनी देणे' असे त्याचे सोज्वळ स्वरूप असते. बँकॉकचा सर्व टूरिझम हा स्त्रीप्रधान आहे. तुम्ही आधी योजना करून ठेवली तर ती मुलगी विमानतळावरच गाडी घेऊन तुम्हाला घ्यायला येते. अनेक मुली स्वत: गाडया चालवतात, व त्यांपैकी अनेकजण शिकलेल्या असल्याने ते हिंडणे वेगळया पातळीवर जाते. बँकॉकमध्ये तीन महिन्यांपुरते लग्न लावण्याची सोय आहे.

बँकॉकचे सर्व अर्थकारण पर्यटनाभोवती आज घोटाळत आहे. परंतु हे पर्यटन वाढविण्यासाठी तेथे स्त्रीने आपले सर्वस्व दान केले आहे.

अशा त्या वासनानगरात मी सकाळी उठून वृत्तपत्र हाती घेतले तर एका नव्या राजकारणाने बँकॉक खडबडून जागे झाले होते. थायलंडचे पंतप्रधान कुक्रित प्रमोज हे पेकिंगला गेले होते व त्यावेळचे चिनी पंतप्रधान चौ-एन-लाय यांची त्यांनी भेट घेतली होती. थाय भाषेतील वृत्तपत्राने या भेटीवर खास अंक काढला होता. तामिळ लिपीसारखी थाय लिपी मला भासली. उभयतांच्या भेटीची मोठमोठी छायाचित्रे बहुतेक वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केली होती, व या निमित्ताने थायलंडच्या राजकारणाचे वेगवेगळे पैलू माझ्यासमोर प्रकट झाले होते.

सायगाव पडले, व्हिएतनामचे युद्ध तेथील जनतेने जिंकले, त्यानंतरचाच हा काळ होता. व्हिएतनामचे युद्ध संपण्यापूर्वी किसिंजर यांचे पेकिंगमध्ये चीनने स्वागत केले व अमेरिकेबरोबर संबंध सुधारले, ही घटना व्हिएतनामच्या जनतेला आवडली नाही. व्हिएतनामची जनता प्राणपणाने अमेरिकेबरोबर लढत असताना चीनच्या नेत्यांनी निक्सन यांच्याशी हस्तांदोलन करावे याची वाईट प्रतिक्रिया व्हिएतनाममध्ये झाली. रशिया व चीन, दोघांनीही व्हिएतनामला अमेरिकेविरुद्ध युद्धात मदत केली होती. त्यात व्हिएतनामला भौगोलिकदृष्ट्या चीन जवळचा होता. परंतु चीनच्या या राजकारणामुळे रशिया व व्हिएतनाम जवळ आले व हनोई–पेकिंग संबंध दुरावले. आज व्हिएतनाम कम्युनिस्ट देशांच्या वाटणीत रशियाच्या गटात आहे, चीनच्या नाही, ही त्यामधील निर्णायक घटना. त्यामुळे थायलंडला आपल्या बाजूला वळवावे असा बेत चीनने केला व त्यासाठी पंतप्रधान कुक्रित प्रमोज यांचे भव्य स्वागत पेकिंगमध्ये केले.

या घटनेची प्रतिक्रिया थायलंडमध्ये वेगवेगळी झाली. थायलंडमध्ये जे चिनी लोक आहेत त्यांत फार्मोसावादी चिनी अधिक आहेत. परंतु तरुण पिढी माओवादी आहे. थायलंडमध्ये सर्वांत बंडखोरी कुणाची चालत असेल तर ती विद्यार्थ्यांची. ते सर्व ८० टक्के माओवादी. त्यामुळे नवी पिढी व जुनी पिढी असे भेद केले तर नव्या पिढीला या भेटीचा आनंद झाला, तर जुन्या पिढीला ही चिन्हे काही बरी वाटली नाहीत. थायलंडमधील अमेरिकन सैनिक आता गेले आहेत. त्या वेळी ते गेलेले नव्हते. त्यामुळे आज ना उद्या थायलंड कम्युनिस्ट होणार असे गृहीत धरून चीनने हा देश आपल्या गटात ओढण्यासाठी हा डाव टाकला, असे काहींचे मत.

यामुळे वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या बातम्यांना विविध रंग होते. चौ-एन-लाय व प्रमोज यांच्या भेटीच्या वेळी थायलंड पंतप्रधानाने शांपेन कशी घेतली व चौ-एन-लायनी चहा कसा घेतला याचे वर्णन होते. पंतप्रधान प्रमोज नंतर माओंना भेटले. माओंना जे जे भेटले ते कसे नंतर पदच्युत झाले याची हकीगत एका वृत्त-

पत्राने त्याच वेळी दिली होती. 'अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन माओंना भेटले, ते संपले. जपानचे पंतप्रधान तानाका माओंना भेटून आले, ते संपले. आणि आता पंतप्रधान प्रमोज भेटत आहेत...' येथे वाक्य संपविले होते. सध्या माओ व चौ-एन-लाय, दोघेही संपलेले असून प्रमोजही संपलेले आहेत.

थायलंडच्या पंतप्रधानांबरोबर जे चार पत्रकार गेले होते त्यांनी पेकिंगमध्ये ऐकलेली निक्सनच्या पत्नीबद्दलची एक दंतकथा या दौऱ्याच्या वृत्ताबरोबर प्रसिद्ध केली होती. ती मोठी गमतीदार आहे. 'बँकॉक पोस्ट 'मध्ये मी ती वाचली.

निक्सन महाशय सपत्नीक पेकिंगला गेले तेव्हाची गोष्ट. त्यांना जेव्हा दरबारी चहा दिला त्या वेळी खास कप-बशा वापरण्यात आल्या होत्या. कपात चहाचे फिक्कट हिरवे पाणी ओतताच आतमध्ये असलेल्या चित्रातून चिनी ड्रॅगन वर येतो आहे असा भास होईल अशी त्या कपाची रचना होती. श्रीमती निक्सन यांनी तो ड्रॅगन वर येताना पाहिला आणि त्यांना मोह सुटला. त्यांनी हळूच तो कप उचलून आपल्या पर्समध्ये टाकला. पार्टी संपली तेव्हा एक कप हरवल्याचे लक्षात आले. माओंना समजले तेव्हा त्यांनी तो कप ताबडतोब परत मिळविण्याचे आदेश दिले. कारण तो कप हा चीनच्या राष्ट्रीय संपत्तीचा भाग होता. 'नॅशनल ट्रेझर' म्हटल्या-बरोबर गुप्त पोलिसांकडे ते प्रकरण गेले. निक्सन पति-पत्नी बाहेर असताना त्यांच्या खोल्या तपासल्या गेल्या, त्यांची मोटार तपासली गेली; परंतु कप कुठे सापडला नाही. कारण श्रीमती निक्सन यांनी तो आपल्या पर्समध्येच दडविला होता, व पर्स घेऊनच त्या सर्वत्र फिरत होत्या. त्यांच्या हातातील पर्स कुणाला मागता येत नव्हती, व त्या पर्स खाली ठेवत नव्हत्या.

अखेर तो कप मिळविण्यासाठी जादूच्या प्रयोगांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. निक्सन पति-पत्नी समोर बसले होते. तसेच सहा कप्स जादूगाराने आणले व बोलता बोलता एक नाहीसा केला. सहावा कप पहा तुमच्याकडे आहे असे जादूगार समोर बसलेल्या पाहुण्यांकडे पाहून म्हणाला. श्रीमती निक्सन रिचर्ड निक्सनांकडे पाहू लागल्या.

जादूगार म्हणाला, 'चीनमध्ये आलेले आमचे सर्वांत मोठे पाहुणे अध्यक्ष निक्सन यांच्या पत्नीच्या पर्समध्ये जाऊन तो पडला आहे. पाहा मी तो काढून दाखवितो.'

त्यांची पर्स जादूगाराने झटकन पुढे होऊन घेतली. ती रंगमंचावर नेली आणि तो कप त्याने काढून दाखविला.

या जादूचे रहस्य श्रीमती निक्सन यांना कळले. तो ड्रॅगन अखेर चिनी होता. तो असा दडवून ठेवणे त्यांना अखेर जमलेच नाही.

ही गोष्ट खोटीही असेल, परंतु पेकिंगच्या राजकीय वर्तुळात निक्सन यांच्या

भेटीबद्दल कोणत्या गप्पा प्रसृत असाव्यात याची ही झलक होती.

१ जुलै १९७५ रोजी पेकिंगमध्ये थायलंडचे पंतप्रधान प्रमोज उतरले. २ जुलै रोजी फार्मोसा चीनने बँकॉकमधील आपली वकिलात बंद केली. ३ जुलैच्या वृत्त-पत्रांत वर माओ–प्रमोज भेटीचे छायाचित्र व खाली ही चिनी वकिलात आपला झेंडा खाली उतरवीत असतानाचे छायाचित्र प्रसिद्ध केले होते. तुमच्या अंतर्गत गोष्टीत आम्ही ढवळाढवळ करणार नाही, असे आश्वासन माओंनी पंतप्रधान प्रमोज यांना दिले, तरी सर्वांचा विश्वास बसला नाही. कारण थायलंडमधील कम्युनिस्ट पक्षावरील बंधने उठवावीत असा विचार माओंनी व्यक्त केलाच. चीनच्या कारवायांबद्दल कम्युनिस्टविरोधी गोटात साशंकता असणे अपेक्षित होते. कारण शेजारच्या देशातील घटना त्यांच्या डोळ्यांसमोर होत्या. लाओसनंतर फिलिफाईन्समध्ये जे माओवादी गनिम काम करीत आहेत त्यांना कॅनडामधील चिनी वकील पैसे पुरवीत होता हे सर्वांना ज्ञात झाले होते. मलाया व इंडोनेशिया येथील कम्युनिस्ट पक्षांच्या वाढदिवसदिनी माओंचे संदेश जात असत. ब्रह्मदेशात दोघांना सैनिकांनी ठार मारले तेव्हा त्यांच्यासाठी माओंनी शोकसंदेश पाठविला होता. उत्तर कोरिया दक्षिण कोरियात केव्हा शिरेल याचा नेम नाही, या विचारात मग्न असलेले जपान, दक्षिण पूर्व आशियातील एकेक देश कम्युनिस्ट बनत आहे याच्या चिंतेत असलेले इतर छोटे देश व दुसरीकडे चीन–रशिया या दोघांचे अंतर्गत भांडण, या सर्वांची छाया या आशियाई देशांवर पडलेली मी या सर्व दौऱ्यात अनुभवली. साम्यवादाशिवाय तरणोपाय नाही, भांडवलशाही समाजरचनेत गरिबांचे प्रश्न सुटणार नाहीत याबद्दल एकीकडे एकमत, परंतु दुसरीकडे कम्युनिस्ट राज-वटीत येणारी हुकूमशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य यांचा होणारा पूर्ण लोप, यामुळे या दोन्ही गोष्टी एकत्र देणाऱ्या एका नव्या राजकीय तत्त्वज्ञानाच्या शोधात आज आशियातील सर्वच राष्ट्रे आहेत. लोकशाही समाजवाद हे त्याचे उत्तर होते; परंतु भारताच्या एकूण आर्थिक दुबळेपणामुळे या सर्व राष्ट्रांत या विचाराबद्दल अनास्था दिसली.

सकाळी उठलो व ही वृत्तपत्रे हाती आली, आणि त्यांतच मी गुंगून गेलो. बँकॉक पाहण्यास बाहेर जायचे होते याचा क्षणभर विसर पडला. परंतु तसे करूनही चालणार नव्हते. कारण या बुद्धनगरीत मी पुन्हा येईनच याची खात्री नव्हती. वृत्तपत्रे सर्व गुंडाळून ठेवली व थायलंड टूरिस्ट बसने सफर सुरू केली.

थायलंड, इंडोनेशिया, मलेशिया या तीन देशांत पूर्वी भारतीय संस्कृतीच वास करीत होती असे मी नेहमी ऐकत होतो. त्यात बुद्धधर्म जरी भारतात उदयाला आला, तरी त्याचे वैभव पाहण्यासाठी या आग्नेय आशियातील देशांत अगर जपान-मध्येच जावे लागते. बँकॉकमध्ये जी बुद्धमंदिरे आहेत ती पाहण्यासाठी आज देशो-

देशींचे लोक येत आहेत. परंतु ते सर्व पाहत असताना राम–रावणाचे सर्व रामायण येथेच घडले असावे असे सारखे वाटत राहते. थायलंडमध्ये रामराज्य होते याची साक्ष तेथील रॉयल पॅलेसमध्ये पाचूंतील बुद्धाचे जे मंदिर आहे तेथे भिंतीवर चित्रित केलेले रामायण देते. थाय भाषेत रामायणाला ' रामकिएन ' असा शब्द तेथे वापरलेला होता. तोस्सारोत म्हणजे दशरथ. गोव्यात जसे एदवर्द दायस म्हणजे मुंबईचा एडवर्ड डायस तसे हे दशरथाचे थायी रूप. राम येथे रामा (मुंबईचा रामा गडी नव्हे ) होता. रावणाला तोस्साकान म्हणतात. यानोक म्हणजे जनक. प्रोत म्हणजे भरत. सतरुत म्हणजे शत्रुघ्न. जटायूला सदायू असे म्हटले होते. सुक्रिथ म्हणजे सुग्रीव. सयामच्या जुन्या राजधानीचे नावच अयोध्यानगर होते. ते बँकॉकपासून ४० मैलांवर आहे. अशा या रामनगरीत तीन प्रमुख देवालये व रॉयल पॅलेस ही पाहण्याची मुख्य ठिकाणे. गोव्यात जसे देवळे पाहण्यासाठी पर्यटकांची एक सहल जाते, तशी या देवळांकडे व राजवाड्याकडे जाते. सुदैवाने एकाच भागात ती असल्याने ती पाहणेही सोपे पडते.

या देवळांचे शिल्प व त्यांचे रंग हेच इतके मोहित करणारे आहेत, की तेथे प्राकारात शिरले की आपण क्षणभर स्तिमित होऊन पाहत राहतो. गरुडाने आपले पंख पसरावेत अशी ही मंदिरांची छपरे दिसतात. त्यात पॅगोडाचा आविष्कार आहेच– परंतु नृत्य करणारी नर्तकी आपल्या बोटात चकाकणारी टोकदार, लांबट अशी सजावट घालते, तसे काहीतरी या छपरांच्या टोकांवर लावलेले आहे. त्यात मुख्य भाग हिरवा, भगवा, किंवा सर्व भागच गडद भगवा रंगविलेला आहे. त्यामुळे आपल्यासमोर या मंदिराच्या रूपाने हिरवा अगर दाट भगवा शालू नेसलेली, सोनेरी पदकाची नर्तकी नृत्य करीत पदन्यास करीत येते आहे असे भासते. ही मंदिरे इतकी जिवंत वाटतात की पाहत राहावे. आकाशाचे छत त्या मंदिरांना खरोखरीच मोठी ऐट आणते. अशा या मंदिरांतील ' त्रिमित्र वाट ' या मंदिरात ५ टन वजनाचा सोन्याचा बुद्ध आहे. बुद्धाने आपले नेत्र मात्र मिटून घेतलेले आहेत. स्फटिकाचे जे दुसरे मंदिर आहे त्यात बुद्धाचे वेगवेगळे भाव प्रकट करणाऱ्या ५२ प्रतिमा आहेत. तिसऱ्याला ' वाट पो ' मंदिर म्हणतात. तेथे एक प्रचंड मोठा बुद्ध कुशीवर पहुडलेल्या स्थितीत आहे. आणि मंदिराभोवती ९९ पॅगोडा आहेत. त्या सर्व कालखंडात हे बौद्ध भिक्षू किती कलासक्त होते याची साक्ष जशी ही मंदिरे देतात, त्याचप्रमाणे त्यांना भरपूर वेळ असावा असेही हे पाहताना माझ्या मनात आले. सारेच कसे अतिशय स्वच्छ व चकचकीत. सूर्यकिरणांत ती भगवी वस्त्रांसारखी छपरे मोत्यांसारखी चमकत होती. अष्टभुजा असलेल्या नर्तकीचे ते गरुडनृत्य डोळे दिपवून टाकणारे होते.

बँकॉकमध्ये खास पाहण्यासाठी जातात तो रॉयल पॅलेस खरोखरच ' रॉयल '

आणि 'ग्रँड' आहे. येथेच एका बुद्धमंदिरात तो सुप्रसिद्ध पाचूचा बुद्ध आहे. पूर्व व पश्चिमेच्या वास्तुकलेचे मिश्रण या प्रासादाच्या शिल्पात असल्याने ते थोडे वेगळे वाटते.

अयोध्यानगरी पडल्यावर व जुन्या सयाममध्ये कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित झाल्यावर राजे नदी ओलांडून बँकॉकमध्ये आले व त्यांनी हा राजवाडा बांधला. या राजवाड्यात राहिला तो पहिला राम. पहिला, दुसरा, तिसरा राम येथे राहिला, असे मार्गदर्शक वर्णन करीत होता. त्याचे उच्चार वेगळे होते, परंतु त्यामधील संस्कृत शब्द स्पष्ट कळत होते. राजवाड्यातील त्या एकेक दालनाला 'महाप्रासाद' हा शब्दच तो वापरत होता. एकूण तीन राजवाडेच आमच्यासमोर उभे होते. १७८३ मध्ये बांधलेल्या या राजवाड्याचा परिसर इतका मोठा आहे की तो फिरण्यास दोन-तीन तास लागतात.

मुख्य प्रासादातील दरबार हॉल सुवर्णमय सिंहासनाने नटलेला असून त्या सिंहासनाला होडीचा आकार दिलेला आहे. लाल गालिचे व छतही लाल असल्याने एखाद्या लाल महालासारखा हा दरबार हॉल दिसतो. एकूण पहिला राम, दुसरा राम व तिसरा राम अशा तीन रामांनी येथे राज्य केले. राज्यसूत्रे हाती घेतल्या-नंतर एक रात्र तरी त्या प्रासादात राहिलेच पाहिजे असा दंडक असल्याने नवा राजवाडा झाल्यावर हे सर्व राम येथे राहत आले.

या राजप्रासादाच्या आवारात 'ड्युसित' व 'कात्री' या दोन नावांच्या ज्या इमारती दाखविल्या जातात त्या मुख्य प्रासादापेक्षा मला अधिक आवडल्या. या दोन्ही इमारती मंदिरासारख्याच दिसतात. येथेही गरुडपक्ष्याचे पंख व नर्तकीची नखाग्रे यांचे शिल्प या इमारतीच्या छपरात साकार झालेले दिसते. चार थरांत हे छप्पर असल्याने काही वेगळेच दिसते– आणि मधून आकाशात उंच उसळी घेतो तो मंदिराचा परंतु चर्चसारखा उंच जाणारा कलश. या इमारतींचे जे रंग आहेत ते यापूर्वी मी कुठेच पाहिलेले नसल्याने सारे कसे वेगळे वाटले. बौद्ध भिक्षूचे भगवे वस्त्र पांघरलेल्या या इमारतीतही हिरव्या रंगाची मखमल अशी सुरेख पेरलेली आहे की त्यामुळे वैराग्य व उपभोग या दोन्हींचे सान्निध्य या तत्त्वज्ञानात बसत असावे हे लक्षात येते. कात्री प्रासादात राजेच राहत होते, व आजही परदेशी राजदूत येथेच आपली अधिकारपत्रे सादर करतात.

पाचूचा बुद्ध हेच या राजवाड्यातील खरे आकर्षण. त्याचे वेगळे देवालयच केलेले आहे. एका अखंड पाचूतून हा बुद्ध बनविलेला आहे. १४६४ मध्ये तो सयामच्या जुन्या राजांना सापडला. त्याचा प्रवास चालू होता. अखेर पहिल्या रामाने तो येथे आणून प्रस्थापित केला. या मंदिराचे प्रवेशद्वारसुद्धा अतिशय रेखीव आहे. असे हे रामराज्य या बँकॉकमध्ये प्रस्थापित झाले, चालले व अखेर ते एक

दिवस संपले. नंतर राजेशाही नष्ट झाली. थायलंडमध्ये लोकशाही प्रस्थापित झाली. सयामचे थायलंड झाले. त्याचे स्मारक आज बँकॉकमध्ये लोकांनी उभे केले आहे. लोकांना विसर पडू नये यासाठी उभा केलेला हा स्मारकस्तंभ म्हणजे येथील तरुणांचे सर्वांत मोठे स्फूर्तिस्थान आहे.

याच स्फूर्तिस्थानाभोवती थायलंडचे विद्यार्थी १९७६ च्या ऑक्टोबरात उभे राहिले ते पदच्युत केलेला लष्करी हुकूमशहा परत आला म्हणून. पंतप्रधान सेनी प्रमोज यांनी एक दिवस राजीनामाही दिला होता. परंतु ते पुन्हा अधिकारावर राहिले, व लष्कराच्या जोरावरच त्यांनी विद्यार्थ्यांचे बंड तात्पुरते शमविले. हे सारे प्रकरण ६५ वर्षांच्या फील्ड मार्शल थानाम कित्तीककॉर्न यांच्यामुळे निर्माण झाले. थायलंडमध्ये त्यांनी लष्करी हुकूमशाही प्रस्थापित केली होती. १९७३ मध्ये विद्यार्थ्यांनी तेथे बंड उभारले. या थानाम महाशयांनी जो निर्घृण गोळीबार केला त्यात ७१ विद्यार्थी त्या वेळी ठार झाले. त्याची किंमत या लष्करी हुकूमशहाला द्यावी लागली. देश सोडून ते सिंगापूरला पळाले व लोकशाही राजवट पुन्हा सुरू झाली. ९१ वर्षांच्या आपल्या वृद्ध पित्याला भेटण्यासाठी येण्याची इच्छा त्यांनी प्रकट केली. बौद्ध भिक्षू बनण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला, म्हणून पंतप्रधानांनी त्यांना परवानगी दिली. फील्ड मार्शल थानाम बँकॉकच्या रस्त्यावर बौद्ध भिक्षूच्या वेषात कटोरा घेऊन भीक मागण्यास उभे राहिले. काही लोकांनी त्यांना ओळखले व एकच गडबड उडाली. बँकॉक विद्यापीठाचे विद्यार्थी बाहेर आले व पुन्हा १९७३ ची पुनरावृत्ती होते की काय असे चित्र दिसू लागले. हजारो विद्यार्थी पाठीवर झोपले आहेत व लष्कराने त्यांच्यावर बंदुकी रोखल्या आहेत, असे चित्र मुंबईच्या ‘टाइम्स ऑफ इंडिया’ने प्रसिद्ध केलेले अनेकांनी पाहिले असेल. एकेकाळचा फील्ड मार्शल तांदळासाठी कटोरा घेऊन बँकॉकच्या रस्त्यावर फिरत राहिला यात त्याचेही मनोधैर्य दिसून येते. भिक्षूने भीक मागितलीच पाहिजे असा नियम असल्याने त्याच्यापुढेही पर्याय नव्हता.

हे सारेच विलक्षण असे प्रश्न आहेत. बँकॉकमधील त्या हॉटेलमध्ये विमानतळाकडे नेणाऱ्या बसची वाट पाहत मी बसलो होतो आणि समोरून येणारी-जाणारी माणसे पाहत होतो. आज सबंध आशिया व आफ्रिका हे परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभे आहेत. दुसऱ्या महायुद्धाने या आशियाई राष्ट्रांत नवी आणि खोटी मूल्ये आणली— त्यांचें पूर्वीचे जीवन व मूल्ये उद्ध्वस्त केली. नव्या मूल्यांनी पैसे आणले; परंतु आज काहीतरी मौल्यवान असे ते गमावून बसले आहेत. व्हिएतनामच्या युद्धाने कायम स्वरूपाचे जे सामाजिक नुकसान या लहान राष्ट्रांचे केले ते कधी भरून येईल हे सांगता येत नाही. जपान आणि पूर्व आशिया यांचा हा धावता दौरा होता; परंतु कधीच न बघितलेले आपले शेजारी या दौऱ्यात माझ्या परिचयाचे झाले.

व्हिएतनाम, लाओस यांच्या मागोमाग फिलिपाईन्स व थायलंड ही राष्ट्रे साम्यवादी बनली तर मला नवल वाटणार नाही. कारण तेथे आज जो शरीरविक्रय चालला आहे त्याबद्दल संतप्त होणारी एक पिढी तेथे निर्माण होणारच. चौ-एन-लाय व माओ या दोघांचेही निधन आता झालेले असले तरी चीनचे राजकारण बदलेल अशी चिन्हे नाहीत. आफ्रिकेतील सर्व राष्ट्रे स्वतंत्र होत आहेत व जगाचे भवितव्य आशिया व आफ्रिका या दोन खंडांच्या हाती जात आहे. काही वर्षांनी तरी हाँगकाँग चीनकडे गेलेले असेल. एकही अमेरिकन आशियात नसेल– आफ्रिकेतही नसेल. तिसरे जग सामर्थ्यवान बनलेले असेल; परंतु खरी लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य विचारस्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य लोप पावलेले असेल. बँकॉकमध्ये उभारलेल्या स्मारकाप्रमाणे त्यांची स्मारकेच कदाचित आपल्याला उभी करावी लागतील. बँकॉकमध्ये प्रचंड आवाज करीत धावणाऱ्या ऑटोरिक्षा फार आहेत. त्या आवाजाने विचारांची साखळी तुटली. समोर पाहिले तर विमानतळाकडे नेणारी बस आली होती. बँकॉकमध्ये ट्रॅफिक जॅम्स पाहायला नकोत. या सर्व गर्दीतून विमानतळ गाठायचा होता. बँकॉकमध्ये सोने स्वस्त आहे. परंतु परकीयाला ते विकत घेताना त्यावर भरमसाठ ड्यूटी द्यावी लागते. विमानतळावर थाय तरुणीने सोन्याची चौकशी केली. मी काहीच घेतलेले नव्हते. तो सोन्याचा काटा ओलांडण्यापूर्वी मला हाताचे घड्याळ फक्त काढून ठेवावे लागले.तपासणी झाली व मी विमानाकडे निघालो. घरी परतत होतो म्हणून आनंदी होतो. एकूण, आशियाई राष्ट्रांतील अंतर्गत संघर्षात आपलाही देश सापडलेला आहे, व एकीकडे चीन तर दुसरीकडे पाकिस्तान यांच्या राजकारणाशी आपल्यालाही सामना द्यायचा आहे. पाकिस्तान, चीन व थायलंड हे एकत्र आले तर रशिया, व्हिएतनाम, भारत असा गट निर्माण होणार हे उघड आहे. अनेक विचार मनात घोळवत असतानाच पहाट झाली होती. घरी आलो आणि काय ! ते जपानी माणसासारखे वाकायचे विसरलो. पुन्हा आम्ही आपले ताठ कण्याचे भारतीय ! हवे तिथं न वाकणारे आणि नको तिथं वाकणारे ! ते जुनेच जीवन पुन्हा सुरू झाले.

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. २८४३३

# परिशिष्टे

## १. दृष्टिक्षेपात जपानचा इतिहास
## इंडो कालखंड

## (१६०३ ते १८६७)

१६०३– जपानच्या राजाने टोकुगावा आयासू यांची शोगून म्हणून नेमणूक केली. त्याने आपले सरकार इंडो येथे स्थापन केले. इंडो म्हणजेच आजचे टोकियो.

१६३९– जपान जगाला बंद झाले. एकाही जपानी माणसाला देश सोडून जाता येणार नाही व परदेशी माणसाला जपानमध्ये पाऊल ठेवता येणार नाही, असा कायदा झाला. प्रॉटेस्टंट डच व खिश्चन नसलेले चिनी यांना फक्त जपानमध्ये येण्यास मुभा दिलेली होती. नागासकी बंदरात ते येऊ शकत होते.

१७९२– रशियन प्रतिनिधीचे आगमन व जपानबरोबर व्यापारी संबंध निर्माण करण्याची मागणी, परंतु शोगूनशाहीने ती फेटाळून लावली.

१८५३– अमेरिकेच्या कमोडोर मॅथ्यू पेरीचे जपानमध्ये आगमन. १८५४ मध्ये तो पुन्हा आला व जपानचे हे एकटेपण संपले. जपानच्या दोन बंदरांतून व्यापार करण्याची त्यांना मुभा मिळाली. अमेरिकेबरोबर शोगूनशाहीचा मैत्रीचा करार. असाच करार नंतर ब्रिटन, रशिया व नेदरलँड्स यांच्यात जपानने केला.

# मेयजी कालखंड

## (१८३८ ते १९१२)

१८६८– राज्यसत्तेने सत्ता हाती घेतली. बादशहा मेयजी यांनी राष्ट्रीय सरकारचे सर्व शासन आपल्या हाती घेतले. इडोचे नाव बदलून टोकियो ठेवले. ती राष्ट्राची राजधानी म्हणून घोषित केली व राजे मेयजी तेथे राहण्यासाठी आले.

१८६९– जपानमधील वेगवेगळ्या सरदारांनी आपले प्रदेश व प्रजानन मेयजी यांच्या सत्तेखाली आणले.

१८७०– या सरदारशाहीत चातुर्वर्ण्य पद्धती होती. योद्धे, शेतकरी, व्यापारी व कलाकुसरीची कामे करणारे, असे चार वर्ग मानले जात. ते रद्द करण्यात आले.

जपानने पहिले सार्वजनिक कर्जरोखे जाहीर केले. १० लाख पौंडांच्या या कर्जरोख्यांची विक्री इंग्लंडमध्ये झाली. जपानने ९ टक्के वार्षिक व्याज देण्याचे जाहीर केले. जपानमधील रेल्वे बांधण्यासाठी हे कर्जरोखे काढण्यात आले.

१८७१– टपालव्यवस्था सुरू झाली.

मेयजी सरकारने संपूर्ण जपानसाठी आपले चलन सुरू केले.

सरदारांनी निर्माण केलेले विभाग रद्द झाले. सरकारने प्रांतांची विभागणी केली व तेथे गव्हर्नर्स नेमले.

१८७२– प्राथमिक सार्वजनिक शाळा सुरू झाल्या.

जपानची पहिली रेल्वे सुरू झाली. टोकियो ते योकोहामा असा प्रवास सुरू झाला. जपानने पहिली युद्धनौका 'सोरयू–मारू' योकोसुका शिपयार्डमध्ये बांधली.

चार राष्ट्रीय बँकांची स्थापना केली.

पहिली कापड गिरणी निघाली.

१८७४– आजच्या झगमगणाऱ्या गिंझामध्ये पहिले गॅस लाईट्स आले.

१८७५– जपानच्या सर्वोच्च न्यायालयाची स्थापना.

१८८७– टोकियोमध्ये प्रथमच विजेचे दिवे आले.

१८८९– मेयजीने नवी राज्यघटना जाहीर केली व त्याप्रमाणे काहीजणांना मताधिकार मिळाला.

१८९०– राष्ट्रीय संसदेच्या पहिल्या अधिवेशनाचे उद्घाटन. घटनाअधिष्ठित सरकारची स्थापना.

१८९४– कोरियाबद्दलच्या हितसंबंधावरून जपान–चीन युद्ध सुरू झाले.
१८९५– जपानने युद्ध जिंकले.
१८९६– चलच्चित्रपटाचे आगमन.
१८९९– टोकियो व ओसाकामध्ये टेलिफोन्स आले.
१९०२– ब्रिटन व जपान यांच्यामध्ये मैत्रीचा करार.
१९०४– रशिया कोरियात प्रवेश करू लागल्यामुळे जपानने रशियाबरोबर युद्ध पुकारले.
१९०५– रशियाचा पराभव करून जपान विजयी झाले.
१९१०– कोरिया जपानला जोडण्यात आला.
१९१२– मेयजी बादशहाचे निधन. राजे तायशो गादीवर आले.

## तायशो राजवट
## १९१२–१९२६

१९१४– पहिले महायुद्ध सुरू झाले व जपान ब्रिटनच्या बाजूने उभे राहिले.
१९१८– महागाई वाढली व त्यामधून जपानमध्ये प्रथमच दंगली झाल्या.
१९१९– व्हर्सायिला तह झाला. जपानचे दोस्त राष्ट्रांतील घटक म्हणून सही.
१९२०– लीग ऑफ नेशन्सचे सभासदत्व स्वीकारले.
१९२१– वॉशिंग्टन येथे भरलेल्या निःशस्त्रीकरण परिषदेत जपानचा सहभाग.
१९२३– टोकियोला फार मोठा धरणीकंपाचा धक्का बसला.
१९२५– सर्व पुरुषांना मतदानाचा अधिकार बहाल.
१९२६– राजे तायशो निधन पावले व आजची शोवा राजवट सुरू झाली.

## शोवा राजवट
## १९२६ पासून

१९२९– टोकियो व ओसाका यांच्या दरम्यान विमानवाहतूक सुरू झाली.
१९३१– मांचुरियातील वाद. जपानचे सैन्य मांचुरियात शिरले.
१९३३– लीग ऑफ नेशन्समध्ये वाद. जपानचा राजीनामा.
१९३७– जपानने चीनमध्ये फार मोठ्या प्रमाणावर लष्करी कारवाई सुरू केली.
१९४०– जर्मनी व इटाली यांच्याबरोबर मैत्रीचा करार.
१९४१– जपानचा दुसऱ्या महायुद्धात प्रवेश.

१९४५– हिरोशिमा व नागासकी यांवर अमेरिकेने अणुबाँब टाकले.
दि. २ सप्टेंबर १९४५ रोजी जपानची शरणागती.

१९४६– नवी राजघटना घोषित. स्त्रियांना मतदानाचा अधिकार बहाल.

१९५१– सान फ्रन्सिस्को येथे दोस्त राष्ट्रांबरोबर शांतताकरारावर सह्या.
जपानच्या पुनरुत्थानाची योजना सुरू.

१९५२– जपान पुन्हा स्वतंत्र राष्ट्र झाले.

१९५२– जपानमध्ये टेलिव्हिजन आले.

१९५६– रशियाशी राजनैतिक संबंध प्रस्थापित.
संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व.


१९६४– राखेतून पुन्हा उभ्या राहिलेल्या जपानमध्ये १८ वे ऑलिंपिक सामने भरविण्यात आले. टोकियो–ओसाका ही वेगवान रेल्वे सुरू.

१९६८– मेयजी राजवटीचा शताब्दी समारंभ सर्व जपानभर साजरा.

१९७६– राजे हिरोहिटो यांच्या कारकीर्दीस ५० वर्षे पूर्ण.

१९७८– मसायोषी ओहिरा जपानचे नवे पंतप्रधान म्हणून निवडले गेले.

१९७९– १९७८ चे एक लाख रुपयांचे जवाहरलाल नेहरू पारितोषिक निचिरात्सू फुजी यांना राष्ट्रपतींच्या हस्ते अर्पण.


जपान
होकाईदो
हिरोशिमा
क्योटो
ओसाका
नारा
नागोया
शिकोकू